

# मॉडर्न

८८-८९



**कला मंडळ : वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ▲**
विद्यार्थी कलाकारांना मार्गदर्शन करताना
प्रमुख पाहुणे मा. दामू केंकरे

▼ **पुरषोत्तम करंडक**
'आभ्राण' एकांकिकेतील गुणवंत कलाकार मा. जब्बार पटेल यांच्या समवेत.





खासदार
बॅ. विठ्ठलराव गाडगीळ,
अध्यक्ष
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



प्रा. सीताराम रायकर,,
सेक्रेटरी
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



आमचे प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर



**प्रा. अ.गो. गोसावी**
उप-प्राचार्यपदी नियुक्ती



**श्रीमती सुरेखा परब**
कनिष्ठ महाविद्यालय
पर्यवेक्षकपदी नियुक्ती



**प्रा. रा.वा. जोशी**
कनिष्ठ महाविद्यालय
पर्यवेक्षकपदी नियुक्ती



**डॉ. अरुण मुरलीधर भालेराव**
प्राणिशास्त्र विषयात पी.एच्.डी.
पदवी संपादन व यु.जि.सी. कडून
संशोधन प्रकल्पासाठी अनुदान



**प्रा. एस्.आर. वाघ**
पदार्थ विज्ञान विषयात
एम्.फिल्.पदवी संपादन



**प्रा. अशोक विश्वनाथ कांबळे**
वाणिज्य विषयात
एम्.फिल्. पदवी संपादन



**प्रा. श्रीमती अमृता कुलकर्णी**
वाणिज्य विषयात
एम्.फिल्. पदवी संपादन



**प्रा. श्रीमती संजीवनी कैलास रहाणे**
वाणिज्य विषयात एम्.फिल्. पदवी संपादन



**प्रा. श्रीमती अपर्णा चंद्रशेखर मखळे**
बी.एड्. पदवी संपादन



**प्रा. श्रीमती नीता मधुकर भोसले**
बी.एड्. पदवी संपादन



**मकरंद टिल्लू** तृ.व. वाणिज्य
मराठी साहित्य सभा, मुंबई आयोजित
राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेत
प्रथम क्रमांक



**योगेश वाडदेकर,** ११ वी शास्त्र
कनिष्ठ महाविद्यालय
सर्वोत्तम विद्यार्थी ८८-८९



**वरिष्ठ महाविद्यालय** ▲
आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल विजेता संघ

▼ **वरिष्ठ महाविद्यालय**
आंतरमहाविद्यालयीन बास्केट बॉल विजेता संघ





**कनिष्ठ महाविद्यालय ▲**
आंतर शालेय विभागीय विजेता
आंतरराज्य तृतीय क्रमांक विजेता व्हॉलीबाल संघ

▼ आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेतील सांघिक विजेतेपद





राष्ट्रीय सेवा योजना ▲

▼ वादविवाद मंडळ





क्रीडा संघटना ▲

▼ पुरूषोत्तम करंडक विजेता संघ





**कलामंडळ**




**शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ**
डावीकडून (१) प्रमुख पाहुणे श्री. एस्.डी. वाघ, संपादक, महाराष्ट्र हेरॉल्ड, पुणे; (२) प्राचार्य नवलगुंदकर व (३) प्रा. आर.जी. लिमये.



**सुरेश गायकवाड**
तृ.व. साहित्य भारतीय, पुणे विद्यापीठ
व्हॉलीबॉल संघात निवड



**सुधीर पलांडे**
द्वि.व. साहित्य राष्ट्रीय व पुणे विद्यापीठ
व्हॉलीबॉल संघात निवड



**राजेश गायकवाड,**
प्र. व. साहित्य
राष्ट्रीय व विद्यापीठ खेळाडू
व्हॉलीबॉल आणि बास्केट बॉल



**सतीश शिवरकर**
प्र. व. वाणिज्य
राष्ट्रीय व विद्यापीठ खेळाडू,
व्हॉलीबॉल



**राजेंद्र पोटे**
द्वि. व. साहित्य
शरीर सौष्ठव स्पर्धेत **'मॉडर्न श्री'** किताब प्राप्त



**गिरीश गोसावी,** तृ.व. वाणिज्य
नियतकालिक चिटणीस



**कैलास बागल,** द्वि.व. वाणिज्य,
संघाचे प्रतिनिधित्व, क्रॉसकंट्री



**संदीप भागवत**
विद्यापीठ व राष्ट्रीय खेळाडू
व्हॉलीबॉल



**श्रीकांत पाटील**
विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी



**संगीता सोनावणे,** प्र. व. साहित्य
पुणे विद्यापीठ कबड्डी संघात निवड



**संगीता जोशी,** एम्.कॉम.द्वि.व.
पुणे विद्यापीठ खोखो संघाची कप्तान आणि
**श्री शिवछत्रपती पारितोषिक विजेती**



**मनिषा शिंदे,** द्वि.व. साहित्य
पुणे विद्यापीठ कबड्डी संघात निवड



**वसुधा कोलते** प्र.व. वाणिज्य
मैदानी स्पर्धा,
महाराष्ट्राच्या संघात निवड



**शैलजा कुलकर्णी,** द्वि.व.शास्त्र
पुणे विद्यापीठ कबड्डी संघात निवड



**स्वाती गोखले,** तृ.व. वाणिज्य
पुणे विद्यापीठ खोखो संघात निवड



**धनश्री पोळ,** द्वि.व. वाणिज्य
पुणे विद्यापीठ खोखो संघात निवड



**गायत्री भोपटकर,** द्वि.व. वाणिज्य
पुणे विद्यापीठ कबड्डी संघाचे प्रतिनिधित्व



प्रमुख पाहुणे, **राजमाता विजयाराजे शिंदे** यांना ▲
संगणक विषयी माहिती देत असताना
**प्रा. म. रा. मराठे** उपप्राचार्य,
कार्यवाह **प्रा. सीताराम रायकर**

▼ **वाणिज्य विभाग**
'ग्राहक संरक्षण' चर्चासत्र १९ मार्च १९८९
**उपप्राचार्य, गोसावी डॉ. कृष्णाबाई निंबकर**
यांचा सत्कार करताना बाजूला **डॉ. दिलीप सरवटे**



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५

# 'मॉडर्न' नियतकालिक

१९८८-८९

: संपादन समिती :

अध्यक्ष : प्राचार्य शं. ना. नवलगुंदकर

: सदस्य :

डॉ. माधवी मित्र

प्रा. बाळकृष्ण वाणी

डॉ. स्नेहल तावरे

प्रा. कु. सुरेखा परब

प्रा. सुहास धैसास

: संपादक :

डॉ. र. व. गंधे

: विद्यार्थी प्रतिनिधी :

गिरीश गोसावी

तृ. व. वाणिज्य

## मुखपृष्ठ कल्पना आणि निर्मिती

१९७० साली आपले महाविद्यालय स्थापन झाले. तेव्हापासून आजतागायत महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास आणि विस्तार होत आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयाने मिळवलेले नेत्रदीपक यश हे निश्चितच भूषणावह आहे आणि याचा आपणा सर्वांना अभिमान आहे. मुखपृष्ठावरील मोराचा डौल आणि त्याचा वैभवसंपन्न हळू हळू फुलत जाणारा पिसारा, बहुरंगी सतत फिरत असणारे चक्र महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचे द्योतकच आहे.

**प्रकाशक** : प्राचार्य शं. ना. नवलगुंदकर
मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**मुद्रक** : 'प्रतिमा'
स. नं. ८/६, कर्वेनगर,
पुणे ४११ ०५२.

# संपादकीय

मॉडर्न महाविद्यालयाचे १९८८ – ८९ चे वार्षिक नियतकालिक आपल्या हाती देत असताना आम्हांस आनंद होत आहे. यंदाचा हा अंक प्रकाशित होण्यास खरं तर जरासा विलंबच झाला आहे आणि त्याबद्दलची खंतही मनाला सलत आहे. पण प्राध्यापकांचा या वर्षी झालेला राज्यव्यापी संप, त्यानंतर संपकाळातील कामाचे दिवस भरून काढणे व अभ्यासक्रम शिकवून पुरा करणे या काहीशा आकस्मिक घटनांमुळे यंदाचे शैक्षणिक वर्ष तसे धांदलीचेच गेले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास प्राधान्य देऊन परीक्षेच्या आधी सर्व अभ्यासक्रम शिकवून पुरा करण्याच्या कामी सारी शक्ती लावीत असताना अभ्यासेतर उपक्रमांचे पूर्वापार वेळापत्रक सांभाळणे काहीसे अवघडच होते. या पार्श्वभूमीवर एरवी दुसऱ्या सत्राच्या अखेरीस प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकास लागलेला हा यंदाचा विलंब समर्थनीय नसला तरी समजण्यासारखा आहे.

आपल्या महाविद्यालयाची यंदाच्या वर्षी झालेली प्रगती, सर्वक्षेत्रीय विकास व योजनाबद्ध विस्तार यांचा आलेख म्हणजे हे नियतकालिक होय. ' उडदामाजी काळे–गोरे ' या न्यायाने संस्थात्मक जीवनात चढ–उतार यावयाचेच. बऱ्यावाईट घटना घडावयाच्याच. त्या संदर्भात महाविद्यालयाचे हे शैक्षणिक वर्षही अनेक लहान–मोठ्या घडामोडी, सुखद–दुःखद अशा घटनांची पावले उमटवत निघून गेले. विविध क्षेत्रांतील यशाची शिखरे लीलया सर करीत असतानाच महाविद्यालयीन जीवनातील बऱ्या–वाईट प्रसंगांना तितक्याच आत्मविश्वासाने, स्थिर चित्ताने व समर्थपणे सामोरे जाण्यात महाविद्यालयातील पदाधिकारी, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्गाने जी परिपक्वता दाखविली त्यातून संस्थेचे प्रौढत्वच सिद्ध झाले. महाविद्यालयाच्या या सर्व आधारभूत घटकांच्या सिद्धीच्या पाऊलखुणा या अंकात उमटलेल्या आहेत. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीची निवडणूक, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे आगमन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध क्षेत्रांत संपादित केलेले उत्तुंग यश, क्रीडा, अभ्यास, स्नेहसंम्मेलन, अभ्यासेतर उपक्रम या क्षेत्रांत विद्यार्थीवर्गाने मारलेली यशस्वी भरारी, सिद्ध केलेली गुणवत्ता अशा एक ना अनेक घटनांनी हे वर्ष धामधुमीचे गेल्याचे दिसते.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीच्या निवडणुकीस या वर्षी एक वेगळेच औचित्य होते. आमच्याच मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी व संस्थेच्या कामाबद्दल, प्रगतीबद्दल सतत आस्था दाखविणारे खासदार **बॅ. विठ्ठलराव गाडगीळ** यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड होणे ही आमच्या दृष्टीने एक गौरवास्पद घटना आहे. बॅ. गाडगीळांच्या अनुभवसंपन्नतेचा व कुशल नेतृत्वाचा आपल्याला निश्चितच लाभ होईल यात तिळमात्र शंका नाही. तसेच **प्रा. सीताराम रायकर** यांची संस्थेचे कार्यवाह म्हणून झालेली पुर्ननिवड हीही आमच्या दृष्टीने आनंदाची घटना होय. प्रशासनातील काटेकोरपणा सांभाळूनही मानवी संबंधातील ओलावा टिकविण्यासाठी आवश्यक असलेल्या ऋजुतेचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे प्रा. रायकर होय ! कार्यवाहपदी त्यांची पुनश्च निवड झाल्याने त्यांच्या समर्पित वृत्तीचा, पूर्वानुभवाचा व शैक्षणिक दृष्टीचा संस्थेला यापुढेही लाभ मिळणार ही अत्यंत समाधानाची बाब होय. संस्थेचे हे नवनिर्वाचित अध्यक्ष, कार्यवाह व कार्यकारिणीचे इतर सन्माननीय सदस्य यांचे हार्दिक अभिनंदन !

महाविद्यालयाच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची व गौरवाची गोष्ट म्हणजे **डॉ. शं. ना. नवलगुंदकर** यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची सूत्रे पुनश्च हाती घेतली. पुणे विद्यापीठाच्या उपकुलगुरु-पदावर जाण्याचा मान संपादन करून विद्यापीठामध्ये आपल्या नेतृत्वाचा व मार्गदर्शनाचा ठसा उमटवून ते पुन्हा आपल्या महाविद्यालयामध्ये प्राचार्यपदी रुजू झाले. त्यांचे मन:पूर्वक स्वागत व हार्दिक अभिनंदन ! त्यांच्या कुशल प्रशासनाचा आणि शिक्षण-क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा फायदा महाविद्यालयास पुन्हा मिळणार यापेक्षा गौरवाची दुसरी गोष्ट ती कोणती ?

महाविद्यालयीन प्रशासनाच्या दृष्टीने **प्रा. अ. गो. गोसावी** यांची उपप्राचार्यपदी झालेली नियुक्ती, तसेच **प्रा. र. वा. जोशी** व **प्रा. श्रीमती सुरेखा परब** यांच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षकपदी झालेल्या नियुक्त्या या महत्त्वाच्या आहेत. या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

दिसामाजी काहीतरी लिहावे, संशोधन करावे असे जे प्राध्यापकांबाबत बोलले जाते त्याचे उत्तम उदाहरण या महाविद्यालयाने घालून दिले आहे. संशोधन-क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करून, प्रबंध सादर करून, निरनिराळे संशोधन प्रकल्प हाती घेऊन प्राध्यापकांनी महाविद्यालयाचे यश द्विगुणीत केले आहे. प्रा. डॉ. स. य. परांजपे (प्राणिशास्त्र विभाग) यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाकडे सादर केलेला प्रकल्प आणि त्यांचे त्या विषयातील सखोल संशोधन याचा गौरव म्हणूनच त्यांची 'सायंटिस्ट C' पदी नेमणूक झाली. ही निश्चतपणे अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या शैक्षणिक वर्षात प्रा. डॉ. अरुण भालेराव (प्राणिशास्त्र विभाग) यांनी पीएच. डी. ही पदवी संपादन केली, प्रा. नरेंद्र नायडू (प्राणिशास्त्र विभाग) यांनी एम. फिल ही पदवी प्राप्त केली ही अभिमानाची गोष्ट आहे. प्रा. डॉ. हेमंत घाटे (प्राणिशास्त्र विभाग) यांची विभाग-प्रमुख म्हणून झालेली निवड हे महाविद्यालयाच्या त्याचप्रमाणे त्या विभागाच्या विकासाच्या, संशोधनाच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षी प्रा. आनंद पाध्ये (प्राणिशास्त्र विभाग) यांनी एम्. फिल पदवी संपादन केली. या सर्वांचे अभिनंदन. त्याचप्रमाणे प्रा. अशोक कांबळे (वाणिज्य विभाग), प्रा. सौ. संजीवनी रहाणे (वाणिज्य विभाग) आणि प्रा. अमृता कुलकर्णी (वाणिज्य विभाग) यांनीही एम. फिल ही पदवी प्राप्त करून वैय्यक्तिक आणि महाविद्यालयीन यशांत मोलाची भर टाकली. कनिष्ठ महाविद्यालयात प्रा. सौ. अपर्णा मखळे (पदार्थ विज्ञान विभाग), प्रा. सौ. विजयालक्ष्मी रेवणकर (इंग्रजी विभाग) आणि प्रा. कु. नीता भोसले (प्राणिशास्त्र विभाग) यांनीही बी. एड. पदवी प्राप्त करून सुयश संपादन केले. या सर्व प्राध्यापकांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या संशोधनामध्ये उत्तरोत्तर यश लाभो हीच सदिच्छा.

यंदा महाविद्यालयास 'कॉहसिप' योजनांतर्गत अनुदान मिळाले. भाषा व सामाजिक शास्त्रांच्या विकासाच्या दृष्टीने ती एक महत्त्वाची सिद्धी आहे. या योजनांतर्गत अनेक प्रकल्प महाविद्यालयाने हाती घेतले आहेत.

शैक्षणिक संशोधनासारख्या क्षेत्रात जसे महाविद्यालय आघाडीवर होते त्याचप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रातही महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी एक निराळ्या प्रकारचा उपक्रम यशस्वी केला. सर्वांच्या सहकार्याने एक स्नेहसंमेलन आयोजित करून त्यामध्ये 'शिवधनुर्भंग' या नाटकाचा प्रयोग अविश्रांत मेहनत घेऊन यशस्वीपणे सादर केला. त्याचप्रमाणे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, सेवकवर्ग या सर्वांचा विविध गुण-दर्शनाचा अत्यंत मनोरंजक कार्यक्रम झाला. या संमेलनाच्या निमित्ताने सर्व महाविद्यालय एकत्र आले आणि एकदिलाने सर्व भान हरपून सुखावले याबद्दल कलाकारांचे कौतुक करावे तेवढे थोडेच !

या वर्षी वनस्पतिशास्त्र विभागातर्फे एक आगळावेगळा उपक्रम हाती घेण्यात आला. या विभागातर्फे एक रोपवाटीका सुरू करण्यात आली असून बहुसंख्य वनस्पतींची रोपे येथे नाममात्र शुल्क घेऊन विकली जातात. अशा रीतीने वनस्पतींशी जवळीक निर्माण करण्याचा हा उपक्रम निश्चितपणे स्तुत्यच म्हणावा लागेल.

कर्मचारी संघटनेतर्फे अत्यंत आगळ्या–वेगळ्या प्रकारचा उपक्रम राबवण्यात आला. प्रशासकीय संघटनेतर्फे शासकीय प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार करून तो सर्व महाराष्ट्रभर राबविण्याचा उपक्रम पुणे जिल्हा पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संघटनेने या वर्षी राबवला. त्याचे संयोजन आपल्या महाविद्यालयातील **श्री. बा. शं. पाठक** यांनी केले. दरवर्षी याचप्रमाणे हा उपक्रम हाती घेतला जाईल. याचे संयोजक म्हणून श्री. बा. शं. पाठक यांना जो मान मिळाला तो निश्चितच गौरवास्पद आहे.

अशा प्रकारे महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू असताना सर्वात मोठे यश ज्यामुळे लाभले त्या आमच्या विद्यार्थ्यांचा या यशात सिंहाचा वाटा आहे. त्यांनी मिळविलेली लहानमोठी पारितोषिके, सांघिक यश आणि क्रीडा-क्षेत्रातील नेत्रदीपक यश हे खचितच भूषणावह आहे, स्पृहणीय आहे व गौरवास्पदही आहे. आम्हांला त्यांचा अभिमान वाटतो.

ही सर्व सुव्यवस्थित, यशस्वी वाटचाल चालू असतानाच महाविद्यालयातील एक प्रामाणिक, सुस्वभावी आणि अनुभवी प्रयोगशाळा सहाय्यक **श्री. श्रीनिवास विद्वत** यांचे आकस्मित निधन झाले. महाविद्यालयात एक न भरून येणारी पोकळी निर्माण झाली. श्री. विद्वतकुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

आपल्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष साहित्यवर्गातील एक विद्यार्थिनी कु. विजया सोमजे हिच्या हृदयावरील शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. ही एक आनंदाची घटना होती. तिच्या या शस्त्रक्रियेसाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवकवर्गाने यथाशक्ती साहाय्य केले व तिची आर्थिक अडचण अंशतः दूर केली. यातून सर्वांचे कौटुंबिक ममत्वच प्रकट झाले. महाविद्यालयाशी संबंधित प्रत्येक व्यक्तीची अडचण, सुख-दुःख हे महाविद्यालयीन परिवाराचे असते याचा पुनःप्रत्यय या निमित्ताने आला. ही घटना जशी आनंदाची तितकीच ती हृदयस्पर्शी व अनुकरणीय आहे.

नियतकालिकाचे काम हे सांघिक स्वरूपाचे असते. त्यातील मुख्य जबाबदारी संपादन समिती उचलत असली तरी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन सेवकवर्ग, विद्यार्थी-लेखक आणि नियतकालिक प्रतिनिधी या सर्वांच्या सहकार्याशिवाय नियतकालिक परिपूर्ण होणे अशक्यच असते याची जाणीव ठेवून या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानणे या ठिकाणी औचित्यपूर्ण ठरेल असे वाटते. विशेषतः नियतकालिक समितीचे सर्व सदस्य, विद्यार्थी-प्रतिनिधी, श्री. वाय्. पी. देशपांडे व श्री. एस. वाय्. कुलकर्णी यांनी जे बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच आहेत. प्रा. यशवंत सुमंत यांनीही नियतकालिकाचे प्रकाशन लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने अनेक प्रकारे सूचना करून वेळोवेळी साहाय्य केले. त्यांनी दाखविलेल्या या आस्थेबद्दल त्यांचे औपचारिकपणे आभार मानणे त्यांना आवडणारे नसले तरी आमच्या कर्तव्याचा तो एक भाग आहे असे मला वाटते. या सर्व सहकारी मित्रांच्या साहाय्यानेच हे नियतकालिक सिद्ध झाले आहे असे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते.

हे नियतकालिक अधिकाधिक निर्दोष व्हावे, आकर्षक व्हावे यासाठी संपादन समितीने अत्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. तरीही काही त्रुटी, उणिवा राहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे काही न्यून आढळल्यास संबंधित व्यक्ती त्याविषयी उदारदृष्टी ठेवतील असा विश्वास व्यक्त करून हे संपादकीय आटोपते घेतो.

**डॉ. रवींद्र गंधे**

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| म. गांधींचे धर्मविषयक विचार | कु. मीना वरगणकर | १ |
| आई (कविता) | कु. जयश्री बडवे | ३ |
| आगरकरांची विचारसृष्टी | माधुरी भागवत | ४ |
| एक प्रश्न (कविता) | वडगावकर गणेश | ७ |
| धग (कविता) | शकुंतला मुकाणे | ७ |
| सखाराम बाइंडर : एक आगळे नाटक | कल्पना रणपिसे | ८ |
| तुझ्या स्मृती (कविता) | प्रदीप कुलकर्णी | ११ |
| बा (कविता) | प्रकाश पवार | ११ |
| विशाखातील क्रांतिकारी कविता | शकुंतला मुकाणे | १२ |
| अर्थसंकल्प कितपत मृगजळ ! कितपत वास्तव | सुनिल जनार्दन खोल्लम | १४ |
| दॅट ब्लू आईज ! | अजय शितोळे | १६ |
| हायकू | शकुंतला मुकाणे | १८ |
| दोन दिवसांची रंगत संगत | रेवती आफळे | १९ |
| ' उचल्या '– एक आगळी दलित साहित्यकृती | रोहिणी बापट | २१ |
| साद देती हिमशिखरे | श्रीधर विसाळ | २३ |
| जगातील काही आश्चर्ये | एस. डी. पिनगे | २५ |
| प्राण्यांचे दिशाज्ञान | प्रा. डॉ. कांचनगंगा गंधे | २८ |
| माझ्या भावनांनो (कविता) | जयश्री प्रभाकर बडवे/सत्यरंजन | २९ |
| व्यसनाधीनता : एक समस्या | मनीषा सराफ | ३० |


## हिंदी विभाग


| | | |
|---|---|---|
| दहेज : एक कलंक | अनिता देवकुले | ३५ |
| जनसंख्या वृद्धि : एक समस्या | श्रीपादराज आम्ले | ३६ |
| मेरे जीवन का लक्ष्य | अपर्णा जल्लावार | ३८ |
| भारत में बढती हुई महँगायी की समस्या | कु. माधुरी भागवत | ४० |
| दोष मत देना (कविता) | रेखा शर्मा | ४४ |

## इंग्रजी विभाग


| | | |
|---|---|---|
| "Perpetual Motion" : A Scientist's Fantasy | Japdeep Roy | 47 |
| Know the Facts | Rajesh P. Salvi | 50 |
| Think And Act | | 50 |
| The Origin of the Universe | Yogesh Wadadekar | 51 |
| Do you know Why? | Madhuri Madiwale | 53 |

| | |
|---|---|
| दिसामाजी काही तरी ते लिहावे ! | ५५ |
| वार्षिक अहवाल १९८८–८९ | ६२ |

# मराठी विभाग

# म. गांधींचे धर्मविषयक विचार

– कु. मीना वरगणकर
द्वि. व. साहित्य

महात्मा गांधी हे धर्मपुरुष होते आणि ते क्रांतिकारक धर्मपुरुष होते. एकाच वृक्षाला जशा अनेक शाखा असतात. त्याचप्रमाणे एकाच मानवधर्माचे निरनिराळे संप्रदाय बनलेले असून त्यांनाच हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, शीख, पारशी, बौद्ध, जैन इत्यादी नावे प्राप्त झालेली आहेत, असे त्यांचे मत होते. सत्य आणि अहिंसा हेच त्या धर्माचे रहस्य असून विश्वाला एक नैतिक नियती आहे या निष्ठेवर या एका विश्वव्यापक मानवधर्माचा सर्व आधार आहे असे ते मानीत. विश्वाची नैतिक नियती शोधून काढणे हे संत, महात्मे व धर्मपुरुष यांचे कार्य असते. न्यूटनने जसा गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला तसाच प्राचीन ऋषींनी व संतमहात्म्यांनी सत्याचा, प्रेमाचा व सेवेचा नियम शोधून काढला आहे. ही नैतिक विश्वनियती शोधून काढणे, त्या नियतीच्या आधारे निरनिराळे जीवन-प्रयोग करणे आणि त्या प्रयोगांनी सिद्ध झालेले सिद्धांत समाजघटनेच्या व समाजक्रांतीच्या कामी उपयोगात आणणे हाच समाजोद्धाराचा व आत्मोद्धाराचा खरा मार्ग आहे. असे गांधींना वाटते. समाजाच्या सर्व व्यवहारांवर या नैतिक नियतीचे नियंत्रण चालू राहिले पाहिजे असा जो आग्रह, त्यालाच ते सत्याचा आग्रह किंवा धर्मनिष्ठा असे नाव देतात. ही त्यांची धर्मनिष्ठा अत्यंत व्यापक, अनाग्रही, संप्रदायशून्य अशी नैतिक जीवननिष्ठा आहे. या अर्थाने राजकारण व धर्म यांची फारकत होऊ नये असा त्यांचा आग्रह होता. पण त्याचबरोबर त्यांचा असा आग्रह होता की, राजकारण हे कोणत्याही विविष्ट सांप्रदायिक धर्माच्या आधारावर चालता कामा नये. धर्म ही सर्वसंग्राहक जीवननिष्ठा अथवा सत्यनिष्ठा आहे असा जेव्हा अर्थ असतो तेव्हा ती सर्व सामाजिक व्यवहारांना आधारभूत निष्ठा बनावी, हे मत अनेक धर्मांच्या व अनेक मतांच्या लोकांचे एक राष्ट्र बनविण्यास उपयोगी पडू शकेल. धर्म म्हटल्याबरोबर हिंदुंच्या अंत:करणात हिंदू धर्म व मुसलमानांच्या अंत:करणात इस्लाम धर्म असाच अर्थ उदित होतो, पण हे सर्व धर्म एकाच धर्मवृक्षाच्या शाखा आहेत असा बोध त्यांना होत नाही. आणि म्हणून त्या सर्वव्यापक धर्माला दुसरे एखादे नाव द्यावे असे काही आक्षेपकांचे म्हणणे होते. महात्मा गांधींना या आक्षेपकांच्या म्हणण्यातील तथ्य माहीत नसते तर त्यांनी प्रत्येक वेळी धर्म हा शब्द योजताना त्याच्या सर्वसंग्राहक व व्यापक अर्थाचे स्पष्टीकरण केलेच नसते. पण आक्षेपकांचे म्हणणे मान्य करूनही त्यांना असे वाटत होते की, सामान्य जनतेच्या अंत:करणात धर्मासंबंधी जी पूज्य व पवित्र भावना नांदत आहे ती वस्तुत: या व्यापक व सर्वसंग्राहक संप्रदायरहित जीवननिष्ठेसंबंधीचीच भावना आहे. तिला जागृत करून आपण सर्व धर्मांच्या लोकांत सहिष्णुवृत्ती व बंधुभावना जागृत करू शकू. जनतेच्या अंत:करणातील ही खोल जीवननिष्ठा जागृत करण्यानेच जनता

त्यागास व सेवेस तयार होईल आणि खरे जनतेचे राज्य निर्माण होऊन त्या जनता राज्यास आत्मराज्याचे अथवा रामराज्याचे स्वरूप प्राप्त होऊ शकेल. सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ती या रूपाने प्रत्येक अंतःकरणात वसत असणाऱ्या परमेश्वरास आवाहन करण्याचे एक साधन त्यांना प्रिय असणाऱ्या धर्माचा व अध्यात्माचा खरा अर्थ त्यांना समजावून देणे आणि तो अर्थ आपल्या जीवनात आचरून दाखविणे हेच आहे असा महात्मा गांधींचा या बाबतीतला दृष्टिकोण होता. बुद्धिवंतांच्या आक्षेपनिरसनापेक्षा जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन तिची जीवननिष्ठा जागृत करण्यावरच त्यांची मदार होती. शास्त्रीपंडित अथवा आधुनिक विद्वान या सर्वांहून त्यांचे लक्ष जनतेच्या अंतःकरणाकडे विशेष होते. त्यांना असे वाटत होते की, हे नवेजुने शास्त्रीपंडित ज्याला धर्म समजतात, त्याच्याहून जनतेच्या अंतःकरणात पूज्यत्व पावलेला आणि साधुसंतांनी आचरून दाखविलेला धर्म भिन्न व श्रेष्ठ आहे आणि तो धर्म सर्व निरनिराळ्या धर्मांच्या बुडाशी आहे याची मुग्ध जाणीव जनतेला आहे निदान हिंदुस्थानात तरी हा सर्वधर्मसमभाव जनतेच्या अंतःकरणात खोल रुजलेला आहे व त्याला आपण पुन्हा जिवंत करू शकू. हा सर्वधर्मसमभाव, ही सहिष्णुवृत्ती व इतर धर्मियांसंबंधीची बंधुभावना केवळ हिंदूंसच नव्हे तर आपणास परधर्मीय समजतात त्या इस्लाम धर्मियांसही आपण ही वृत्ती प्रेमाने, त्यागाने आणि सेवेने पटवू शकू. मौलाना आझाद, खान अब्दुल गफारखान इत्यादी धर्मपंडितांस व धर्मनिष्ठ संतांस जर आपले हे मत पटलेले आहे आणि अनेक सत्याग्रह संग्रामात जर हिंदूंच्या खांद्यास खांदा लावून मुसलमान लोक सहस्रावधी संख्येने सामील झालेले आपण पाहिले तर मुसलमान जनतेतील ही व्यापक जीवननिष्ठा धर्माच्या नावाने आपणास जागृत का करता येणार नाही. संतांचे व धर्मपुरुषांचे निःपक्षपाती प्रेमळ अंतःकरण आणि जनतेचे अंतःकरण या दोहोंनी धर्माचा जो व्यापक व सर्वसंग्राहक अनाग्रही, संप्रदायरहित अर्थ केलेला आहे तोच त्याचा खरा अर्थ असून ही पवित्र धर्मनिष्ठा मी प्रभावी बनवू शकेन असा त्यांना आत्मविश्वास वाटत होता. हा आपला विश्वास श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर यांच्या जीवनाच्या अनुभवसिद्ध अनुभवावर उभारलेला आहे असे त्यांना वाटत होते. तथापि धर्म शब्दाचा दुसरा एक संकुचित, आग्रही व संप्रदायनिष्ठ अर्थ आहे व त्या अर्थाचा धर्म राजकारणात घोटाळे व अनर्थ उत्पन्न करतो हेही त्यांना माहीत होते व दिसत होते. विशेषतः हिंदुराष्ट्रवादी व पाकिस्तानवादी हे या भ्रष्ट अर्थाने धर्माचा उपयोग करत आहेत हे त्यांना दिसत होते. पण त्यासाठी आपण धर्म हा शब्द सोडून देऊन आपल्या जीवननिष्ठेला दुसरा शब्द योजावा असे त्यांना अखेरपर्यंत वाटले नाही.

हिंदी राष्ट्रवाद हा हिंदू-मुसलमानांच्या ऐक्यावर उभारला गेला पाहिजे हे महात्मा गांधींचे तत्त्व केवळ त्यांचे नसून राष्ट्रसभा स्थापन झाल्यापासून तिच्या सर्व नेत्यांनी हे तत्त्व मान्य केले होते. पण मुस्लीम लीगने हिंदू आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत आणि ती एका राज्यात केव्हाही नांदणे शक्य नाही असा दुराग्रह धरून अज्ञानी मुसलमान जनतेला राष्ट्रसभेविरुद्ध प्रक्षुब्ध केले. १९४६ च्या ऑगस्टपासून मुस्लिमलीगने सिंध आणि बंगाल या प्रांतात आपल्या मंत्रिमंडळाच्या छायेचा आधार घेऊन हिंदू-मुसलमानांचे दंगे करण्यास सुरुवात केली होती. या दंग्यास भीषण स्वरूप कलकत्त्यात प्राप्त झाले. महात्मा गांधी डिसेंबर महिन्यात कलकत्त्याकडे गेले आणि २६ डिसेंबरपासून पूर्व बंगालातील खेड्यात पायी फिरून खेड्यातील मुसलमान जनतेत आपल्या मतांचा प्रचार करण्याचे व्रत त्यांनी अंगीकारले. अहिंसेच्या मार्गावाचून हिंदू-मुसलमानांचे ऐक्य घडविण्याचा दुसरा कोणताही उपाय खरा नाही. हिंदू आणि मुसलमान यांचे कायमचे ऐक्य झाल्यावाचून हिंदुस्थान अखंड राहू शकत नाही आणि हे कायमचे ऐक्य घडवून आणायचे तर हिंदू आणि मुसलमान जनतेला सर्व धर्म एक आहेत हे केवळ बुद्धीने नव्हे तर अंतःकरणाने पटले पाहिजे. हिंदू-मुसलमान जनतेच्या अंतःकरणात शेकडो वर्षांच्या सहवासामुळे सर्व धर्मांचे अद्वैत हे ठसलेले आहे आणि ते आपण पुन्हा जागृत करू शकू याबद्दल त्यांना शंका नव्हती. कलकत्त्यास गेल्यानंतर त्यांनी नौखालीस जाण्यापूर्वी कलकत्त्यातच शांतता प्रस्थापनेसाठी काही दिवस रहाणे आपणास आवश्यक आहे हे ओळखले म्हणून ते १३ ऑगस्ट रोजी कलकत्त्यातच राहिले. आणि तेथे निर्माण झालेल्या दंग्याचे वातावरण शांत

करून त्यांनी तेथे शांततेचे वातावरण निर्माण केले; तरीही त्यानंतर थोड्याच दिवसांनी कलकत्यात पुन्हा दंगे सुरू झाले हे पाहून महात्मा गांधींनी ता. १ सप्टेंबर रोजी दंगे शांत होईपर्यंत उपोषण करण्याचा निर्धार जाहीर केला. कलकत्यातील हिंदी लोक गांधीजींवर फार चिडलेले होते आणि एकदा तर त्यांच्या वसतिस्थानावर हल्ला करून त्यांना मारण्याचाही प्रयत्न काही गुंडांनी केला. पण गांधीजींनी उपवास सुरू केल्या. नंतर तीन दिवसांच्या आत कलकत्यात शांतता प्रस्थापित झाली. आणि ता. ४ सप्टें. रोजी पूर्ण शांतता झाल्याचे पाहून हिंदू–मुसलमान जमातीच्या पुढाऱ्यांनी शांतताप्रस्थापनेची हमी दिल्यावर गांधीजीनी उपवास सोडला. अशा प्रकारे गांधीजी हिंदू–मुसलमान ऐक्यासाठी झटत होते.

आपले आचरण हे दैवी असले पाहिजे व त्याचे मूळ धर्मामध्ये असले पाहिजे ही जी अढळ आणि अबाधित तत्त्वे आमच्या ऋषींनी घालून दिलेली आहेत त्याचे स्मरण आम्ही ठेवले पाहिजे. फक्त याच तत्त्वानुसार आम्ही चालले पाहिजे. जोपर्यंत आपण धर्माप्रमाणे वागणार नाही तोपर्यंत आमच्या इच्छा सफल होणार नाहीत. मग आम्ही कितीही महाप्रचंड योजनांचे भारे रचले तरी व्यर्थ ! भारतापाशी फार मोठ्या प्राचीन धर्माचे धन असल्यामुळे लोकांना देण्यासारखे त्याच्याजवळ पुष्कळच आहे म्हणून एकमेकांच्या धर्माबद्दल आपण जर सहानुभूती बाळगली, तर त्यांच्या गुणाबद्दल आदरभावना बाळगली तर आमच्यामधील ऐक्यभावनेची जोपासना व्हायला फार मोठी मदत होईल. या धर्माच्या प्रश्नांमध्ये आम्ही जो जो अधिक सहिष्णुता बाळगू तो तो आपल्या रोजच्या व्यवहारामध्ये अधिकाअधिक उदारता निर्माण होईल व हल्लीचे गैरसमज केव्हाच उडून जातील. हिंदू व मुसलमान यांच्यामध्ये या प्रकारच्या सहिष्णुतेची फार मोठी आवश्यकता आहे. पौर्वात्य व पाश्चिमात्य लोक यांच्यापेक्षा या दोन धर्मियांमध्ये जास्त सहिष्णुतेची आवश्यकता आहे. झगडे आणि दंगली याच्या योगाने भारतीयांमधील परस्पर मेळच उखडून टाकला जावा असे होता कामा नये. आपसामध्ये भांडणाराचे घर अखेर खाली येणार म्हणून भारतीय समाजाच्या सर्व पंथांत संपूर्ण ऐक्य व बंधुभाव यांची फार मोठी आवश्यकता आहे असे गांधीजीचे मत होते.

सर्व धर्मांना समान अशी नीतितत्त्वे ही राज्यसंस्थेला आधारभूत समजून त्यांच्या अधिष्ठानावर राज्याची उभारणी करावी.परतु त्या सर्व धर्मांना समान असणाऱ्या व्यापक नीतितत्त्वांना हिंदू–मुसलमान, शीख इत्यादी सांप्रदायिक धर्माचे संकुचित स्वरूप देऊन अशा धर्माच्या आधारावर राज्याची उभारणी करू नये व राज्यसंस्थेने धर्मशिक्षण देण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊ नये. महात्मा गांधी जेव्हा धर्मनिष्ठेने राजकारण करावे असे म्हणतात तेव्हा त्यांच्या मनातील आशय हिंदू-मुसलमानादी संकुचित, धार्मिक संप्रदायाच्या आधारावर राज्यसंस्था उभारावी असा नसतो व नव्हता हे उघड होते. त्यांचे धर्मनिष्ठ राजकारण हे विश्वव्यापक सत्याग्रही जीवननिष्ठेवर उभारलेले नीतिनिष्ठ राजकारण होते. या सत्याग्रही निष्ठेची प्रेरणा आपणास हिंदू धर्मातून झाली असल्यामुळे आपण जी सत्याग्रही निष्ठा संप्रदायशून्य व अनाग्रह वृत्तीने सर्व धर्मियांच्या अंतःकरणात निर्माण करत आहोत ते खऱ्या मानवधर्माचे भावी स्वरूप आहे असे त्यांना वाटत होते.

*

# आई

भेगाळलेल्या हातांनी धगधगत्या जाळावर
तीन दगडांच्या मोडकळलेल्या चुलीवर
तू भाकरीतला चंद्र भाजत होतीस
धुरकट धगीवर चंद्राला त्या शेकत शेकत,
शीतलता माझ्यावर उधळत होतीस
जिंदगीतल्या चांदण्यासाठी,
जगण्याचा पाढा पढवत होतीस
चुलवणातला निखारा घेऊन हाती,
कधी काळजाला कोवळ्या डागतही होतीस
टपोऱ्या आसवांनी ओघळताना गालावर,
त्याच हातांनी पुसताना आसवांना,
कोऱ्या मनावर तू संस्कारांचा शिलालेख,
लिहीत होतीस,
कारण, कारण तू माझी आई होतीस !

– कु. जयश्री बडवे
प्र. व. शास्त्र, 'बी'

# आगरकरांची विचारसृष्टी

माधुरी भागवत
द्वि. व. साहित्य

चालू वर्ष हे आगरकरांच्या 'सुधारक' पत्राचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून महाराष्ट्रात सर्वत्र साजरे केले जात आहे. त्या निमित्ताने आगरकरांच्या सुधारणावादी विचारांचे पुनःस्मरण या ठिकाणी केल्यास ते औचित्य-पूर्णच ठरणार आहे व त्याच हेतूने प्रस्तुत लेखामध्ये आगरकरांच्या विचारसृष्टीचा परिचय करून देण्याचा अल्पसा प्रयत्न मी केला आहे.

आपल्या सुधारणाकार्यासाठी आगरकरांनी गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सहकार्याने 'सुधारक' पत्राची निर्मिती केली व १५ ऑक्टोबर १८८८ रोजी 'सुधारकाचा' पहिला अंक प्रसिद्ध झाला. सुधारकातून सुधारणेच्या वैचारिक तत्त्वांना समाजाच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहचविण्याचा यथोचित प्रयत्न त्यांनी शेवटपर्यंत केला. सुधारकाच्या निर्मितीपूर्वी आगरकर त्यांचे सुधारणावादी लेख अथवा वैचारिक मते 'केसरी'तून प्रकाशित करीत होते. आजही समाजात न रुजलेल्या अशा आचार–विचारांचा, सर्वांगीण सामाजिक सुधारणेचा, विविध सामाजिक घटनांचा, संस्कारांचा ऊहापोह आगरकरांनी सुधारकातून त्या काळी केलेला होता. सुधारकाचे कार्य स्पष्ट करताना आगरकर म्हणतात, "ज्या तत्त्वांचे अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रे अधिकाधिक सुधारत चालली आहेत त्या तत्त्वांचा अंगीकार करण्यास आम्ही आनंदाने तयार झाले पाहिजे. ती तत्त्वे हा सुधारक महाराष्ट्र लोकांपुढे वारंवार आणील. असे करण्यास त्यास आज ज्याचा जारीने अंमल चालत आहे त्या लोकमताविरुद्ध बरेच जावे लागणार असल्यामुळे फार त्रास पडणार आहे. पण तो (सुधारक) त्याची पर्वा करणार नाही."

आगरकरांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांसाठी सांप्रत काळ अधिक अनुकूल आहे असे सांगितले. कारण त्यांच्या मते पारतंत्र्यात परकीय सरकार तिऱ्हाइताच्या वृत्तीने वागते. धार्मिक, सामाजिक सुधारणांकडे त्याचे लक्ष नसते. या स्थितीत सुधारक हवे ते इष्ट बदल करू शकतो. स्वातंत्र्योत्तर काळात असे स्वातंत्र्य सुधारकांना पूर्णपणे मिळत नाही. कारण तेथे मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या जागाही आपल्याच लोकांच्या हाती असतात. व ते त्यांना मान्य अशाच सामाजिक, धार्मिक सुधारणांकडे आपला अधिकार आणि वजन लावतात. आगरकर म्हणतात, "स्वतंत्र देशात जे सरकारी अधिकारी असतात ते सामाजिक व धार्मिक जुन्या मतांनाच नव्व्याणव टक्के अनुकूल असतात. त्यामुळे स्वतंत्र देशात धार्मिक व सामाजिक गोष्टींच्या संबंधाने नवीन विचार स्थापणे किंवा नवीन आचार स्थापणे फार कठीण असते."

आगरकरांना आपले कार्य स्वभूमीत, स्वलोकात, स्वधर्मात आणि स्व-आचारात राहून पार पाडावयाचे होते. त्यामुळेच आपल्या विचारांचे पूर्ण खुले स्पष्टीकरण देऊन ते इतर सुधारकांना तसेच समाजाला आपले म्हणणे पटविण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करीत होते.

सुधारणेचा अवास्तव आग्रह धरल्यास लोकांचा बुद्धिभेद होईल, समाजात तंटे निर्माण होऊन स्वराज्याच्या ध्येयापासून लोकांचे लक्ष विचलित होईल. अशी सुधारणाविरोधी जहाल राष्ट्रवादयांची भूमिका होती. आगरकरांना ती कधीच पटली नाही. आगरकरांना स्वातंत्र्याचे महत्त्व जाणवले नाही असे नाही. त्यांच्या मते स्थितिप्रिय, गतानुगतिक, अंधश्रद्धाळू समाजाचे परिवर्तनाचे कार्य देखील महत्त्वाचे होते. मिळणारे स्वराज्य सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय व समाज सुबुद्ध झाल्याशिवाय टिकणार नाही. म्हणून सर्वांगीण सुधारणेचा आगरकरांचा आग्रह होता. इंग्रजांशी लढा देऊन राज्यसत्ता प्राप्त झाली असता तिचे संरक्षण व तिचा सदुपयोग करता येईल असे शिक्षण लोकांस दिले पाहिजे या दृष्टीने राजकीय संघर्षाइतकीच सर्वंकष सामाजिक सुधारणांची कशी आवश्यकता आहे ते आगरकरांनी अनेकदा स्पष्ट केले आहे.

आगरकरांनी सुधारणेचा अर्थ पुढील शब्दात माडला· आहे. ते म्हणतात, "हिंदुस्थानची सुधारणा क्षणैक निश्चल होऊन मग गेल्या कित्येक शतकांच्या अवकाशात तिची पिछेहाट झाली आहे. तेव्हा या पिछेहाटीची कारणे शोधून ती नाहीशी करणे म्हणजेच सुधारणा." आगरकरांच्या सुधारणावादात सामाजिक जीवनातील सर्व अंगांचा समावेश झालेला आहे.

सामाजिक कार्यात आगरकरांप्रमाणे न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले इत्यादी निष्ठावंत व्यक्ती देखील कार्यरत होत्या. परंतु आगरकरांचा सुधारणावाद सर्वांहून वेगळा होता. काही बाबतीत त्यांचे विचार रानडे यांच्या विचारांप्रमाणेच होते. परंतु रानडे धार्मिक वृत्तीचे होते, तर आगरकर अज्ञेयवादी असून प्रत्येक प्रश्नाचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून शोध घेणारे होते. सामाजिक प्रश्नांचा विचार त्यांनी धर्मनिरपेक्ष दृष्टीने केला. दुसरे म्हणजे, प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकताना ते पाऊल बरोबर आहे की नाही हे समजण्यासाठी आपल्याला अंतिमाचे आकलन हवे असा आगरकरांचा विचार होता. बालविवाहाच्या चर्चेच्या वेळी त्यांनी चौदा वर्षे वयाला मान्यता दिली. परंतु त्यांच्या मते जेथे वधूवर स्वतःचे लग्न स्वतः ठरवितात तो प्रौढविवाह, आणि जेथे आई-वडील मुलामुलींचे लग्न स्वतः ठरवितात तो बालविवाहच मग वधूचे वय बावीस का असेना. रानडे यांच्या मते चौदा वयाला मान्यता देण्यास लोक तयार आहेत मग अंतिम साध्याचा मुद्दा काढून तंटा कशाला उभा करायचा ? एक पाऊल पुढे पडले तरी पुरे अशी रानडे यांची भूमिका होती. आगरकरांच्या मते, 'नेमके कुठें जायचे हे ठरविलेले नसेल तर पाऊल पुढचे की मागचे हे कसे ठरणार ?" कायद्याचा आधार सुधारणेला होण्याबाबत रानडे आणि आगरकर यांची एकवाक्यता होती. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचा सुधारणावाद परंपरेला धरून होता. आगरकरांचा सुधारणावाद पश्चिमी उदारमतवाद व बुद्धिवादी विचारांवर आधारलेला होता. सुधारणेची तत्त्वे पाश्चात्य देशात अस्तित्वात आहेत. फक्त त्या तत्वांचा आपण आंधळेपणाने अंगीकार न करता बुद्धिपुरस्सरतेने, जागृकतेने, पाश्चात्यांचे योग्य तेच उचलावे असा आगरकरांचा आग्रह होता. याउलट पाश्चात्य समाजसंस्थांचे श्रेष्ठत्व लोकांच्या मनात बिंबविल्यास त्यांच्यात न्यूनगंड जोपासला जाईल, असे चिपळूणकरांचे म्हणणे होते.

आगरकर हे महाराष्ट्रातील अग्रणी सुधारक म्हणून ओळखले जातात. ते एक सच्चे सुधारक होते. आचार-सुधारणे इतकाच भर ते विचारपरिवर्तनावर देत असत. आगरकरांच्या विचारांवर हर्बर्ट स्पेन्सर व जॉन स्टुअर्ट मिल् या दोघांचा प्रभाव दिसून येतो. परंतु आगरकरांनी आंधळेपणाने स्पेन्सर, मिल्ची री ओढली नाही. निष्फळ बाबींचा निष्कारण काथ्याकूट करत बसू नये या बाबतीत स्पेन्सर व त्यांच्यात एकवाक्यता आहे. परंतु कायद्याला विरोध करणारा स्पेन्सर आगरकरांना मान्य नाही.

आगरकरांच्या वृत्तीत स्वप्नाळूपणा नव्हता. सामाजिक सुधारणेची आवश्यकता नव्हे तर अपरिहार्यता त्यांना पटली होती. त्यांची ध्येय निष्ठा इतकी जाज्वल्य होती की पराभवाची खात्री असून ते सामाजिक सुधारणेच्या लढ्यात उतरले होते. ते स्वतः म्हणत "माझ्याप्रमाणे शंभर आगरकर निर्माण व्हावे लागतील तेव्हा समाज आधुनिक विचारसणीचा ज्ञाता होईल." आगरकर हे व्यक्ती-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. "समाजास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढी बंधने अपरिहार्य तेवढी कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत पुरुष व स्त्रियांस जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका द्यावयाचा." हे सुधारणेचे मुख्य तत्त्व आगरकरांनी

सांगितले आहे. आगरकरांचा सुधारणावाद समाजाच्या सर्व दूषित अंगांना स्पर्शन गेलेला आहे. बालविवाह नसावेत. विधवा पुर्नविवाहाला प्रतिबंध असू- नयेत, लोकांनी जमविलेल्या विवाहापेक्षा मुलामुलीने स्वतः ठरविलेला विवाह अस्तित्वात यावा, स्त्रियांना पुरुषां- प्रमाणेच शिक्षण द्यावे व कोणत्याही धंद्यात इच्छा असल्यास जाण्याची मुभा असावी. जातीमुळे कोणालाही विद्याप्राप्तीला किंवा कोणत्याही उद्योगात जाण्यास अडथळा येऊ नये, वगैरे सुधारणा आगरकरांच्या तत्त्व- विचारांशी बांधलेल्या होत्या.

आगरकरांनी कुटुंब-सुधारणेला अग्रक्रम दिला होता. ज्याप्रमाणे व्यक्ती कुटुंबाचा घटक त्याप्रमाणे कुटुंब हे राष्ट्राचे घटक असते. "गृहस्थिती सुधारल्याखेरीज भारताची राजकीय स्थिती कधीच सुधारणार नाही" असे आगरकरांचे मत होते. कुटुंबप्रश्नांमध्ये विषमता, गुलामगिरी, गतानुगतिकत्व, असहिष्णुता व जुलूम यांचे तेव्हा फारच प्राबल्य होते. आगरकरांचे म्हणणे, 'व्यक्ति- स्वातंत्र्य, संधिसमानता, परमतहिष्णुता, इत्यादी तत्त्वांचा घराच्या व्यवहारात प्रवेश झाल्याखेरीज राष्ट्राच्या उभारणीत लोकांना यथोचित यश मिळणे संभव नाही." गृहजीवनात पुरुषाने स्त्रीला अथवा पतीने पत्नीला नेहमीच बरोबरीचे स्थान दिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. चांगल्या समाजघडणीसाठी नागरिकांचा आचार-विचार चांगला हवा आणि तो घडविणे संस्कारातूनच शक्य होणारे व त्यासाठी कुटुंब- सुधारणा ही आवश्यक आहे असे आगरकरांचे मत होते. समाजकल्याणाचे मूळ कुटुंबकल्याणात आहे हे आगरकरांनी दाखवून दिले.

विवाहसंस्था ही कुटुंबसंस्थेचा पाया आहे. कारण कुटुंब हे समाजाचे घटक तर स्त्री-पुरुष हे कुटुंबाचे घटक असतात. आगरकरांनी हिंदू विवाह-पद्धतीतील गुणदोषांवर सविस्तर ऊहापोह केलेला आहे. हिंदू विवाह- पद्धत ही त्यांना कालबाह्य वाटत होती. ते म्हणतात, "सध्याच्या परिस्थितीत ही विवाह-पद्धती निकामी झालेली आहे. इंग्लड-अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांतील विवाह-पद्धतीशी तिची तुलना केल्यास भारतीय मागासलेपणा डोळ्यांपुढे ढळढळीत उभा राहतो. तेव्हा पाश्चात्य विवाहपद्धतीतील दोष वर्ज्य करून तिच्यातील ग्राह्यांश समाजाने तत्परतेने स्वीकारला पाहिजे." वधूवरांना आपला जोडीदार निवडण्याची, पूर्ण मोकळीक असली पाहिजे या मुद्यावर आगरकरांनी विशेष भर दिला. बालविवाहामुळे होणाऱ्या परिणामांची स्वातंत्र्याच्या, संमतीच्या, स्वयंनिर्णयाच्या तत्त्वांच्या ऱ्हासाची, बालविवाहामुळे स्वतःवर, संततीवर, समाजा वर होणाऱ्या दुष्परिणामांची ओळख समाजाला पटवून- देण्यासाठी आगरकरांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले.

पुर्नविवाह, केशवपन, सहगमन, गतभर्तृकेची आत्महत्या इत्यादी प्रश्नांबाबत आगरकरांनी समता व संमती तत्त्वांचा पुरस्कार केला आहे. पहिली पत्नी कालवश झाल्यावर जर पुरुषाला दुसरा विवाह करता येतो, तर तसे स्वातंत्र्य स्त्रीलाही असले पाहिजे असा आगरकरांनी विचार मांडला होता. केशवपनाची निंद्य, अमानुष चालीचे ताबडतोब निर्मूलन करण्यासाठी काय- द्याचे साह्य घेण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्या मते सुधारणाकार्यांत कायदा हवाच. सतीप्रथेमागील स्त्रियांच्या तयारीचे कारण सांगताना आगरकर म्हणतात "सती जाण्यामागे पतिनिष्ठा हे कारण नसून पुरुषांचा संकुचितपणा व निर्दयता आणि स्त्रियांची असहाय्यता व मनोदौर्बल्य हे होय." स्त्रियांबाबत सर्व समस्यांचे मूळ आगरकरांना विषमतेत दिसून येते. स्त्री-शिक्षणाला त्यांनी जोरदार पाठिंबा दिला होता. त्यांच्या मते मुलांप्रमाणे मुलींनाही शिक्षण दिलेच पाहिजे आणि ते एकच व एकत्र दिले पाहिजे. 'स्त्रीशिक्षण म्हणजे वंशांतर्गत शिक्षण' असे ते म्हणत. स्त्रीशिक्षणामुळे समता, संमती, पुर्नविवाह, प्रौढविवाह या सुयोग्य गोष्टींचे क्रियाकरण केले जाऊन केशवपन, सती, बाल- विवाह, यांसारख्या दुष्ट रूढी आपोआप नष्ट होतील असे आगरकरांचे मत होते.

आगरकरांचे व्यक्तिमत्त्व साधे होते. सुधारणेच्या ध्येयासाठी त्यांनी दारिद्र्याचाही स्वीकार केला. 'चित्ते- वाचि-क्रियायां एकरूपता' हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्टय होते. आगरकरांच्या आयुष्याची शेवटची सात वर्ष म्हणजे 'सुधारका' च्या सुरुवातीपासून त्यांच्या मृत्यू- पर्यंतचा काळ त्यांना खूप त्रासाचा व दगदगीचा ठरला. काही सहकारी मृत्यू पावले, तर टिळकांसारख्या मित्राशी मतभेद विकोपाला गेले. त्यांच्या सुधारणावादाला लोकांचा प्रतिसाद मिळण्याऐवजी निंदाच पत्करावी लागली. दम्याने प्रकृती सतत खालावत होती पण चित्त

विचलित न होऊ देता ते अविरत कार्यरत होते. आगरकरांचे कार्य व्यापक होते तरी त्य.च्या कार्याला काही मर्यादा दिसून येते. महात्मा फुले यांनी उपस्थित केलेल्या सामाजिक प्रश्नांसंबंधी फारशी चर्चा करताना ते आढळत नाहीत त्यांनी सतत उच्चवर्णीयांच्या सुधारणांचा विचार केलेला दिसतो आगरकरांचे विचार पुढील काही सुधारकांना मार्गदर्शक ठरले तरी सर्वसामान्य लोकांमध्ये त्यांचे विचार रुजले नाहीत. परंतु आगरकरांचे कार्यक्षेत्र मर्यादित असले तरी त्यांची दृष्टी संकुचित नव्हती हे खरे. आगरकरांना एक प्रकारे पराभव पत्करावा लागला. तरी त्यांचे विचार आणि त्यांच्या प्रतिपादनचे महत्त्व आजही कमी लेखता येणार नाही. समता, संमती, स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय, या चार पाच व्यक्तितत्त्वांवर आधारलेला सुखरूप समाजसंसार साधण्याचा आगरकरांनी शेवटपर्यंत प्रयत्न केला. १४ जुलै १८५६ च्या सोमवारी महाराष्ट्राच्या भूमीत जन्माला येऊन अल्पशा लाभलेल्या जीवनप्रवासात अविरत सामाजिक सुधारणेचे कार्य करीत राहून १७ जून १८९५, रोजी सुधारकाचा सातव्या वर्षाचा ३६ वा अंक सकाळी बाहेर पडला, त्याच्या अगोदर सुधारकाचे जनक गोपाळ गणेश आगरकर इतिहासाच्या पानावर आपले नाव ठेवून मृत्युलोकातून अंतर्धान पावले.

*

## एक प्रश्न

मी एक माणूस
एकाचा चुकून मला स्पर्श होतो
गढूळ पाण्याने अंघोळ करुन मी
स्वत:ला पवित्र करून घेतो
तो एक पक्षी,
माझा चुकून त्याला स्पर्श होतो
स्वत:च्या रक्ताने अंघोळ करून तो
स्वत:ला पवित्र करून घेतो
मग मी कोण ?

**— वडगावकर गणेश**
तृतीय वर्ष (शास्त्र)
(केमिस्ट्री विभाग)

## धग

काही दिवसांपूर्वी
मी एक वृक्ष पाहिला
वठलेला, पर्णहीन वृक्ष
हा वृक्ष पुन्हा वहरेल
दुष्काळात सोडून गेलेले
साथी पुन्हा त्यांच्या
शाखांवरती चिवचिवतील
पांथस्थ निवाऱ्याला येतील
वारा मस्तीत येईल
घुसळून वृक्षा
सळसळ हसविल
असे कुणी म्हटले असते
तर वेडेपणा ठरला असता
थोडयाच दिवसात
उन्मत्त कुऱ्हाड करील जमिनदोस्त
शुष्क काष्ठे होतील सरपण
ती जागा रिकामी होईल
सावली तर केव्हाच गेली
आता त्या सावलीची
साक्षही मिटेल
असेच कुणीही म्हटले असते
पुन्हा काही दिवसांनी
मी त्याच रस्त्याने गेलो
आणि......
आणि अध्याय संपलेला
नव्याने होता फळला
नाजुक पोपटी हास्य हसत
होता म्हणत—
मी कधी संपलोच नव्हतो
पर्णे झडली, शाखा सुकल्या
पण मूळांत अजून धग होती

**— शकुंतला मुकाणे**
तृ. व. साहित्य

# सखाराम बाइंडर : एक आगळे नाटक

कल्पना रणपिसे
तृ. व. साहित्य

१९५० नंतर मराठी नाटककारांची एक नवी पिढी अस्तित्वात आली आणि त्यामध्ये ज्या नाटककारांनी आपल्या लेखनकर्तृत्वाने पुढच्या काही दशकांवर आपली लेखनमुद्रा प्रस्थापित केली, अशा नाटककारांमध्ये श्री. तेंडुलकर हे एक महत्त्वाचे नाटककार होत. तेंडुलकरांनी पंचवीस नाटके, अनेक 'एकांकिका', 'बालनाट्ये', 'नभोनाट्ये' असे नाट्य-लेखन केलेले आहे. विजय तेंडुलकर हे आजच्या प्रतिभावंत नाटककारांपैकी एक नाटककार होत. सुरुवातीस एकांकिका आणि नभोनाट्य यांचे लेखन तेंडुलकरांनी केलेले आहे. १९५१–५२ च्या सुमारास भारतीय विद्याभवन या संस्थेने नव्याने सुरू केलेल्या पहिल्या आंतरमहाविद्यालयीन एकांकीका स्पर्धेच्या निमित्ताने तेंडुलकरांचे नाट्य-लेखन सुरू झाले.

तेंडुलकरांचे 'सखाराम बाइंडर' हे मात्र सर्वात विवाद्य ठरलेले नाटक आहे. या नाटकाचा प्रथम प्रयोग १० मार्च १९७३ रोजी शिवाजी मंदिर, दादर येथे सादर करण्यात आला. ८ एप्रिल १९७३ नंतर या नाटकावर लगेच बंदी घालण्यात आली. जाहीर प्रयोगावर बंदी घातल्यामुळे खाजगी प्रयोग करणे श्रेयस्कर वाटले. वर्तमानपत्रांतून उलट–सुलट चर्चा सुरू होत होत्या. मराठीबरोबरच इंग्रजी, हिंदी, गुजराथी दैनिके, साप्ताहिके व मासिकांमधून सखाराम सर्व ठिकाणी गाजत होता.

तेंडुलकरांच्या एकूण नाट्य-लेखनात हे नाटक वेगळे वाटते. याचे पहिले कारण असे की, एका निर्व्याज, रोमँटिक, स्वप्नरंजनपर आणि म्हणूनच हळव्या अशा त्यांच्या भूमिकेपासून ते या नाट्य-लेखनात मुक्त झाले आहेत. समाजापासून दुःख भोगणारी त्यांची पात्रांची रचना ही प्रस्थापित सस्कृतीपासून बरीचशी वेगळी, आपल्या स्वतःच्या मूल्यांच्या आधारे जीवन जगू पाहाणारी, जीवन घडवू पाहणारी असल्याचे दिसून येते.

'सखाराम बाईंडर' या नाटकात सखारामाच्या जीवनात 'लक्ष्मी' आणि 'चंपा' या दोन स्त्रिया येतात आणि सखारामचे जीवन बदलून जाते. सखारामच्या जीवनात होणारे भावपरिवर्तन या नाटकात अभिव्यक्त केले आहे. या नाटकात केवळ सखारामच्याच जीवनात भावपरिवर्तन घडते असे नव्हे तर असेच एक भावपरिवर्तन 'लक्ष्मी' आणि 'चंपा' यांच्याही जीवनात घडते. या तीन पात्रांच्या परस्पर संबंधांतून तिघांमध्येही घडणाऱ्या भावपरिवर्तनातील नाट्य येथे साकार केले जात आहे.

लक्ष्मी सखारामच्या जीवनात येते आणि नाटकाला सुरुवात होते. नवऱ्यांनी टाकलेल्या बायांना आश्रय द्यावयाचा असा सखारामचा रिवाज आहे. त्याचे लग्न झालेले नाही आणि लग्नाच्या बंधनात अडकवून घेण्याची त्याची तयारीही नाही. निराधार स्त्रीला घरी आणावयाचे आणि दोघांपैकी कोणालाही कंटाळा आला किंवा

त्यांचे पटेनासे झाले की तिला घराबाहेर काढावयाचे ही त्याची पद्धत आहे. आश्रयाच्या मोबदल्यात घरात असेपर्यंत तिने 'बायको' सारखे रहावयाचे परंतु 'पती'ची भूमिका वठविण्याची जबाबदारी सखारामने स्वीकारायची नाही ही त्याची रीत असल्याचे दिसते. सखारामाच्या दोन्ही भुका तिने भागवायच्या. तक्रार करावयाची नाही, सखारामाची इच्छा आणि आज्ञा हीच प्रमाण मानावयाची, तो काय करतो अन् कसा वागतो यात दखल द्यावयाची नाही ही त्याची रीत आहे. बापाच्या जाचाला कंटाळून लहानपणीच सखारामाने घर सोडलेले आहे. आईनेही त्याचा सतत दुस्वास केला. ब्राह्मणाच्या पोटचा असूनही त्याच्यावर फारसे ब्राह्मणी संस्कार नाहीत प्रेसमध्ये बाइंडर म्हणून तो काम करतो. समाजात त्याला फारशी प्रतिष्ठा नाही. घरदार, संस्कार, सामाजिक प्रतिष्ठा यांचा स्पर्शही आयुष्यात झालेला नाही. समाजात वावरत असूनही कुठल्याही व्यक्तीशी त्याचे सांस्कृतिक पातळीवरचे भावसंबंध प्रस्थापित झालेले नाहीत. त्याच्या प्राकृतिक गरजा भागविण्याची, या गरजांवर संस्कार करण्याची जबाबदारी कोणीही स्वीकारली नाही. म्हणूनच तो घरदार, सामाजिक संस्था यांच्या विरोधात उभा आहे. आणि म्हणूनच त्याला माणसांच्या प्रकृतीची शरीराची अधिक जाण आहे. 'शरीरा'च्या गरजा दाबणाऱ्या संस्कृतीवर आणि धर्मावर त्याचा राग आहे. खोटेपणाची त्याला चीड आहे. त्याच्या भोवतीची माणसे 'लपवा–छपवीनं झक मारताना' त्याला दिसू लागतात. एकीकडे 'शरीर' नाकारणारी भाषा बोलतात आणि दुसरीकडे शरीरापुढे शरण जातात हे सखारामला उमजू शकत नाही. म्हणून शरीराबाबत केलेला खोटेपणा मंजूर नाही. अशा या सखारामने चार भिंतीच्या आत आपले 'राज्य' स्थापन केले आहे. या राज्यात सामाजिक संस्था, मूल्ये घेऊन येणाऱ्या माणसांना प्रवेश नाही. सखारामाकडे दाऊद शिवाय कोणी येत जात नाही. दाऊद हा सखारामापेक्षा वेगळा असला तरी त्याला हा सखाराम मंजूर आहे. म्हणूनच त्याला इथे प्रवेश आहे. दाऊदनं हा सखाराम थोडा जरी अमान्य केला तरी सखाराम त्याला बाहेर काढतो, त्याला प्रवेश नाकारतो. सखारामने बाई आणली की भोवतालची पोरेसोरे त्याच्या घरात डोकावू पाहातात तेव्हा 'सीमादक्ष' सखाराम त्यांना चोपतो. नाटकाची सुरुवातच या प्रसंगाने होते.

अशा या सखारामाच्या जीवनात 'लक्ष्मी' येते आणि सखारामामध्ये कळत नकळत एक परिवर्तन घडते. लक्ष्मीपूर्वी सहा बाया सखारामाच्या जीवनात येऊन गेल्या आहेत. या बायांनी सखारामाच्या जीवनावर कसलेच संस्कार उठवले नाहीत काय? सखारामाच्या जीवनात परिवर्तन घडविणारी लक्ष्मी ही पहिलीवहिलीच स्त्री आहे काय? नाटकाच्या पहिल्या अंकात लक्ष्मी आधीच्या दोन स्त्रियांचे उल्लेख येतात. यापैकी चौथी फक्त देवपूजा करणारी आणि पाचवी दोन मुलांची आई क्षयी नवऱ्याच्या सदऱ्याची पूजा करणारी. या सर्वच बाया बाहेरच्या जगातील आहेत. नाइलाजानंच सखारामाशी त्यांनी 'संसार' केला आहे. सखारामचा 'संसार' आपला वाटावा असा हा संसारच नाही.

अशा परिस्थितीत 'लक्ष्मी' सखारामच्या जीवनात आली आहे. मूल होत नाही म्हणून तिला नवऱ्यानं टाकली आहे. वयानं प्रौढ आणि थकलीभागलेली आहे. देवधर्म आणि नवरा यांवर तिची विलक्षण श्रद्धा आहे. सखारामाच्या घरात आपले बोचके घेऊन प्रथम जेव्हा ती येते तेव्हा ती धास्तावलेली, बावरलेली आहे. अशा अवस्थेत सखाराम आपला करार तिला ऐकवतो आहे. ती तो निमूटपणे ऐकते आहे. ते संस्कार आणि श्रद्धा घेऊन ती येते. त्यामुळे आल्या आल्याच ती देव कोठे आहेत म्हणून चौकशी करते. येथूनच नाटकातील संघर्षालाही सुरुवात झाली आहे. देवाच्या कृपेने सारेच चांगले होते म्हणून ती प्रथम देवाच्या तसबिरी मांडते. पहिल्यांदा आपल्या परीने सखारामशी शरीरसंबंध टाळू पाहते. परंतु तो अटळ आहे हे लक्षात येताच त्याच्या नावानं (चोरून) मंगळसूत्र बांधून ती ह्या संबंधात आपल्यापुरती धार्मिक मान्यता देऊन टाकते. सखारामच तिचा देव बनतो.

सर्वसामान्यत: जसा नवरा वागतो आणि छळतो (तिचा पूर्वीचा नवराही छळायचा) तसाच सखारामही वागतो, छळतो यात तिला तसे नवे काहीच नाही. किंबहुना नवऱ्याने असेच वागायचे असते असेच तिला वाटते. सखाराम जेव्हा जेव्हा तिला मारहाण करतो तेव्हा तेव्हा कसलीही तक्रार न करता तो ती निमूटपणे सहन करते. लक्ष्मीच्या व्यक्तिमत्त्वात निरागस प्रेमाचे

एक अंतःसूत्र आहे. मूलबाळ नसलेली आणि नवऱ्याचे प्रेम न लाभलेली ही स्त्री किडयामुंग्याशी आणि कावळयासारख्या पक्षांशी एक नाते जोडते. वात्सल्याचा त्याच्यावर वर्षाव करू पाहते. 'मुंगळा' आणि 'कावळा' हे तिचे मित्रही 'पुरुष' जातीचे आहेत आणि त्यांना एक आक्रमक पुरुषत्वाचा अर्थही आहे. (असेच आक्रमक पुरुषत्व मारहाण करणाऱ्या सखाराममध्येही तिला गवसले आहे) तिचा हा मुंगळा साखरेच्या दाण्याला तोंड लावण्याआधी सावकाश त्या दाण्याभोवती फिरतो आणि कावळा कर्कशपणे खिडकीत कावकाव करतो! लक्ष्मीचे आपल्या मुंगळयाशी चाललेले बोलणे सखाराम ऐकतो आणि त्याला एका वेगळयाच लक्ष्मीचे दर्शन होते. सखारामचे आक्रमक वागणे हे लक्ष्मीला जसे मान्य आहे तसेच लक्ष्मीचे वात्सल्ययुक्त प्रेम सखारामाला हवे आहे. निरागस वात्सल्ययुक्त प्रेम हे लक्ष्मीच्या व्यक्तिमत्त्वाचे शक्तिस्थान आहे. सखारामाला नवरेपणाचा अधिकार गाजवू देऊनही लक्ष्मी आपला 'स्त्री' चा अधिकार गाजवल्याशिवाय सोडीत नाही. घरातला देवधर्म, घरातला कारभार हे तिचे कार्यक्षेत्र. यातला तिचा अधिकार ती निग्रहाने बजावते. तिच्या वर्तनातून सखारामाला पहिल्यांदा 'घर' लाभले आहे. तो स्वतः देवधर्म, पूजाअर्चा करू लागतो. आपली व्यसने काबूत ठेवायला शिकतो.

वयाच्या उतरणीला लागलेली छळानं उपासातापासानं खंगलेली लक्ष्मी त्याला हवे ते सुख, हव्या त्या प्रमाणात देऊ शकत नाही आणि आपले होणारे परिवर्तनही त्याला पूर्णतः मान्य नाही. अशातच लक्ष्मीला घराबाहेर काढण्याचे ठरवतो. लक्ष्मी घरातून जाते. परंतु जाताना सखारामला 'चटका' लावून जाते. त्याच्या मनात खोलवर कुठेतरी वेगळे ठसे उमटवून जाते. हे ठसे चंपाच्या सहवासात आल्यावर सखारामला उमगू लागतात.

नाटकाच्या दुसऱ्या अंकात चंपाचे आगमन होते आणि नाटक अधिक गुंतागुंतीचे बनत जाते. 'लक्ष्मी' प्रमाणेच 'चंपा' ही इतर स्त्रियांपेक्षा वेगळी आहे. ती लक्ष्मीपेक्षा तर फार वेगळी आहे. सखारामकडे आलेल्या इतर स्त्रियांप्रमाणे तिला नवऱ्याने टाकलेली नाही तर तिनेच नवऱ्याला टाकलेले आहे. तरीही तिच्या नवऱ्याला तिचे आकर्षण आहे. तो तिचा शोध घेत सखारामाच्या घरी आलेला आहे. तिच्या शरीरसौंदर्यासाठी तिचा नवरा वेडापिसा झाला आहे.

सखारामच्याही जीवनात चंपाच्या रूपाने असे ओजक शरीर प्रथमच आलेले आहे. चंपाचे ओजक शरीर आणि प्रत्यक्ष संबंधाबाबत तिचा सखारामला होणारा विरोध यामुळे सखाराम अधीकच उतावळा बनला आहे. चंपा–सखाराम संबंध हे दाऊदमुळे आणि चंपाच्या नवऱ्यामुळे अधिकच गुंतागंतीचे होतात. चंपा येताच दाऊदच्या रूपाने एक प्रतिद्वंदी सखारामापुढे उभा राहतो. चंपा दाऊदचे कौतुक करताच तो असूयेने पेटतो. चंपाला जपण्याची एक अधिक जबाबदारी आपल्याला घ्यावी लागणार हे त्याच्या लक्षात येते आणि तो चंपाचा अधिकच अनुनय करू पहातो.

सखारामच्या व्यक्तिमत्त्वात परिवर्तन घडविणारे आणि सखाराम–चंपा संबंध निश्चित करणारे दुसरे पात्र म्हणजे चंपाचा फौजदार नवरा.

चंपाच्या जीवनात सखाराम येऊनही तिच्या जीवनात महत्त्वाचे वृत्यंतर मात्र घडत नाही. कारण एकापरीने सखाराम तिच्या नवऱ्यासारखाच आहे. दाऊदच्या रूपाने मात्र चंपाच्या जीवनात एक वेगळा 'पुरुष' आला आहे. या दाऊदमुळेच चंपाच्या जीवनात एक परिवर्तन घडले आहे.

अशा एका वातावरणात लक्ष्मी परत येते. लक्ष्मीच्या पुनरागमनाच्या घटनेपासून वास्तवाच्या पातळीवरील या नाटकाला प्रतीकाच्या पातळीवर एक नवे परिणाम प्राप्त होताना दिसते. लक्ष्मीच्या आगमनाबरोबरच एक वेगळाच संघर्ष आकार घेऊ लागला आहे. या संघर्षाला एकदर्शनी वास्तवाची पातळी मानसिक आणि प्रतीकात्म वास्तवाचीही पातळी आहे. सखारामाच्या करारात लक्ष्मीचे येणे बसत नाही म्हणून तो तिला बाहेर काढू पाहतो, हे एक दर्शनी वास्तव येथे प्रकट होते.

मारहाण होऊनही 'लक्ष्मी' जात नाही. तेव्हा सखाराम मृदंगावरची धूळ पुनः झटकतो. बेभानपणे मृदंग वाजवतो. मृदंग ऐकून दाऊद येतो आणि म्हणतो, 'मृदंग सुना – लगा, जैसे पुराणे दिन फिर आगये, सखाराम.' अर्थातच हे पुराणे दिवस जसजसे रुजू लागतात तसतसे चंपाच्या सहवासातील नवे दिवस हरवू लागतात. आपले हे नवे दिवस घट्ट पकडून ठेवण्याचा सखाराम आटोकाट प्रयत्न करू लागतो, परंतु पराभवा-

शिवाय त्याच्या हाती काहीच लागत नाही. 'लक्ष्मी'चे अस्तित्व, रात्रीच्या क्षीण प्रकाशात 'सीताराम–सीताराम'चा घोष थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न करतो पण त्याला हे शक्य होत नाही. सखारामाचे रूपांतर चंपाच्या फौजदार नवऱ्यात होत जाते. त्याचे उपभोगाचे वांझ प्रयत्न चंपा झिडकारते तेव्हा लक्ष्मीला हद्दपार करण्याचा सखाराम शेवटचा प्रयत्न करतो.

घराबाहेर पडण्याच्या तयारीत असलेली लक्ष्मी त्याला दाऊद–चंपाच्या चोरट्या संबंधाची माहिती देते. आता सखाराम आपला पराभव पुसण्याचा निकराने प्रयत्न करतो – तो चंपाचा खून करतो! खरे म्हणजे चंपाचा खून हा पहिल्या अंकात भेटलेल्या सखारामाचा पूर्ण पराभव! चंपाचा खून म्हणजे त्याने स्वतःला, स्वतःच्या मूल्यसरणीला नाकारतो. हा खून होताच सखारामाचे चैतन्यच हरवून जाते. तो चंपाला मारतो परंतु तो त्यात आपलेच मरण अनुभवतो. उरते ती फक्त लक्ष्मीच्या रूपातील पाप पचविणारी आणि जिवंत राहणारी मूल्यसरणी!

*

---

## तुझ्या स्मृती

क्षणाक्षणास का मला सतावती तुझ्या स्मृती?
उदास पाहुनी मला सुखावती तुझ्या स्मृती
मनात हिंडहिंडुनी थकून चालल्यावरी
अखेर लोचनात ह्या स्थिरावती तुझ्या स्मृती
'असाच त्रास देउनी छळू तुला क्षणोक्षणी'
पुन्हा पुन्हा मला असे बजावती तुझ्या स्मृती
कधीच शुष्क जाहली रडून लोचने जरी
तरी पुन्हा रडावयास लावती तुझ्या स्मृती
उदास, खिन्न सांजवेळ दाटता सभोवती
तमातुनी मनास भेडसावती तुझ्या स्मृती
नको नको जरी मला करून टाकले तरी....
कळे न का पुन्हा मनास भावती तुझ्या स्मृती!

– प्रदिप कुलकर्णी
द्वि. व. वाणिज्य (सी)

## बा

बा, काल मी तुला भेटायला आलो,
तुला राजभवनात पाहीलं
तू काय दिसलाच नाय
कोणी तरी सांगितले तू चैत्यभूमीवर आहेस
तिथं ही तू नव्हतास,
तिथं,
तुझ्या नावाची जत्रा भरली होती
त्यात अनेक जादुगार व्हते
ते आपआपल्या परीनं
सनया अन् तुताऱ्या वाजवत होते
पण त्यांच्यात एक सूर नव्हता
ह्या 'बे' सुरांनी बधीर झालो व्हतो
ह्या सगळ्याला!! कंटाळलो होतो,
शेवटी वैतागून इराण्याच्या होटेलात बसलो,
शेवटी
तू मला दिसलास
हातगाडी ओढताना
तुझे डोळे रक्ताळले होते
कपडे घामाने चिंब झाले होते
तुला पाहून मला लय आनंद झाला
वाटलं,
धावत जाऊन मिठी मारावी
तुझे मुके घ्यावे
मी उठायला लागलो
पण माझे पाय खुर्चीत अडकले व्हते
मी स्वतःला सावरलं
तू माझा होता
पण, आता मी तुझा नव्हतो
तू मात्र तसाच चालत राहिला
एकटाच .........!!

– प्रकाश पवार
द्वि. व. कला

# 'विशाखातील' क्रांतिकारी कविता

शकुंतला मुकाणे
तृ. व. साहित्य

वैशाखी तप्तपणा व जोश कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'-तील अनेक कवितांमध्ये आढळतो. बहुतेक कवितांमध्ये क्रांतीचे सूत्र आहे. प्रेम कविता, निसर्ग कविता, सामाजिक आशयाच्या कविता या सगळ्यांत क्रांतीचा पिंड आहे. त्यांची प्रेम कविता ही निव्वळ प्रेम कविता न राहता क्रांतीचाही पिंड जोपासते म्हणूनच ती वैशिष्टयपूर्ण ठरली आहे. कुसुमाग्रजांची कविता अनेकधारी प्रवाहातून निर्माण झालेली एक वैशिष्टयपूर्ण धारा आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेवर सावरकरांच्या कवितेचा प्रभाव पडल्याचे जाणवते. दोघांनी अंगीकारलेल्या दिव्य दाहकाची पूजा व दास्यमुक्तीसाठी स्वीकारलेली आत्मसमर्पणाची, त्यागाची वृत्ती या साम्यातून हे अधिकच प्रत्ययास येते. मृत्युंजयी जिद्द दोघांच्याही ठिकाणी आढळते. सावरकरांच्या कवितेतील 'यज्ञ' कल्पनेने कुसुमाग्रजांच्या मनावर खोल संस्कार केले आहेत. याचा प्रत्यय त्यांच्या 'हिमलाट', 'समिधाच सख्या या', 'गर्जा जयजयकार' यांसारख्या कवितांमधून येतो. सावरकरांच्या कवितेशी साम्य दाखवत असतानाच सावरकरांनी स्वीकारलेल्या आशयाच्या मर्यादा कुसुमाग्रजांनी स्वीकारलेल्या नाहीत. हे मात्र त्यांचे विशेषत्व होय.

क्रांतिकाराची सिंहगर्जना, त्याचा आवेश, त्यागाची तीव्र इच्छा ज्या तडफेने ते–

'गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार'

या ओळींतून मांडतात, त्याच त्वेषाने ते सामाजिक विषमतेला वाचा फोडतात.

'कशास आयुष्य देवा, इतुके
शतकामागुनी जाती शतके
आणि जागा हो मोकळी तळाशी
पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी ?'

शतकानुशतके दिशाहीन जीवन जगणाऱ्या समाजातील विशिष्ट स्तराचे तप्त निःश्वासच वरील ओळींत प्रत्ययास येतात.

विशाखातील कविता वाचताना एक गोष्ट सतत जाणवते ती म्हणजे कुसुमाग्रजांची वृत्तीच क्रांतिकारी आहे. त्यांना दिव्य, भव्य, उत्कटतेचे वेड आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक काव्यात क्रांतीचे बीज आहे. काही ठिकाणी या बीजाचे वृक्षात रूपांतर झाले आहे तर काही ठिकाणी ते अधुनमधून डोकावत राहते. कुसुमाग्रज हे आशावादी कवी आहेत त्यामुळे तेजःपूजा हा त्यांचा मनोधर्म आहे आणि याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या प्रेम कविता, क्रांती कविता, निसर्ग कविता, सामाजिक कविता यांमधून येतो. म्हणूनच त्यांनी त्यांच्या कवितांना दिलेली समिधांची उपमा सार्थ वाटते.

'क्रांतीचा जयजयकार', 'सात', 'जालियनवाला बाग', 'पावनखिंडीत', 'आव्हान', 'कोलंबसाचे गर्वगीत' यांसारख्या त्यांच्या क्रांती कवितांमधून मराठी कवितेत नवीन असलेले समूहमनाचे अपूर्व व अद्‌भुत

दर्शन घडते. त्यांच्या सामाजिक कविताही याला अपवाद नाहीत. त्यांच्या कवितेतील क्रांतीवीर, शूर, त्यागी आहेत. तसेच ते आशावादीही आहेत. म्हणूनच ते म्हणतात–

'कशास आई भिजविसि डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वाळांतुन भावी क्रांतीचे नेते'

या ओळीतर कोणत्याही राष्ट्राला अमावस्येच्या काळ्या-कुट्ट दिशाहीन अंधारात उज्ज्वल, दैदीप्यमान ताऱ्यांप्रमाणे अमर प्रेरणा व अनंत आणि अभंग आश्वासने देत राहतील.

'कोसळल्या उल्का जळत सात दर्यात
वेडात मराठे वीर दौडले सात!'

'सात' या अगदी छोटे सूत्र असलेल्या खास मराठी बाण्याच्या कवितेतून कुसुमाग्रजांनी बलिदानाचे महान रोमहर्षक चित्र उभे केले आहे.

कुसुमाग्रजांना भव्यतेचे, उदात्ततेचे, मांगल्याचे, उत्कटतेचे वेड आहे. याचा प्रत्यय विशाखातील अनेक कवितांतून येतो–

'नभि लागे तारांचे मोहळ,
भुलवी त्याची क्षणिक प्रभावळ,
रात्रीचे हे आश्रित केवळ,
ही मशाल त्यावर धरा जरा,
हा काठोकाठ कटाह भरा!'

जुनं स्वप्नील, भविष्यकाळात रमणार जीवन टाकून वास्तव जीवनाला सामोरे जाण्याचा संदेश वरील ओळीतून कवीने दिला आहे.

'घट तेजाचे भवति ओतित
असंख्य रवि–राजाचे प्रेषित
महाद्वार पूर्वेचे खोलुन क्षितिजावर येती!'

'किरणांचा उधळून पसारा देवदूत कोणी
काळोखात खोदित बसला तेजाची लेणी'

'नको क्षुद्र शृंगार तो दुर्बलांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे!'

'अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला'

या वरील ओळीतून भव्यता, उत्कटता प्रत्ययास येते.

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी, गरिबांच्या झोपडीत सुखेनैव संचार करणाऱ्या व श्रीमंतांच्या महाली कधी न फिरकणाऱ्या हिमलाटेचा (प्रतीकात्मक) संहार करण्यासाठी कवीने केलेले आवाहन असेच भव्य, दिव्य आहे. कवी म्हणतो–

'ज्योतींतुनि धावत या तेज:कण सारे
या यज्ञांतिल अन् सरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे'

विरोधात्मक, प्रतीकात्मक, नाट्यात्मक रचना हे त्यांच्या काव्याचे आणखी काही विशेष सांगता येतील. त्यांच्या कवितेतील सुरुवात आणि शेवट यांच्यातील विरोधात्मक स्थिती वाचकाच्या मनावर परिणाम करते, नाट्यमयता साधते.

'अहि–नकूल' मध्ये सुरुवातीला

'थरथरती झुडपे हादरती नववेली
जग गुलाम सारे या सम्राटापुढती'

या शब्दांत मंथर नागाच्या दहशतीचे दाहक वर्णन आहे तर कवितेच्या शेवटी त्याची दयनीय अवस्था वर्णित केली आहे–

'पिंजून कापसापरी पडे तो नाग,
ते खंड गिळाया जमले कीटक भोती!'

'नको ग! नको ग!
आक्रंदे जमीन
पायाशी लोळत
विनवी नमून–'

इथे जमिनीची व्यक्त होणारी लाचारी, आर्जवे, विनवणी कवितेच्या शेवटी राहत नाही. उद्दाम सत्ताधाऱ्यांचे प्रतीक असलेली आगगाडी शोषित जनतेचे प्रतीक असलेल्या जमिनीच्या क्रांतीपुढे नमली आहे–

'उलटी पालटी
होऊनी गाडी ती
हजार शकले
पडली खालती'

'माळ', 'बंदी', 'गुलाम', 'पाचोळा', 'लिलाव', 'आगगाडी आणि जमीन' यांसारख्या कवितांमधून कवीची सामाजिक विषमतेविषयीची चीड व्यक्त झाली आहे. कवीच्या संवेदनशील मनात अन्यायाच्या उसळणाऱ्या ज्वालामुखीचा तो उद्रेक आहे. ही सामाजिक विषमता केवळ एका देशापुरती, एका वर्गापुरती, एका ठराविक काळापुरती मर्यादित नसून ती जागतिक, सर्व धर्मीय व सर्वकालीन झाली आहे.

# अर्थसंकल्प
# कितपत मृगजळ ! कितपत वास्तव !

सुनिल जनार्दन खोल्लम
तृ. व. वाणिज्य (ब)

यंदाचे वर्ष निवडणुकीचे असल्यामुळे लोकप्रियतेवर लक्ष ठेवून सर्वांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करणारा अर्थसंकल्प सादर केला जाईल, असा अंदाज होत होता. अर्थमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी सादर केलेला १९८९–९० चा केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसामान्याना दिलासा देणारा आहे, असे अनेक मान्यवर म्हणत आहेत, परंतु हा दिलासा फसवा आहे. एका हाताने दिले व दुसऱ्या हाताने काढून घेतले, असा प्रकार अनेक सवलतींबाबत केला आहे.

दारिद्र्य निर्मूलन, रोजगार वाढ, बचतीला प्रोत्साहन, शेतीचा विकास वगैरे गोष्टींवर या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. सिमेंट व अॅल्युमिनिअमवरील नियंत्रणे रद्द, सोन्याच्या दागिन्यांच्या निर्यातवाढीस प्रोत्साहन, ५० हजार रुपयांवरील उत्पन्न-गटावर करवाढ, तसेच पानमसाल्यापासून दूरचित्रवाणीपर्यंत व सिगारेटपासून संगणकापर्यंत विविध वस्तुंवर करवाढ ही त्याची ठळक वैशिष्टये आहेत.

पगारदार लोकांना केवळ आभासात्मक आयकर सवलत देणारा, बड्या पगारदारांना आठ टक्के अधिभार लावणारा, व्यापाऱ्यांवर – उद्योगपतींवर चौफेर हल्ला करणारा परंतु सामान्य नागरिकांना निराश करणारा हा अर्थसंकल्प आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन बनवलेला हा अर्थसंकल्प आहे, असे म्हटले जात असले तरी अर्थमंत्री त्यातही यशस्वी झालेले नाहीत.

या अर्थसंकल्पात 'रोजगारवाढी'वर भर देण्यात आला आहे. 'पं. जवाहरलाल नेहरू सधन ग्रामीण रोजगार योजना' नावाची एक रोजगार योजना सुरू करण्यात येईल. पन्नास हजारांहून अधिक वेतन घेणाऱ्या नोकरदारांकडून ८ टक्के अधिभार घेतला जाईल. त्यातून जमा होणारी ५०० कोटी रुपयांची रक्कम १२० मागास जिल्ह्यांत नव्या रोजगारसंधी उपलब्ध करण्यासाठी वापरली जाईल. नव्या संधी उपलब्ध करण्याच्या कार्यक्रमाला अधिक जोर व बळकटी येण्यासाठी 'ग्रामीण रोजगार योजना' व 'रोजगार हमी योजना' या दोन्ही योजना एकत्र करून त्याची विकेंद्रित स्तरावर अंमलबजावणी केली जाईल. नव्या अधिभाराचे ५०० कोटी रुपये धरून एकूण १७११ कोटी रुपये या योजनेवर खर्च होतील. दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक कुटुंबातील एका तरुणाला नोकरी देण्याची योजना आहे. परंतु या योजनेचा लाभ गरीबांना किती मिळेल याबाबत शंकाच आहे.

पगारदार मध्यमवर्गीयांचीही एका अर्थाने या अर्थसंकल्पात फसगतच झालेली आहे. आयकर दरात केवळ पाच टक्के सूट देण्याचे औदार्य दाखविण्यात आले. २५,००० रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पगारदारांना आयकरातून वगळण्यात येईल अशी सर्वसामान्यांची अपेक्षा होती. परंतु आयकराचा दर २५ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर आणण्यापर्यंतच अर्थमंत्र्यांनी औदार्य दाखविले.

या अर्थसंकल्पातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे संरक्षणखर्चात कपात. मागच्या वर्षीपेक्षा तो २०० कोटी रुपयांनी कमी केला आहे. या धोरणाचा लष्कराच्या नव्या योजनांवर परिणाम होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

१) अर्थसंकल्पातील जमा होणारी अंदाजे रक्कम रु. ७४,८२४ कोटी. अर्थसंकल्पातील १९८९–९० चा अंदाजे खर्च रु. ८२,१६१ कोटी. अर्थसंकल्पातील एकूण तूट रु. ७३३७ कोटी.

२) या अर्थसंकल्पात एकूण ३१८ कोटी ५४ लाख रुपयांच्या करसवलती देण्यात आल्या असून प्रत्यक्ष करांद्वारे ५३० कोटी रुपये व अप्रत्यक्ष करांद्वारे ६७२.१२ कोटी रुपये महसूल गोळा केला जाईल.

अप्रत्यक्ष करांत वाढ याचाच अर्थ गरीब व मध्यमवर्गीय लोकांवर करांचा अधिक बोजा, त्यामुळे एकंदरच भाववाढ व चलनपुरवठा या न टाळता येणाऱ्या गोष्टी या अर्थसंकल्पामुळे घडणार आहेत. रंगीत दूरचित्रवाणी, पानमसाला, सिगारेट, संगणक, दुचाकी वाहने, लोखंड, पोलाद आदींवरील करात वाढ करण्यात आली आहे. चैनींच्या गोष्टींवर केलेली करवाढ समजण्यासारखी आहे. परंतु लोखंड व पोलाद यांसारखे धातू की जे औद्योगिक प्रगती साध्य करण्यात खूपच महत्त्वाचे आहेत, त्यांच्यावरील करवाढ प्रगतीस मारक ठरण्याची शक्यता आहे. टी. व्ही., रेडिओ, टेपरेकॉर्डर यांच्या उत्पादन-शुल्कात केलेल्या वाढीमुळे मध्यमवर्गीयांनाच झळ पोहोचली आहे. रंगीत दूरचित्रवाणी हे आता गरीबांचे स्वप्नच ठरण्याची शक्यता आहे.

३) करमुक्त उत्पन्नाच्या (व्यक्तिगत प्राप्तिकर) मर्यादेत बदल नाही. वार्षिक उत्पन्न १८ हजार रुपये ते २५ हजार रुपये असणाऱ्यांना २५ ऐवजी २० टक्के आयकर.

४) संपत्तिकरावरील दहा टक्के 'दुष्काळ अधिभार' १९८९–९० या आकारणी वर्षापासून रद्द.

५) राज्य सरकारकडून पगारदारांवर आकारला जाणारा 'व्यवसाय कर' एकूण उत्पन्नात धरला जाणार नाही.

६) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेतील ठेवींना ८०–सी कलमाद्वारे सवलत लागू.

७) रेडिओ, टु–इन–वन, कॅसेट रेकॉर्डर व म्युझिकल सिस्टिम यांच्यावर सरसकट २० टक्के उत्पादन-शुल्क.

८) मळीवरील उत्पादन-शुल्कात दुप्पट वाढ.

९) स्टेनलेस स्टील महाग होणार.

१०) देशांतर्गत विमानप्रवास महागणार. तिकिटाच्या मूळ दरावर दहा टक्के कर.

११) साखर, चहा, वनस्पतीवरील उत्पादन-शुल्कात वाढ नाही.

१२) जीवनरसंक्षक औषधांच्या आयात-शुल्कात सात कोटी रुपयांच्या सवलती

१३) रंगीत दूरचित्रवाणी-संचावर पुढीलप्रमाणे उत्पादन-शुल्क :–
दूरनियंत्रण सुविधा असणारे संच रु. २५००
दूरनियंत्रण सुविधा नसलेले संच रु. २२५०
पिक्चर–इन–पिक्चर सुविधा
असणारे संच रु. ४०००

या अर्थसंकल्पामुळे मध्यमवर्गीयांच्या पदरी जरी निराशा आली असली तरी शेतकरी, बेकार, बेघर, सेवानिवृत्त आदींना तसेच शेतीवर आधारित उद्योगांना लाभदायक आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न व आर्थिक स्थिती सुधारेल, पिकांचा दर्जा सुधारेल असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या अर्थसंकल्पात घरबांधणीस प्रोत्साहन देणाऱ्या योजना आहेत. सिमेंटवरील नियंत्रणही उठवण्यात आले आहे. यामुळे देशातील बेघरांचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल असा अंदाज करण्यात येत आहे.

'१९८९–९० चा अर्थसंकल्प विकासाभिमुख आहे. त्यात गरिबांना हात लावलेला नाही' असे म्हणाऱ्या अर्थमंत्र्याचे भाकीत 'खरे की खोटे' हे येणारा काळच सांगेल.

*

# दॅट ब्लू आईज्‌!

**अजय शितोळे**
प्र. व. शास्त्र, (अ)

'आज आपल्या वर्गात एक नवीन विद्यार्थी आला आहे.' सरांनी वर्गात आल्या आल्याच आम्हांला ही बातमी सांगितली. सातवीतून आठवीत आलेले आम्ही सर्व विद्यार्थी. सर्व पास झालेले, नवीन वर्ग, नवीन विद्यार्थी आणि माझी तर गोष्टच वेगळी होती.

आजपर्यंत अजय हे नाव ऐकल्यावर सर्व शाळाच ह्या नावाला ओळखत होती. वक्तृत्व स्पर्धा असो अथवा वादविवाद स्पर्धा असो, ज्या ठिकाणी मी, त्या ठिकाणी पहिल्या नंबरच्या आसपास देखील कोणी फिरकू शकत नव्हते. असा मी अजिंक्य ! वर्गात देखील पहिलीपासून पहिला नंबर न सोडलेला, स्कॉलरशिप मिळालेला, एकमेव विद्यार्थी. शेवटी यशाची धुंदी चढायला असा किती वेळ लागतो. या अजयला जिंकणारा या शाळेत तरी अजून निर्माण व्हायचा होता.

'अरे, तुझं नाव काय ?' सरांच्या प्रश्नाने माझी तंद्री भंग पावली. शेवटी मागून आवाज आला. पाहिले तर एक भुऱ्या केसांचा, गोरा पान, निळ्या डोळ्यांचा एक अतिशय गोड मुलगा उभा राहिला. 'सर, माझे नाव फ्रान्सिस डिसूझा. मी गोव्याच्या एका अनाथालयातून आलो आहे.' 'तुझे सर्व शिक्षण इंग्लिश मिडीयममधून झाले आहे. मग तुला मराठी जमणार का ?'

'सर, I will try– मी प्रयत्न करेन.' तोडक्या-मोडक्या मराठीत म्हणाला.

'अरे, इथे अजयजवळ जागा आहे. इथे येऊन बैस." सरांनी सांगितल्याप्रमाणे तो माझ्या जवळ येऊन बसला.

तो गोव्याच्या एका अनाथालयातून आला होता. त्याला आई–वडील कोणीच नव्हते. शिक्षणाचा त्याचा खर्च हा एक चर्चमधील पाद्री करत होता. हे त्याच्या बोलण्यावरून मला समजले. मुळातच तो अतिशय हुशार होता. परंतु मराठी मिडीयममुळे त्याला थोडी अडचण जाणवत होती. पण का आणि कसे त्याने शाळेतील सर्व शिक्षकांची मने अगदी जिंकून घेतली होती. सर्व सर वर्गात आल्यावर प्रथम त्याची विचारपूस करत होते. वर्गात त्याचप्रमाणे शाळेत माझे महत्त्व त्याच्या आगमनापासून कमी व्हायला लागले होते. माझे मन मला खायला लागले आणि त्यातच मोठं मत्सराचं बीज माझ्या मनात पेरल गेलं.

कधी कधी तो मधल्या सुट्टीत माझ्या घरी यायचा. माझी आई मला, त्याचप्रमाणे त्याला देखीलमोठ्या प्रेमाने खाऊ घालायची. त्यावर तो मला म्हणायचा, अजय, या निळ्या आकाशातील God ने जर मला तुझ्यासारखे आई–वडील दिले असते तर मी तुझ्यापेक्षा नक्कीच लकी ठरलो असतो.' 'हं ! म्हणे लकी ठरलो असतो' माझ्या मनाचा विषवृक्ष एखाद्या भरती आलेल्या सागराप्रमाणे फोफावत होता.

त्याला माझे घर फार आवडायचे. तो मधल्या सुट्टीत नेहमी मला घरी नेण्यासाठी मागे लागायचा. पण

मी मोठ्या शिताफीने त्याला चुकवून घरी जायचो. तेव्हा आईच मला विचारायची, "आज त्या लिलीच्या फुलाला घरी का नाही आणलसं ? तो आजारी आहे का ?' एक ना हजार प्रश्न. आई त्याला मोठ्या प्रेमाने 'लिलीचे फूल' म्हणायची. या पोरट्याने काय जादू केली कोणास ठाऊक ? त्याचे निळे डोळे सदैव प्रेमाचे भुकेले वाटत. या कारट्याने घरी–दारी माझे सर्व महत्त्व कमी केले होते. मी पण त्याचा अपमान करण्याची एकही संधी सोडत नव्हतो.

एकदा सरांनी 'माझी आई' या विषयावर एक निबंध लिहायला सांगितला. त्याने लिहिलेल्या निबंधात इतक्या चुका निघाल्या की त्याची वही दाखवत मी सर्व वर्गभर फिरलो. सर्व वर्गात त्याची मान लाजेने खाली गेली. त्याचे निळे डोळे भरून आले. माझा निबंध एवढा चांगला असूनही सर त्याबद्दल काही बोलले नाहीत; पण त्याला म्हणाले, 'फ्रान्सिस, well, try!' त्याच आठवड्यात इंग्रजीच्या सरांनी आम्हाला 'मी अनाथ' या विषयावर निबंध लिहायला सांगितला. त्याचा निबंध खूपच सुंदर होता. सर्व शाळेत त्याचा निबंध एक चर्चेचा विषय ठरला. शेवटी तो नोटीस बोर्डावर देखील लावला. त्यात शेवटी त्याने असे लिहिले होते की, 'मी मोठा झाल्यावर एक अनाथालय बांधीन. त्यासाठी माझी सर्व कमाई ओतीन व अनाथ मुलांना आई–वडिलांचे प्रेम देईन.' वाक्य खरंच सुंदर होतं. पण वाईट मनाने पाहिल्यावर सर्वच वाईट दिसते. "हं ! म्हणे मी मोठं अनाथालय बांधीन. तोंड बघ आरशात." माझ्यामनातील विषवेलीला आता चांगलाच बहार आला होता.

सहामाही परीक्षा जवळ आली होती. आम्ही सर्वजण कसून अभ्यासाला लागलो. वर्गात पहिला नंबर मिळवून माझी गेलेली इज्जत मिळविण्यासाठी व सरांच्या नजरेत भरण्यासाठी मी खूप अभ्यासाला लागलो. शेवटी माझा नंबर पहिला आला पण त्याचबरोबर फ्रान्सिसचा नंबर दुसरा आला. त्याच्या आणि माझ्या मार्कांत फारसी तफावत नव्हती. सर्व सरांनी माझा पहिला नंबर येऊन देखील त्याचेच कौतुक केले. मला अलिकडे सर्वांचाच राग येऊ लागला होता. सर्वत्र त्याचेच कौतुक चालले होते. या अजिंक्य अजयला त्याने पार नेस्तनाबूत केले होते. नववीचे वर्षदेखील अशाच टकरीत गेले. पण मी माझा नंबर सोडला नव्हता. वादविवाद, खेळ, वक्तृत्व स्पर्धा या सर्वांत त्याने बाजी मारली. त्याने या सर्व स्पर्धांत पहिली बक्षिसे पटकावली आणि मी त्या निळ्या डोळ्यांच्या प्रभावाने पार दिपून गेलो. माझ्यासारखी यशाची धुंदी त्याच्या डोक्यात गेली नव्हती. तो पूर्वीसारखाच माझ्याशी बोलत होता. नववीची शेवटची परीक्षा, या वेळेस मी त्याला पहिल्या नंबरचे चॅलेंज केले आणि त्याने ते स्वीकारले. परीक्षा झाली. सर्व पेपर नेहमीप्रमाणे सोपे गेले. रिझल्ट लागला आणि ..

त्याने या अजयला हरवलं, पार नेस्तनाबूत केलं. माझं यशाचं झाड मुळासकट उपटून माझ्याच हातात दिले. कुठे ९७ टक्के आणि कुठे ८७ टक्के ! माझा अहंकार दुखावला गेला. आतापर्यंत त्याचा केलेला प्रत्येक पराभव त्याने मोठ्या खिलाडूपणे स्वीकारला होता. पण माझ्याकडे असा खिलाडूपणा नव्हता. अपयशाशिवाय मला काही दिसत नव्हते. मी निराशेच्या गर्तेत पार बुडून गेलो.

दहावीचे वर्ष आले. पण शाळा सुरू झाल्यानंतर माझं कशातच लक्ष नव्हते. सरांची त्याच्या पाठीवर पडणारी प्रत्येक शाबासकीची थाप मला माझ्या पाठीवरचा सपाटा वाटत होती.

अशाच वेळी मला वाईट व्यसनं लागली. शाळा बुडवून मी सिनेमा पाहू लागलो. सिगारेट, तंबाखू तर मला आवश्यक वाटू लागले. वाईट मुलांची संगत तर सत्संगतीप्रमाणे वाटत होती. माझा पहिला बेंच सुटला आणि मी मागच्या बेंचवर जाऊन बसू लागलो. उडाणटप्पूपणा एखाद्या मस्तवाल रेड्याप्रमाणे माझ्या अंगात भिनला. सर देखील माझ्या अशा वागणुकीमुळे आश्चर्यचकित झाले. पण आता मला कोणाचीच पर्वा नव्हती.

परीक्षा फॉर्म भरायची तारीख जवळ आली पण मी अजून फॉर्मचे पैसे व परीक्षा फी भरली नव्हती. सरांनी देखील मला दोनदा वर्गात विचारले. पण भरणार तरी कसे ? वडिलांनी कष्ट करून आपला घाम गाळून परीक्षा फीसाठी दिलेले पैसे मी केव्हाच आपल्या मित्रमंडळींबरोबर हॉटेल व सिनेमावर उडवले होते.

शेवटी फ्रान्सिसला राहवले नाही. मी त्याच्याशी बोलणे केव्हाच सोडून दिले होते. तरीही तो माझ्याकडे आला आणि मला विचारले, "अजय, तुला घरून पैसे दिले होते, मग तू फी का नाही भरलीस?" त्याच्या या एका प्रश्नासरशी माझा सर्व राग उफाळून आला. इतके दिवस वाढलेल्या विषवृक्षातून निर्माण झालेला उकळता रस माझ्या तोंडून बाहेर पडला. मी त्याला टाकून बोललो. तो मला काहीच उलट बोलला नाही. पण?' माझ्या शेवटच्या प्रश्नावर तो खूपच चिडला. मी त्याला म्हणालो, 'एवढं सगळं मला विचारणारा तू कोण?' या प्रश्नासरशी त्याच्या मजबूत हाताची थप्पड माझ्या गालावर पडली. पण पुढच्याच क्षणी माझे हात धरून तो ढसाढसा रडू लागला. 'अजय, 'मी तुला मारले! होय! मी तुला मारले! क्षमा कर मला!' असे म्हणतच तो तेथून निघून गेला. नंतर तो मला दिसलाच नाही. चार दिवसांनी सरांनी माझ्या हातात रिसीट आणून दिली. मी खूप अभ्यास केला आणि नुसताच पास नाही झालो, तर बोर्डात चौदावा आलो. पण फ्रान्सिस

ज्याने स्वतःची परीक्षा फी न भरता माझी परीक्षा फी भरली, तो मला केव्हाच भेटला नाही.

असा निळ्या डोळ्यांचा, ज्यात अथांग सागराएवढं माझ्याविषयी प्रेम होतं, ज्याच्या मनात एवढी माया होती, तो मला कधी दिसलाच नाही. कोणीतरी सांगा हो! माझ्या निळ्या डोळ्यांचा फ्रान्सिस कुठे भेटेल? कोणीतरी सांगा हो! माझं लिलीचं फूल कुठे भेटेल? कुणी तरी सांगा.

*

## हायकू

* फाटक्या वस्त्रातले रेखीव दारिद्र्य
प्रदर्शनात सगळ्यांना आवडले
त्या फाटक्या दारिद्र्याचे दुःख कुणी जाणले?

* हमरस्त्याच्या शेजारी
पायवाट वळणाची
सतत जाग पावलांची

* नापीक जमीनीत
एक ही स्वप्न रुजत नाही
डोळ्यांना हे कसं कळत नाही

* सागरात शिंपला
शिंपल्यात मोती
'स्वाती'ची प्रीती होऊन मोती
दडली अथांग निळ्या जली

– शकुंतला मुकाणे
तृतीय वर्ष साहित्य

# दोन दिवसांची रंगत संगत

**रेवती आफळे**
द्वितीय वर्ष वाणिज्य 'ए'

" जीवन ही मनाच्या असंख्य धाग्यांच्या वस्त्रांची एक गाठ आहे. ती ज्याची त्यानेच सोडवायची असते " हे उद्गार आहेत दुर्योधनाचे. किती खरे आहेत नाही ? आपल्या जीवनात नाना प्रकारचे प्रसंग येत असतात, त्या प्रसंगांबरोबर अनेक व्यक्ती येतात. काही अगदी जवळ येतात, काही तशाच राहतात. ज्या जवळ येतात त्यांचा परिचय वाढतो किंवा काही वेळा हेतुपुरस्पर वाढविला जातो. ओळखीचे रूपांतर हे मैत्रीत होते. दोन व्यक्ती अगदी एकमेकांजवळ येताना. " कसं काय बरंय ना ?" जाऊन " च्यायला ! तुला अजून यायला सवड नाही झाली," मग थोडे रुसवे–फुगवे, मग समजूत इथंपर्यंत येऊन पोचतात. पण जीवनात चक्रीवादळ येतं किंवा जीवनाच्या नदीला महापूर येतो. ध्येय वेगवेगळी होतात परत मैत्रीचे संबंध लांब जातात मग कधीतरी भेट होते तेव्हा पहिला मोकळेपणा नसतो कुठल्याही अज्ञात शक्तीमुळे आपण त्या माणसाशी पहिल्यासारखे समरस होऊ शकत नाही. कितीही मनात असलं तरी ! तोपर्यंत कितीतरी कालावधी लोटलेला असतो. नवीन माणसं जोडली जातात जुनी तुटतात. त्याबद्दल खंत करायला मनात असून सवड मिळत नाही किंवा काढली जात नाही.

" दोन ओंडक्यांची होते सागरात भेट,
एक लाट तोडी दोघा पुन्हा नाही गाठ."

किती यथार्थ वर्णन केलं आहे गीत–रामायणात !

जीवनरूपी सागरात सारख्या सुखदुःखांच्या लाटा येत असतात. आपल्याला जवळ असणारी व्यक्ती ही काही प्रसंगाने दुरावते आणि पुन्हा भेट झाली तरी तोच मोकळेपणा येत नाही. मग आपण म्हणतो, 'बदलली बरं का ती ' मग मनात येतं खरंच ती बदलली का तिच्या परिस्थितीने तिला बदलवली ? कारण काळ ही अशा प्रकारची कानस आहे की जी माणसाला आवाज न करता झिजवते. म्हणूनच अशा ध्येयवेगळ्या झालेल्या मार्गावर दोन व्यक्ती भेटल्या तर ती जुनी व्यक्ती ही लांब वाटते आणि नवी व्यक्ती जवळची वाटते. कारण नव्या व्यक्तीची आणि आपली ध्येयं सारखी असतात म्हणूनच तिथला मोकळेपणा जातो, पण दुसरीकडे तो मिळतो. थोडक्यात, त्याची उणीव ही दुसरा कुणीतरी भरून काढतो. जीवन हे असंच आहे. पहिलं मोडायचं आणि दुसरं बांधायचं आणि उरलेलं सांधायचं.

शाळेत असताना आपल्या मित्र–मैत्रिणी वेगळ्या असतात. रोज शाळेत जाताना–येताना, डबा खाताना, फिरायला, अगदी शाळेला सुट्टी लागल्यावर सुद्धा बरोबर ! एकीला लागल्यावर दुसरी हळहळणारी अशी ही हळवी, हळुवार, प्रेमळ, निरपेक्ष, व्यवहाराची जोड नसणारी थोडीशी बालीश–हो, बालीशच मैत्री शाळेच्या शेवटच्या दिवशी हमसाहमशी रडणारी आणि सगळ्यांच्या डोळ्यात पाणी आणणारी मैत्री !

पुढे कॉलेज सुरू होतं दोघीही वेगवेगळ्या कॉलेजला मनात नसताना परिस्थितीमुळे जातात. मग दोघींचं येणं-जाणं कमी होतं. विश्व बदलतं विषय बदलतात आणि मग शेवटी ही माझी शाळेतली मैत्रीण इतपत येतं मग काय इथं त्या दोघी बदलल्या ! नाही हे जीवनचं असं आहे. असंख्य मैत्रीरूपी धागे एकमेकांमध्ये गुंतलेले असतात. तो गुंता वाढतच जातो. पण कमी होत नाही.

सर्वांत आनंदाचा, मजेचा, चंडोलासारखा काळ म्हणजे कॉलेजचा ! इथंही शाळेसारखंच होतं. पण इथे नसते निर्भेळ मैत्री किंवा बालिश मैत्री. जिवाला जीव देणारी मैत्री पण इथेही असे काही धागे मिळतात की ते तूट म्हटलं तरी तुटत नाहीत तर जास्तच जवळ येत जातात. आपल्या दैनंदिनीत काहीतरी स्थान मिळवतात. काहीतरी हक्क मिळवतात. घरी येणं-जाणं वाढत. मैत्री दृढ होते. पुढे कॉलेज संपतं. मग नोकरी. जिथे आपल्याला रोज भेटल्याशिवाय चैन पडत नसते तिथे महिनोमहिने भेट होऊ शकत नाही. जिथे त्या व्यक्तीसाठी अगदी परीक्षेच्या वेळी जाण्यासाठी हट्ट धरणारी आणि पुरविणारी मैत्री ! पण आता वेळ मिळत नाही. मग भेटी हळूहळू कमी होतात. २–३ वर्षांचा कालावधी लोटतो. दोघांमध्ये बरेच बदल झालेले असतात. त्यामुळे जी तार इतके दिवस जुळत असते ती जुळत नाही. अगदी दोन समांतर रेषांसारखी होते. मग दुःख हे मनात रहाते आणि मनात प्रश्न उभा रहातो अरे पूर्वी एक दिवस असा गेला नाही की आपण २–३ तास गप्पा मारल्या नाहीत; नुसतं तोंड तरी पहायचोच आणि आता व्यक्ती तीच पण किती बदलली! एक शब्द बोलत नाही एवढी मी परकी आहे का ?

पण काय सांगायचं तिला ? अगं माणूस हा कधीच बदलत नसतो. परिस्थिती माणसाला बदलायला लावते, कळत न कळत! आपण जगाच्या रंगमंचावरच्या कळसूत्री बाहुल्या आहोत. सगळ्या दोऱ्या ह्या वरच्या सूत्रधाराच्या हातात असतात. तो जसा नाचवेल तसं नाचायचं. थांबवले की थांबायचं !

" पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा " हेच खरं.

आपल्या कितीही मनात असलं तरी आपल्याला त्या व्यक्तीशी समरस होता येत नाही. आता हेच बघा ना, लहानपणी बहीण–भाऊ अगदी एकमेकांसाठी खाऊ ठेवून देतील, त्याला लागलं तर पाणी हिच्या डोळ्यांत ! असे हे प्रेमळ, जिवाला जीव देणारे प्रेम ! पण पुढे लग्न होतं. मग विश्व बदलते. आव्हाने बदलतात. अशा प्रकारे हळूहळू ते एकमेकांपासून दूर जातात. ते स्वतःचं दुःख सांगत नाहीत, का तर आपल्यामुळे त्याला किंवा तिला दुःख नको हा उदात्त विचार.

खरंच का मग हे बहीण–भावंडं, सखे–सोबती आपल्यापासून दूर गेले आहेत ? नाही, मुळीच नाही ! हे जीवनच असं आहे. नसलेलं मिळवायचं आणि ते मिळवता मिळवता पहिलं गमवायचं ! ह्यालाच जीवन असे नाव म्हणतात.

आणि मग मला आठवतं सुधीर फडक्यांनी गायलेलं गीत—

" अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती
दोन दिसांची रंगतसंगत दोन दिसांची नाती "

हेच खरे नाही काय !

*

# ‘उचल्या’ – एक आगळी दलित साहित्यकृती

**रोहिणी बापट**
तृ. व. साहित्य

साहित्य अकादमी पुरस्कार लाभलेले, दलित साहित्याला मराठी साहित्यात सध्या मानाचे स्थान देणारे लक्ष्मण गायकवाड यांचे " उचल्या " हे आत्मकथानक होय. यामध्ये दारिद्र्यात गांजलेल्या, पोटासाठी आजही उचलेगिरी करणाऱ्या समाजाचे स्पष्ट चित्र आहे. भटक्या जमातींची ही दयनीय अवस्था विकासाकडे वाटचाल करणाऱ्या देशाला लागलेले गालबोटच आहे.

भटक्या जमातींना काही शेकडो वर्षांपूर्वी गावाच्या रक्षणासाठी म्हणून ठेवले होते; पण पुढे त्यांची अवस्थाच दयनीय झाली. त्यांच्यावरच उपासमारीची वेळ आली. त्यांच्याजवळ रोजगारीची काहीही साधनं नसल्याने ते पोटासाठी चोरी, उचलेगिरी करू लागले. कालांतराने भारत इंग्रजांचा गुलाम झाला आणि आपले राज्य चिरकाल भारतावर टिकावे म्हणून इंग्रजांनी भारतीयांच्यात आपापसात भांडणं लावली, त्यांच्यावर काही शिक्के मारले. त्यात ह्या भटक्या जमातीवर त्यांनी ‘ गुन्हेगार ’ हा शिक्का मारला. तो आजतागायत कोणी पुसलाच नाही. पोटासाठी उचलेगिरी केली तर प्रतिष्ठित समाज गुन्हेगार ठरवतो. तर उचलेगिरी केली नाही तर स्वतःच्याच समाजात त्या व्यक्तीला काहीही मान राहात नाही. उलट कोणीही आपली मुलगी चोरी न करणाऱ्या मुलाला देतच नाही. म्हणूनच गायकवाड ‘ उचल्या ’ मध्ये म्हणतात, की प्रत्येक समाजाच्या जातीच्या चारित्र्य, प्रामाणिकपणा याबद्दल जी चौकट आहे त्यामध्ये प्रत्येक समाजाच्या व्यक्ती भरडल्या जातात हे खरे आहे.

आपल्यालाही या समाजात सर्वांच्या बरोबरीने हक्क मिळावेत. उचलेगिरीपासून दूर जाऊन स्वकर्तृत्वावर जगायला पाहिजे. यासाठी आपल्या समाजातील अज्ञान घालवायला हवे. सर्वांना शिक्षण द्यायला पाहिजे. तरच भटक्या जमाती आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संघटित होऊ शकतील. त्यातूनच त्यांची दुःखे मध्यमवर्गीय प्रतिष्ठित लोकांसमोर मांडता येतील.

जसे भटक्या लोकांचे अज्ञान गायकवाड सांगतात तसे त्यांच्यातील स्त्रियांचे हालही ते यामध्ये स्पष्ट करतात. दलित स्त्री कष्टकरी आहे. ती आपल्या जिवाची पर्वा न करता येणाऱ्या प्रसंगाला तोंड देते. तसेच काही स्त्रिया नवऱ्यापेक्षा उचलेगिरीत चलाखी दाखवतात. तर एखाद्या स्त्रिला नवऱ्याने चोरी केली ती कबूल करण्याठी किंवा नवरा कुठे लपून बसलाय हे सांगण्यासाठी पोलिसांच्या काठ्या खाव्या लागत. हे सर्व निमूटपणे सहन करणारी स्त्री कधीही आपलं नाव, पत्ता व्यवस्थित सांगू शकत नाही. जर भटक्या जमातीतील स्त्री प्रथम सुशिक्षित केली तर त्या समाजाला सुधारण्याला वेळ लागणार नाही.

जेव्हा एक कार्यकर्ता म्हणून विविध थरांतून गायकवाड फिरले तेव्हा त्यांना नीतिमूल्ये आणि प्रामाणिकपणा या चौकटीतील जीवनाच्या ढोंगीपणाचा

प्रत्यय आला. तो उद्‌बोधक आहे. पोटासाठी दहा ते पंधरा दिवस उपाशी असलेली व्यक्ती २० – २५ रुपयांची चोरी करते म्हणून तिला लगेच गुन्हेगार ठरवून शिक्षा केली जाते. पण एखादा गुन्हा मिटवण्यासाठी मोठ्या लोकांकडून लाच घेऊन कोट्यावधी रुपयांचा चुराडा करणारे प्रतिष्ठित मानाने समाजात वावरत आहेत. पण केवळ गुन्हेगार हा शिक्का बसल्या कारणानेच माणूस गुन्हेगार ठरतो. थोडक्यात, एकदा 'कानफाट्या' म्हटले की तो कायमचा कानफाट्याच ठरतो. तेव्हा भटक्या जमातीवरील हे शिक्के खोडून टाकण्याची आज गरज आहे. हे काम लोकशाही देशात शासनाचेच आहे. ज्यावेळेस भटक्या जमातींचा विकास साधता येईल तेव्हाच उचल्याचे सामाजिक मूल्यमापन होईल.

दलित साहित्य हे मराठी साहित्यसंस्कृतीच्या इतिहासातले एक महत्त्वाचे असे नवीन दालन आहे. दलित साहित्यात कथा, कविता आणि आत्मकथन ह्या तीन प्रकारच्याच साहित्याचा दोन-अडीच दशकांपासून प्रभाव पडलेला आहे. आताशा दलित साहित्याची प्रेरणा मर्यादित जमातीपुरतीच न राहाता अदिवासी–भटक्या विमुक्तांपर्यंत जाऊन पोहचली आहे. तशी ती देशातील इतर प्रांतांत पण चांगल्या प्रकारे पोहचली आहे. दलित साहित्याने मराठी भाषेची आणि समकालीन मराठी साहित्याची समृद्धी वाढवली आहे. आता हे मराठी जीवन मराठी संस्कृतीच्या वेशीच्या आत आणले पाहिजे. संतांनी मराठी साहित्यात व संस्कृतीत 'भक्तियुग' निर्माण केले तसेच दलित व शोषित समाजातील लेखकांनी 'क्रांतियुगाची' निर्मिती केली. 'उचल्या'चे महत्त्व या संदर्भात खूपच जाणवते !

❋

---

देवळाच्या बाहेर चतुर्थीला
दोन रांगा लागल्या होत्या
एक भिकाऱ्यांची तर
दुसरी भाविकांची
एक भाकरीच्या तुकड्यासाठी
पै पै साठी हात पसरतोय
दुसरा सुखासाठी अन्
भरपूर पैशासाठी हात पसरतोय
आत जावून मूर्तीपुढे डोके आपटतोय
याचना करतोय,
'देवा आता मी थकलोय'
तुझ्या कृपेची वाट पहात बसतोय
पण बाहेर भिकाऱ्यांना मात्र
म्हणतोय, धडधाकट तर दिसतोस
मग भीक कशाला मागतोस

– अनामिक

माझीया अंगणात
सडा पारीजातकाचा
सख्या वाट पाहूनीया
सारा कोमेजून गेला

अंगणीची तुलसाई
पाणी घालुनी फुलेना
वियोगे तुझ्या ह्या
तिही रूसली बघना

मन उडे पाखरा सारखे
शोधू कुठे कळेना
माझीया मनाचा
थांग मज लागेना

– माणिक सुर्यवंशी
द्वि. व. साहित्य

# साद देती हिमशिखरे

**श्रीधर विसाळ**
एम्. कॉम. प्र. व.

आपल्या महाविद्यालयात सुमारे गेली दहा वर्षे पदभ्रमण मंडळाचे कार्यक्रम चालू आहेत. गेल्या चार वर्षांतील आमच्या महाविद्यालयीन जीवनात पदभ्रमण मंडळाने आयोजित केलेल्या विविध पदभ्रमण उपक्रमांमधे भाग घेण्याची संधी आम्हांला मिळाली. या काळात भिमाशंकरपासून कोयनानगरपर्यंत महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यात हिंडताना गिर्यारोहणाचे तंत्रशुद्ध शिक्षण घेण्याची गरज आम्हांला वाटू लागली व त्यामुळे प्राथमिक गिर्यारोहण अभ्यासक्रम करावासा वाटला.

भारतात ३ ठिकाणी अशा प्रकारचे शिक्षण मिळते. मनाली (हिमाचल प्रदेश), उत्तर काशी, दार्जिलिंग या ठिकाणी गिर्यारोहणाचे शिक्षण मिळू शकते. माहिती गोळा करताना आम्ही प्रथम जुलै ८७ मधे मनाली येथील संस्थेचे प्रवेश-अर्ज मागवले. साधारण सप्टेंबर ८७ मधे अर्ज आम्हांस मिळाले. नोव्हेंबर ८७ पर्यंत प्रवेश-अर्ज संस्थेकडे पाठवावे लागतात. प्रवेश अर्जासोबत कोर्सची फी रु. ६५०/- भरावी लागते. जुलै ८८ मधे होणाऱ्या कोर्ससाठी आम्ही नोव्हें. ८७ मधे अर्ज भरले होते. सर्वच संस्थांमधे किमान ८ ते १० महिने आधी प्रवेश घ्यावा लागतो. या कोर्समधे गिर्यारोहणातील मुख्य तत्त्वे व तंत्र शिकवले जाते. यासाठी स्टॅमिना, फिटनेस पाहिला जातो. म्हणून आम्ही सहा महिने सराव शिबिर घेतले.

सराव शिबिरात सिंहगडावर दर रविवारी रॉक क्लायम्बिंग, रॅपेलिंग इत्यादी तंत्रांचा सराव केला. त्याचबरोबर स्टॅमिना वाढवण्यासाठी लागोपाठ दोन वेळा सिंहगड चढणे अथवा महाविद्यालयाच्या मैदानावर विविध खेळ व व्यायाम-प्रकार सुरू केले. फेब्रुवारी ८८ मधे आम्हांला 'मनाली' येथील संस्थेकडून प्रवेश मिळाल्याचे पत्र मिळाले.

प्रवेशाचे पत्र मिळाल्यानंतर आम्ही आमची तयारी अधिक जोरात सुरू केली. यात मेडिकल फिटनेससाठी प्रथम कॉलरा, टॉयफाइडचे इंजेक्शन घेतले. मेडिकल एडचे साहित्य जमविण्यास सुरुवात केली. याचबरोबर थंडीचे साहित्य, हातमोजे, मंकीकॅप, स्वेटर्स इ. गोष्टी जमवण्यास सुरुवात केली. हे सर्व चालू असताना मनालीपर्यंत कसे पोहोचता येईल हे पाहिले. मनालीला दोन ठिकाणांहून बसेसची सोय आहे. दिल्ली, पठाणकोट. म्हणून आम्ही झेलम एक्सप्रेसचे पठाणकोटचे रिझर्वेशन केले. पुण्याहून मनाली येथे पोहोचण्यास साधारण २।। ते ३ दिवस लागतात. म्हणून कोर्सचे चार दिवस आधी म्हणजे २६ जून ८८ रोजीचे आम्ही तिकीट काढले.

मनाली येथील जुलै ८८ मधे होणारा कोर्स हा १ जुलै ते २६ जुलै ८८ असा होता. यासाठी ३० जून पर्यंत तिथे पोहोचणे आवश्यक होते. मनाली गावातून संस्था ३ कि. मी. दूर 'बियास' नदीच्या काठी दाट झाडीत आहे. संस्था आणि परिसर फारच सुरेख

आहे. कोर्सच्या संपूर्ण काळात इतर संस्थेच्या होस्टेल• मधेच रहावे लागते. येथे चहा, जेवण व राहाणे याची उत्तम सोय केली जाते. हा सर्व खर्च फीमधून केला जातो. W. H. I. M. (वेस्टर्न हिमालयीन इन्स्टिटयूट ऑफ माउंटेनिअरिंग) मनाली या संस्थेतील सर्व शिक्षक कुशल आहेत. कोर्सच्या २६ दिवसांपैकी पहिल्या १० दिवसांचा अभ्यासक्रम मनालीत झाला. यामधे रॉक क्लायम्बिंग, रॅपेलिंग, रिव्हर क्रॉसिंग इत्यादी प्रकार शिकवले जातात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्व गोष्टींसाठी आवश्यक असे रोप (दोर), त्याचे प्रकार, त्यांच्या नॉटस् (गाठी) व इतर उपकरणे म्हणजे स्लिंग, कॅरॅबिनर, झूमर, पिटॉन इ. सर्वांचे उपयोग, महत्त्व व आवश्यकता शिकवले जाते. जुलै ८८ मधे झालेल्या '१८९' या बॅचमधे एकूण ५० जण भारताच्या विविध भागांतून आले होते. आपल्या महाविद्यालयातील आम्ही ७ जण यामधे सहभागी झालो होतो. या संस्थेतील शिस्त फार कडक आहे. दिवसभराच्या कार्यक्रमात सकाळी P. T., दुपारपर्यंत वेगवेगळे ट्रेनिंग, सायंकाळी तास व रात्री गिर्यारोहणावरील विविध फिल्मस् दाखविल्या जातात.

जुलै हा पावसाचा महिना असल्यामुळे बर्फातील शिक्षणासाठी आम्हाला 'लेह–लडाख'कडे जाणाऱ्या लेह रस्त्यावर तिबेट सीमेजवळ 'पटसेवू' येथे नेण्यात आले. येथे पाऊस पडत नाही. 'पटसेवू' (१२०००") येथे आमचा प्रीबेसकॅंप होता. येथे सैन्याचे हवामान खाते व एक मोठा तळ आहे. येथून 'T. R.' रेंजवर (१५०००") आमचा बेसकॅंप होता. बेसकॅंपमधील प्रत्येक सोय प्रत्येकाला करावी लागणार होती; परंतु त्यासाठीचे सर्व साहित्य संस्थेने पुरविले होते. टेंट, ग्लोव्हज्, फेदरकोट, विंडचिटर, विंडप्रूफ पॅंट, कॅंपॉन, बर्फातले शूज इ. सर्व काळजीपूर्वक परत करावे लागते.

बेसकॅंपच्या सर्व बाजूस बर्फ व बर्फाचे डोंगर होते. छोटे तंबू स्वतः बांधून रहावे लागत होते. येथील प्रशिक्षणात स्नो आणि आईस क्राफ्ट ट्रेनिंग देण्यात आले. बर्फ, त्याचे विविध प्रकार, त्यासाठी लागणारी विविध उपकरणे, साहित्य याची माहिती व उपयोग करून दाखविला. बर्फातील क्लायम्बिंग, रॅपेलिंग, क्रिव्हास रेस्क्यू (हिमविवरात अडकलेल्यांना सोडवणे) इत्यादी अवघड प्रकार शिकवले. या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून 'C. B.' (चंद्रभागा) रेंजवरील १७६००" उंचीचे एक शिखर आम्ही सर केले. प्रथम दहा क्रमांकात पाचजण आपल्या महाविद्यालयाचे होते. बर्फातील हे १५ दिवसांचे प्रशिक्षण संपल्यावर आम्हाला मनालीस परत आणण्यात आले.

सर्व अभ्यासक्रमाची शेवटी परीक्षा घेतली जाते. यात मेडिकल टेस्ट, फिटनेस, स्टॅमिना, लेखी परीक्षा, तोंडीपरीक्षा इ. परीक्षा-प्रकार येतात. रॉक क्लायम्बिंग, रॅपेलिंग, वेगवेगळ्या नॉटस् (गाठी) प्रकार करून दाखवावे लागतात. यात जास्तीत जास्त अवघड प्रकार पाहिले जातात. या सर्व परीक्षेस पास होणाऱ्यांना ग्रेड दिल्या जातात. फक्त 'A' ग्रेडसाठीच पुढील (अॅडव्हान्स कोर्स) कोर्ससाठी प्रवेश असतो. फक्त संस्थेच्या परवानगीने 'B' ग्रेडमधील काहीजणांना या कोर्ससाठी प्रवेश मिळतो. आमच्यातील ५ जणांना या कोर्ससाठी संमती मिळाली आहे.

या संपूर्ण उपक्रमाच्या संदर्भात काही लोकांचे मौलिक सहकार्य मिळाले. त्यांचा या ठिकाणी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे उचित ठरेल. सर्व प्रथम प्रा. रायकर व प्रा. सुनिल दाढे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांचे वेळोवेळी मिळणारे प्रोत्साहन व मार्गदर्शन हीच आमची प्रेरणा होती. तसेच श्री. वाय्. पी. देशपांडे, प्रा. डॉ. पाथरे, प्रा. गोहेल व प्रा. पाध्ये, B. O. B P. संस्थेचे श्री. सतीश रानडे यांचेही या कामी आम्हांला खूपच सहाय्य मिळाले. सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

महाविद्यालयातर्फे सर्वस्वी श्रीधर विसाळ, सतीश भालेराव, अनिल परदेशी, अजित टेंबे, किरण कवळे, मोहन काळे व अभय रानडे हे विद्यार्थी या मोहिमेत सहभागी झाले होते. त्यांचा या ठिकाणी निर्देश करणेही अगत्याचे आहे. अशा प्रकारच्या गिर्यारोहणास जाणारी महाविद्यालयातील ही पहिलीच बॅच ! अधिकाधिक विद्यार्थ्यांना या मोहिमेतून प्रेरणा मिळावी; पदभ्रमण मंडळाच्या कार्यक्रमात त्यांनी उत्साहाने भाग घ्यावा असे मात्र सर्वांना या निमित्ताने मनोमन सांगावे वाटते.

*

# जगातील काही आश्चर्ये

संग्राहक :– **श्री. एस्. डी. पिनगे**
प्रयोगशाळा सहाय्यक, वनस्पती शास्त्र

## सर्वांत लहान झाड

जगातील सर्वात लहान झाड ब्रिटनमध्ये असून त्याचे नाव "खुजोविलो" असे असून पूर्ण वाढ झालेल्या झाडाची उंची फक्त २ इंच भरते.

## सर्वांत लहान पुस्तक

जगातील सर्वांत लहान पुस्तक ब्रिटिश म्युझियममध्ये असून त्याची लांबी ३/४ इंच, रुंदी १/२ इंच आहे. हे पुस्तक अंगठ्याच्या नखाएवढे दिसते. हे पुस्तक १७ व्या शतकात एका जर्मन कारागिराने तयार केले असून पाने २०८ आहेत. नुसत्या डोळ्यांनी वाचता येण्यासारखी सुवाच्य अक्षरे हे या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य.

## शाईची नदी

आफ्रिकेतील अल्जिरिया प्रांतात ही दोन ओढ्यांची मिळून बनलेली नदी असून एका ओढ्याच्या पाण्यात लोखंड तर दुसऱ्याच्या पाण्यात गॅल्कि ॲसिड आहे. दोहोंचा संयोग होऊन अलग अशा काळ्या रंगाची शाई बनून नदीच्या रूपाने वाहाते.

## सर्वांत मोठे पुस्तक

जगातील सर्वांत मोठे पुस्तक इंग्लंडच्या म्युझियममध्ये असून त्याची लांबी ५ फूट १० इंच आहे. रुंदी ३ फूट २ इंच असून त्या पुस्तकाचे वजन ४ मण आहे.

---

संग्राहक – **मनिषा जगदाळे, सुजाता पाटील**
तृ. व. शास्त्र, वनस्पतीशास्त्र

## गगनाशी स्पर्धा

सध्या अस्तित्वात असलेला सर्वात उंच वृक्ष म्हणजे अमेरिकेतील कोलंबिया प्रांतातील हमबोल्ट ( Humbolt ) येथे असलेल्या रेड वूड क्रीक ग्रोव्ह ( Red wood crick grove ) मधील रेड वूड ( Sequia sempervierens ) म्हणून ओळखला जाणारा वृक्ष. याची उंची ११२.१० मीटर आहे.

भूतकाळात याहीपेक्षा काही उंच वृक्ष होते. इ. स. १८७२ मध्ये ऑस्ट्रेलियात तोडलेल्या माउंटन ॲश ( Mountain ash ) या वृक्षाची उंची १५२.४० मीटर इतकी होती.

## जगातील सर्वात मोठे फूल

मलाया द्विपकल्पातील बोर्नियो प्रांतात रॅफ्लेशिया अर्नाल्डी ( Rafflesia arnoldi ) या वनस्पतीची गणना सर्वात मोठ्या फुलात केली जाते. जवळजवळ १ मीटर इतक्या व्यासाचे हे फूल प्रचंड अशा कोबीच्या गड्ड्यासारखे दिसते. ही वनस्पती आहे मात्र परोपजीवी. दुसऱ्या वृक्षाच्या खोडावर ही वनस्पती वाढते.

## सर्वात जड व हलके लाकूड

लिग्नम व्हायटे ( Guaiacum Officinale ) या वृक्षाचे लाकूड सर्वात जड असून त्याचे वजन एक घनमीटरात १३८६ किलो इतके असते. महाराष्ट्रात आढळणाऱ्या अंजन ( Hardwickia binata ) वृक्षाच्या लाकडाचे घनमीटरचे वजन १२९१ किलो इतके असते. या उलट बालसा ( Ochroma lagopus ) लाकडाचे वजन एका घनमीटरला फक्त ११० किलो असते.

## हिरवे होकायंत्र

एक वनस्पती सिलफीयम् लॅसीनियॅटम् (Silphium laciniatum) अक्षरशः होकायंत्राचे काम करते. अमेरिकेच्या मिसीसिपीच्या खोऱ्यामध्ये ही वनस्पती आढळत असून तिची पाने नेहमी दक्षिणोत्तर राहतात.

## जगातील सर्वात मोठी शेंग

ऑस्ट्रेलिया खंडामध्ये काही राक्षसी वेली आढळतात. (Entada phaseaoloides) या वेलीच्या शेंगांची लांबी २ मीटर तर रुंदी सुमारे १३ सें. मी. असते. महाराष्ट्रात आढळणाऱ्या 'टेटू' ( Oroxylon indicum ) वृक्षाची शेंग खूपच लांब असते. या शेंगेची लांबी १.२५ मीटर असते आणि रुंदी ७ ते ८ सें.मी. असते.

## गुंज वेधशाळा

गुंज ( Abrus precatorius ) या वनस्पतीवर लंडनमधील विश्वविद्यालयात 'क्यू गार्डन' मध्ये वनस्पती शास्त्रज्ञांनी विविध प्रयोग केले. त्यावरून असे आढळले की हे झाड चुंबकीय व विद्युत लहरींपुढे फारच संवेदनाशील आहे. या वेलीच्या पानांच्या मिटण्याउघडण्यावरून वादळ, झंजावात, भूकंप यांची पूर्वकल्पना येते.

## खुनी पंजा

मेक्सिकोच्या जंगलात मेक्झिकन हॅंड फ्लॉवर (Chiranthodendron pentactylon) या वृक्षाचे फूल अक्षरशः रक्ताने भरलेल्या पंजासारखे असते. त्याच्या पाच लालभडक पाकळ्या हाताच्या बोटांसारख्या असतात. पाकळ्यांच्या टोकाच्या मागे नखासारख्या खुणा असतात.

*

दक्षिण पॅसिफिक महासागराच्या पाण्यात उगविणाऱ्या ''नेरी ओसीटीस' नावाच्या एका पाणवनस्पतीची उंची ३०० फुटांपर्यंत असते.

*

जपानमध्ये 'ज्वालामुखी झाडे' या नावाची असंख्य झाडे पहावयास मिळतात. या झाडांच्या फांद्यातून सूर्यास्ताच्या वेळी धुराचे प्रचंड लोट बाहेर येतात. कधी कधी आगीच्या प्रखर ज्वालाही बाहेर पडतात. ही झाडे साधारण ८ ते ९ वर्षे जगतात.

---

## सुटलो बुवा !

**संकलक : माधुरी माडीवाले**
द्वि. वर्ष वाणिज्य (क)

हॉकी खेळताना बॉल लागून हरनामसिंग याचा पाय दुखावला गेला. त्यावर त्याला डॉक्टरांनी धावपळ करायची नाही, जिना अजिबात चढायचा नाही असे काही सल्ले दिले.

काही दिवसांनी तो आपला पाय दाखवायला दवाखान्यात गेला. डॉक्टरांनी तपासून सर्व ठीक असल्याचे सांगितले. तरीही खात्री करून घेण्यासाठी हरनामसिंगने विचारले, "आता मला जिने चढायला हरकत नाही ना ?" "मुळीच नाही. का ?" डॉक्टरांनी विचारले. "सुटलो बुवा ! गेले दोन आठवडे पाईपवरून चढून घरात जाताना मला चांगलाच त्रास होत होता." हरनाम उत्तरला.

## बेस्ट लक

विमानाच्या खिडकीत बसून तो प्रवासी मजेत मद्याचे घुटके घेत घेत प्रवासात आनंद उपभोगत होता. अचानक त्याला खिडकीत एक पॅराशूट दिसले. पॅराशूटला लटकणाऱ्या माणसाने त्याला विचारले, "काय, माझ्याबरोबर येणार का ?" "आभारी आहे. नको. मी आहे तिथेच आरामात आहे." प्रवासी उत्तरला.

"जशी तुमची इच्छा. मी या विमानाचा पायलट आहे. बेस्ट लक !" पॅराशूटवाला उत्तरला.

# प्राण्यांचे दिशाज्ञान

प्रा. डॉ. कांचनगंगा गंधे

पृथ्वीवरील कित्येक प्राणी आणि पक्षी ठराविक ॠतूंमध्ये आपले नेहमीचे निवासस्थान सोडून काही काळासाठी दूरवरच्या प्रदेशात गटागटाने प्रयाण करतात. हा प्रवास ते प्राणी, पक्षी काही ठराविक कारणासाठी ठराविक ठिकाणी करतात. तो हेतू साध्य झाला की ते परत त्यांच्या नेहमीच्या निवासस्थानी परत येतात. ह्या क्रियेला पशुपक्ष्यांचे स्थलांतर (मायग्रेशन) म्हणतात. हे स्थलांतर एका ठराविक दिशेनेच होत असते. दिशेचे ज्ञान प्राण्यांना उपजतच असते.

प्राण्यांचे स्थलांतर हे प्राण्यांचे वय, सभोवतालची प्रजोत्पादनासाठी योग्य जागा, प्राण्यांचे लिंग अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असते. स्थलांतर करताना मात्र हे प्राणी एकएकटे जात नाहीत तर ते कळप करून किंवा थव्याथव्यांनी जातात. प्रत्येक प्रकारच्या प्राण्यांमध्ये हा काळ वेगवेगळा असतो. माशांपासून अनेक सस्तन प्राण्यांपर्यंत ही स्थलांतर करण्याची प्रवृत्ती दिसून येते.

बरेचसे मासे नवीन भक्ष्य मिळविण्यासाठी आणि प्रजोत्पादनासाठी मूळ जागेपासून कित्येक मैल दूर जातात. पॅसिफिक समुद्रातला सामन जातीचा मासा साध्या किंवा गोड्या पाण्यात अंडी घालतो. त्याची पिल्लं तिथंच जन्म घेतात परंतु पुढचं आयुष्य मात्र तो खाऱ्या पाण्यातच घालवतो. यासाठी त्याला स्थलांतर करावेच लागते. अशा माशांना 'ॲनॉड्रॉमस' म्हणतात. डायड्रोम्स नावाची माशाची जात त्याच्या आयुष्याच्या काळामध्ये फक्त एकदाच साध्या पाण्यातून खाऱ्या पाण्यात जाते. ॲन्वीला माशाचा जन्म समुद्रात होतो तर नंतरचे आयुष्य तो साध्या पाण्यात, नदीत किंवा एखाद्या ओढ्यात घालवतो.

कासवाचा चालण्याचा वेग तर आपल्या सर्वांच्याच परिचयाचा आहे. समुद्र कासव, कठीण चामड्यासारखी पाठ असलेले कासव आणि हिरवी कासवं दर दोन-तीन वर्षांनी प्रजोत्पादनासाठी आणि नवीन अन्न मिळविण्यासाठी कित्येक किलोमीटर्स लांब चालत जातात. हिरवी कासवं तर समुद्रातील बेटांपासून जवळजवळ १५०० किलोमीटर्स दूर अंडी घालण्यासाठी जातात.

सर्व प्राण्यांमध्ये पक्ष्यांच्या स्थलांतरामध्ये एक प्रकारचा वक्तशीरपणा आणि शिस्त असते. त्यांना असलेले दिशाज्ञान खरोखर वाखाणण्यासारखे आहे. उत्तरेकडे बर्फ पडायला लागलं की ते सरळ दक्षिणेकडे रस्ता धरतात कारण त्या ठिकाणची हवा त्यांना चांगली मानवते. शिवाय बर्फ पडल्यामुळे त्यांना अन्नही तेथे मिळत नाही. दक्षिणेकडे उन्हाळा सुरू झाला की परत त्याच दिशेने आपल्या मायदेशी परत घरटी बांधण्यासाठी आणि नवीन पिढी तयार करण्यासाठी म्हणजेच अंडी घालण्यासाठी परत जातात. बरेचसे पाणपक्षी प्रजोत्पादनासाठी समुद्रावरून जवळ जवळ चाळीस हजार किलोमीटर्सचा प्रवास करतात. यासाठी ते सूर्याच्या दिशेचा उपयोग करत असावेत असे शास्त्रज्ञांना वाटते. मूळ स्थानापासून कित्येक मैल लांब अंडी घालून ते परत येतात. काही पक्ष्यांमध्ये अंड्यांतून जेव्हा पिल्लं बाहेर येतात तेव्हा त्यांच्याबरोबर कोणतेच मोठे पक्षी म्हणजे त्यांचे आई वडील नसतात. असे असतानाही ते त्यांच्या मायदेशी म्हणजे आई-वडिलांकडे परत जातात. यावरून त्यांना असलेले दिशाज्ञान उपजतच असावेसे वाटते.

प्रख्यात पक्षी-निरीक्षक डॉ. सलीम अली यांनी पक्ष्यांच्या स्थलांतरावर बरेच संशोधन केले होते. त्यांच्या मुंबईच्या घरात ऑक्टोबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात काही धोबी पक्षी येत असत. या पक्ष्यांना त्यांनी पायात रिंग्ज बांधून परत सोडून दिले. पुढच्या काळात वर्षभर हे पक्षी गायब होत असत परंतु परत दर वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये तेच पक्षी परत आल्याचे आढळून आले. बऱ्याच संशोधनानंतर हे सैबेरियातून प्रवास करून परत मुंबईला येतात असे कळले. यावरून पक्ष्यांचा प्रवास किती नियमित आणि अचूक आहे हे कळून येते.

काही पक्ष्यांमध्ये स्थलांतर करताना त्यांची पिल्लं अगोदर निघतात. मजल दरमजल करत, टप्पे टप्पे घेत स्थलांतर करतात. त्यांचे हे दिशाज्ञान त्यांना उपजतच असते. गुजराथेत पेलीकन नावाचे पक्षी युरोपातून येतात पावसाळ्याच्या सुमारास सायबेरियन क्रौंच पक्षी भरतपूरच्या अरण्यात आपल्याकडे दिसतात. काही बदके सायबेरियातून पुण्यात आलेली आढळतात. पौराणिक कथेत प्रसिद्ध असलेले चक्रवाक पक्षी युरोपात घरटी बांधतात तर तिथं थंडी पडली की ते लडाखमध्ये परत येतात.

जमिनीवर राहणाऱ्या काही पक्ष्यांमध्ये असलेले दिशाज्ञान त्यांच्यात असलेल्या हार्मोन्समुळे होत असते. लहान, मोठ्या दिवसाची नोंद त्यांच्या मेंदूत केली जाते. पिट्युटरी ग्रंथींमध्ये हार्मोन्स तयार होतात. ही हार्मोन्स मेंदूतल्या त्या भागाला चालना देतात त्यामुळे त्यांना दिशाज्ञान अचूक होते असे शास्त्रज्ञांचे मत आहे.

युरेशिया आणि उत्तर अमेरिकेतील उत्तरेकडचे पक्षी सर्वात लांब स्थलांतर करणारे पक्षी म्हणून ओळखले जातात. बदक, हंस, वेडर्स यासारखे पक्षी, वटवाघळे, मिटॅकिन्स, पिनिपेड्स सारखे प्राणी अन्न मिळविण्यासाठी कित्येक मैल लांब स्थलांतर करताना आढळतात. बेडकासारखे काही उभयचर प्राणी थंडी सहन न झाल्यामूळे मातीत पुरून घेतात किंवा कमी थंडीच्या भागात जातात. परंतु हे स्थलांतराचे अंतर खूप नसते. सामन जातीचा मासा पॅसिफिक समुद्रापासून अलास्कापर्यंत, तर व्हेल मासे अतीव थंडीमुळे विषुववृत्तापर्यंत आल्याची नोंद आहे.

पक्षांचे स्थलांतर हे दोन ऋतुमधील आणि वातावरणातील अति फरकांमुळे होत असावे. यांत दिवसाची लांबी, हवामान, पुरेसे अन्न किंवा भक्ष यांची उपलब्धी आणि चंद्राच्या कला यांचाही समावेश होतो.

रोडंट्स आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले काही प्राणी स्थलांतर न करता तिथेच राहतात, कारण ते प्राणी झाडाची सालं, मुळं, लायकेन्सवर जगतात. मध्य आफ्रिकेतील 'गोरीला' थंडीत पर्वत उतरून बांबूच्या बेटात येऊन राहते.

पाऊस पडायच्या अगोदर काही काळ नाकतोडे, गवतावरचे काही किडे अन्न शोधण्यासाठी कित्येक मैलांचा प्रवास करताना आढळतात.

एकूण काय तर प्राण्यांच्यात उपजतच असलेल्या चेतनाशक्तीमुळे एका ठराविक वेळेस, विवक्षित ठिकाणी आणि ठराविक दिशेनेच ते स्थलांतर करतात. प्राण्यांच्यात असलेले हे अचूक दिशाज्ञान नक्की कशामुळे येते हे कोडे शास्त्रज्ञांना अजूनही उलगडलेले नाही.

❋

---

# माझ्या भावनांनो

आज माझ्या भावनांनो मूक तुम्ही होवू नका
हाय ! काळजाचे भाव सारे, उखडुनी काढू नका
मुक्त झालेले शब्द माझे, ते पुन्हा कोंडू नका
ओसरता पूर आसवांचा, एकवार उधाणू नका
जुळवुनी गीत माझ्या शब्दांचे
गायील्या विना राहू नका
आज माझ्या भावनांनो मूक तुम्ही होवू नका

**— जयश्री प्रभाकर बडवे/सत्यरंजन**
प्र. व. शास्त्र (बी)

# व्यसनाधीनता : एक समस्या

**मनिषा सराफ**
टी. वाय्. बी. ए.

विसावे शतक हे चिंताग्रस्ततेचे युग आहे असे म्हटले जाते. आजच्या या युगात मानवावर एकापाठोपाठ एक अशी अनेक संकटे कोसळत आहेत. आज जगातील सर्व देशांमधील तरुण पिढीला 'व्यसन' नावाचा भस्मासुर भस्म करू पहात आहे. या भस्मासुराचा नायनाट करण्यासाठी, व्यसनाधीनतेचे नेमके स्वरूप काय असते ? लोक व्यसनाधीन का होतात ? व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी सरकारने व कायद्याने कोणती पाऊले उचलली आहेत ? सर्वसामान्य जनता याबाबत नेमके काय करू शकते ? इ. प्रश्नांची उत्तरे समजावून घेणे आवश्यक ठरते.

अलीकडेच झालेल्या एका पहाणीत असे आढळून आले की, भारतातील जवळजवळ पाच लाख तरुण अमली पदार्थांच्या आधीन झाले आहेत. एकट्या पुणे शहरात जवळजवळ पन्नास हजार तरुण असे आहेत, की ज्यांनी आयुष्यात एकदा तरी अमली पदार्थांची नशा केली आहे. हे तरुण कोणत्याही क्षणी व्यसनाधीन होऊ शकतात.

अमेरिकन मनोचिकित्सा संघटनेच्या वर्गीकरणानुसार अमली पदार्थांचे अति-सेवन ही एक व्यक्तिमत्त्व विकृती आहे. 'मानसिक उद्दीपन करणाऱ्या औषधांवर मानसिक व शारीरिकदृष्टया अवलंबून राहणे म्हणजे औषधी–व्यसनामुक्ती होय.'

The screen-wall of a tube is made of glass, about a quarter inch thick. Since glass is a strong absorber of ultra voilet light there is a very little chance for it to penetrate through this glass, even if it is generated in small amounts inside the tube. When the region around the TV ets is examined for X-rays, with an X-ray monitor, the level of this radiation is found to be not above the natural background- Thus no harmful radiations in the above threshold quantity comes out of the tube.

If you observe carefully the blue screen is not made of glass, it is a plastic sheet It is also quite thin as compared to the quarter inch thick glass cover. Moreovr plastic is less dense than glass. This screen is therefore not designed to play a protective role.

The screen which is usually of a bluish or greyish tinge, only reduces the glare and perhaps can make the the picture look a little less grainy. It is like using goggles in a hot sun.

Note - ( **The answers are provided by Homi Bhabha Centre for Science Education, Tata Institute of Fundamenta Resarch, Bombay**)

## दिसामाजी काही तरी ते लिहावे !

महाविद्यालयातील आपापली अध्ययन-अध्यापनाची जबाबदारी सांभाळून आपापल्या विषया-संबंधी अधिकाधिक माहिती घेणे, संशोधन करणे, त्यासंबंधीची ग्रंथनिर्मिती करणे, शोध निबंध प्रसिद्ध करणे या गोष्टीही आमच्यातील व्यासंगी प्राध्यापक नेहमीच करीत असतात. या सरस्वतीच्या पूजकांची चालू शैक्षणिक वर्षातील सिद्धी समाजापुढे कृतज्ञतापूर्वक ठेवताना आम्हास एक वेगळेच समाधान वाटते व त्याचा सार्थ अभिमानही वाटतो. त्यांच्या या कार्याचा हा संक्षिप्त आलेख.

–संपादक

**डॉ. वि. भा. देशपांडे**
मराठी विभाग

### या वर्षात प्रकाशित झालेली पुस्तके

१) मराठी नाटक–रंगभूमीचे पहिले शतक (व्हीनस प्रकाशन, पुणे)
२) 'रंगयात्रा' : (१९५० ते ८४ मधील रंगभूमीचे अवलोकन) संपादित–(नाट्यसंपदा प्रकाशन, मुंबई)
३) 'माझा नाट्यलेखनाचा / दिग्दर्शनाचा प्रवास' (संपादित) (उन्मेष प्रकाशन)
४) बालगंधर्व विशेषांक (लेखन, संपादन)
५) पी. डी. ए. नाट्यनिर्मिती विशेषांक (संपादन)

**डॉ. दत्तात्रय पुंडे**
मराठी विभाग

### अ) ग्रंथ

१. **महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार,** प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८८
(प्रा. यशवंत सुमंत यांच्या सहकार्याने)
जातिसंस्थेविषयी अर्वाचीन महाराष्ट्रातील मान्यवर विचारवंतांनी मांडलेल्या मतमतांतरांचा चिकित्सक मागोवा घेणारे संपादन

२. **आकलन,** चंद्रकला प्रकाशन, पुणे १९८९ (डॉ. कल्याण काळे यांच्या सहकार्याने)
बारावीच्या मराठी पाठपुस्तकातील कवितांचे रसास्वादाच्या अंगाने विवेचन असणाऱ्या लेखांचे संपादन

३. **वाङ्मय-विमर्श,** व्हीनस प्रकाशन, पुणे, १९८९.
(डॉ. द. न. गोखले व डॉ. जयन्त वष्ट यांच्या सहकार्याने)
कै. प्रा. रा. श्री. जोग यांच्या अप्रकाशित व असंगृहीत लेखांचे संपादन.

### आ) समीक्षात्मक / संशोधनपर लेख

१. "अर्वाचीन मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी : अध्यापन" **साहित्य-सूची.** मे १९८८.
२. "अथ विनोद मार्गेण" **विशाखा,** मे १९८८.
३. "श्री. म. माटे यांच्या कथेच्या रूपाचा विचार", **आलोचना,** ऑगस्ट १९८८.
४. "ग्रंथालयीन संदर्भ-सेवा," **साहित्य-सूची,** ऑगस्ट १९८८.
५. "ग्रंथालयीन सेवा साहाय्य," **साहित्य-सूची,** सप्टेंबर १९८८.
६. "डॉ. आनंद यादव यांची मुलाखत", **नीहार,** दिवाळी अंक १९८८.
७. "आकाशात उसळलेले मातीचे उधाण : कुसुमाग्रज" **बकुलगंध,** दिवाळी अंक १९८८.
८. "संशयकल्लोळमधील रेवती गणिकाकन्याच का?", **साहित्य-सूची,** फेब्रुवारी १९८९.

**सौ. आशा सुरेश परुळेकर**
मानसशास्त्र विभाग, कनिष्ठ महाविद्यालय.

**' कुटुंब सौख्य '** उन्मेष प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९८८.

कुटुंब-सुखाचा पाया कोणता असतो, कुटुंबसौख्य बिघडविणारे घटक कोणते; नातेवाईक, शेजारी, मित्रमंडळ व कुटुंब यांच्यातील परस्पर आंतरक्रिया कशा असतात इ. संबंधीचे विवेचन करणारे कौटुंबिक मानसशास्त्रावरील पुस्तक.

**Prof. S R. Pokharkar,**
Deptt. of Chemistry

**DR. V. D. Kelkar and S. R. Pokharkar**

Title : ' Titrimetric Estimation of calcium and phosphate in Dietary supplement : Tablets An Inorganic ...................... Experiment.'
**Indian Journal of Pharmaceutical Education,** Vol. 23, 1989.

**प्राचार्य डॉ. शं. ना नवलगुंदकर**
राज्यशास्त्र विभाग.
शोध निबंध : " स्वा. सावरकरांचे जातिसंस्थाविषयक विचार. "
प्रा. यशवंत सुमंत व डॉ. द. दि. पुंडे संपादित.
**' महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार '**
या पुस्तकात अंतर्भूत. प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८८.

**प्रा. वाल्मिकी अहिरराव**
भूगोल विभाग, वरिष्ठ महाविद्यालय

**पर्यावरणशास्त्र,** वैभव पब्लिकेशन पुणे १६, ऑगस्ट १९८८.

मानवाचा पृथ्वीवरील अस्तित्वकाळापासून पर्यावरणाशी अनुबंध असला तरी औद्योगिक क्रान्तीनंतर मानव-पर्यावरण विसंवाद सातत्याने वाढत गेला. परिणामी निर्वनीकरण, मृदाधूप, आम्लपर्जन्य, ओझोनक्षय, प्रदूषण, वाळवंटीकरण यांसारख्या पर्यावरणीय समस्या भीषण होत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत ग्रंथात पर्यावरणशास्त्राची उद्दिष्टे व निकड, परिसंस्था व परिस्थितीकी (Ecosystems & Ecology), प्रदूषण, लोकसंख्या विस्फोट, पर्यावरणीय आपत्ती व नियोजन या पर्यावरणशास्त्राच्या बहुविध अंगांचे एकूण आठ प्रकरणांत आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) पद्धतीने शास्त्रीय विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. विविध विषयांतील अभ्यासक, संशोधक व परीक्षार्थींना या ग्रंथाचा लाभ होईल.

प्रा. प्रमोद दत्तात्रय पारखी

१) इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अँड वर्कस् अकाउंटस् ऑफ इंडिया, या संस्थेचे अध्यक्षपदी निवड.
२) कॉन्फेडेरेशन ऑफ एशियन अँड पॅसिफिक अकाउंटस् (कापो) या संस्थेचे कार्यकारी मंडळावर भारताचे प्रतिनिधित्व. (या संस्थेचे जगातील ४० देश सभासद आहेत.)
३) ख्राइस्ट चर्च (न्यूझीलंड) येथील अकाउंटस् परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व.
४) पुणे येथील कॉसमॉस बँकेचे संचालक मंडळावर निवड.
५) पुणे स्टॉक एक्स्चेंजवर (कार्यकारीणीवर) भारत सरकारतर्फे नेमणूक.
६) दक्षिण आशियाई अकाउंटस् परिषदेच्या खाटमांडू येथील अधिवेशनात भाग.

# 'मराठी रियासत'

## संशोधन, संपादन आणि पुनर्प्रकाशन प्रकल्प

प्रा. एम. ए. कुलकर्णी, इतिहास विभाग

हिन्दुस्थानचा अर्वाचीन इतिहास तीन विभागांत सलग व समग्र लिहिण्याचे व्रत रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई (१८६५-१९५९) यांनी घेतलेले होते. त्यांच्या रियासतीचे तीन विभाग म्हणजे मुसलमानी, मराठी व ब्रिटिश रियासती असे आहेत. ह्यामधील मुसलमानी रियासतीचा खंड इ. स. १८९८ मध्ये प्रकाशित करण्यात आला. नियमितपणे हळूहळू मग त्यांनी इतरही विभागांचे लेखन करून ते खंड प्रकाशित केले. इ. स. १९३२ मध्ये त्यांनी हे आपले कार्य पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी आपल्या रियासतीच्या सुधारित आवृत्त्या व्यक्तीपरत्वे काढण्यास सुरुवात केली. हे कार्य त्यांनी आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत सातत्याने केले. त्यांच्या रियासती आद्ययावत संशोधन व विविध प्रकारच्या सविस्तर वर्णनांनी अत्यंत परिपूर्ण अशा आहेत. त्यांची लेखनशैली साधी, सोपी व प्रसन्न असल्याने रियासती जनसामान्यांच्यात विशेष वाचकप्रिय झाल्या. मराठ्यांचा सलग व समग्र असा इतिहास अभ्यासण्याचे त्या एकमेव साधन बनलेल्या आहेत. त्याला आज तरी पर्याय ठरू शकतील असे दुसरे अन्य इतिहास ग्रंथ सांगता येत नाहीत. रियासतकारांनी मराठी भाविकांमध्ये इतिहासाची गोडी निर्माण केली. अनेक पिढ्या त्यांच्याच रियासतीवरून इतिहास शिकलेल्या आहेत. म्हणून त्या महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व वैचारिक परंपरेचा एक अमूल्य असा ठेवा बनलेल्या आहेत. हे विचारधन वर्तमान तसेच भावी पिढीला उपलब्ध व्हावे ह्या हेतूने रियासतकारांच्या 'मराठी रियासती' संशोधन, संपादन व पुनःप्रकाशन प्रकल्पाची योजना करण्यात आलेली आहे. एकूण आठ खंडांत त्या प्रकाशित करण्यात येणार असून त्यांतील पहिले दोन खंड नुकतेच प्रकाशित झालेले आहेत.

रियासतीच्या संपादनाची जबाबदारी प्रमुख संपादक म्हणून श्री. स. मा. गर्गे ह्यांच्याकडे आहे. संपादन समितीमध्ये अनेक मान्यवर संशोधक व अभ्यासक आहेत संपादनाच्या कामासाठी बडोद्याच्या 'कै. फत्तेसिंगराव गायकवाड ट्रस्ट' तर्फे तीन लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. प्रकाशनाची जबाबदारी मुंबईच्या 'पॉप्युलर प्रकाशना'कडे आहे. रियासतीच्या पुनर्प्रकाशन प्रकल्पाबरोबरच 'रियासतकार सरदेसाई: काळ कर्तृत्व' असा स्वतंत्र संशोधनाचा विषय अभ्यासण्यात येत आहे. त्यामधून रियासतकारांच्या अन्य ग्रंथ तसेच फुटकळ लेखांचे संपादन करण्यात येऊन त्याचेही पुनर्प्रकाशन यथावकाश केले जाणार आहे.

# तुटे वाद, संवाद तो हितकारी

आपापल्या अभ्यास–शाखेतील अधिकाधिक ज्ञान मिळविण्यास, समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांसबंधी विचारपूर्वक चर्चा करण्यास मॉडर्न महाविद्यालयातील प्राध्यापक मंडळी नेहमीच उत्सुक असतात. त्यांच्या या जिज्ञासूवृत्तीतूनच महत्त्वाच्या विषयावर परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा आयोजित करणे हा आता महाविद्यालयीन कार्यक्रमाचा नित्याचाच भाग झाला आहे. याही वर्षी महाविद्यालयातील मराठी, मानसशास्त्र, इतिहास व वाणिज्य विभागांनी वेगवेगळ्या योजनांतर्गत विविध परिसंवाद आयोजित केले. त्यांतील विचारमंथनाचा हा धावता आढावा.

—संपादक

## ' मराठी नाटक आणि मनोविकृती '

**प्रा. श्रीमती मेधा सिधये**
**मराठी विभाग**

आपल्या महाविद्यालयात दि. ११ व १२ फेब्रु. ८९ रोजी दोन दिवसांचे एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. हे चर्चासत्र महाविद्यालयातील **मराठी विभाग व मानसशास्त्र विभाग** यांच्या वतीने, 'कोहसिप' योजनेच्या अंतर्गत झाले. विषय होता ' मराठी नाटक आणि मनोविकृती '. चर्चेसाठी ' गिधाडे ', ' सविता दामोदर परांजपे ', ' वासनाकांड ', ' अवध्य ', ' महासागर ', ' बॅरिस्टर ', ' महापूर ' अशी नाटके निवडण्यात आली होती. चर्चासत्रासाठी नामवंत लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, मानसोपचारतज्ज्ञ यांना आमंत्रित केले होते. त्या यादीत एकाही नाट्यसमीक्षकाचे नाव नव्हते पण प्रा. पुष्पा भावे या चर्चेला उपस्थित असल्याने सूत्रसंचालनाचे आणि स्वतःचे विचार मांडण्याचे काम त्यांनी चांगल्या तऱ्हेने केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी उपस्थितांचे स्वागत केल्यानंतर डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक भाषण केले. चर्चासत्राचे उद्घाटन विजय तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. डॉ. मोहन आगाशे यांनी चर्चासत्राचा हेतू स्पष्ट करून सांगितला. त्यानंतर डॉ. परळीकर यांनी ' गिधाडे ' या नाटकावर आपला निबंध वाचला. ' गिधाडे ' हे नाटक म्हणजे मानसिक विकृती असलेल्या लोकांची एक ' मॉडेल फॅमिली ' आहे, असे मत व्यक्त केले. या नाटकात सूक्ष्मतेला वावच नाही. प्रत्येक गोष्ट स्पष्ट आहे. उघड आहे. तसंच या नाटकाचं शीर्षक आहे. ते योग्य आहे, असे ते म्हणाले. डॉ. परळीकर यांनी नाटकातील प्रत्येक पात्राचे मानसशास्त्रीय दृष्टचा विश्लेषण केले. डॉ. परळीकरांच्यां निबंधावरील चर्चेत भाग घेताना डॉ. पाटकर यांनी ' गिधाडे ' हे समाजाचे दर्शन आहे. कुटुंबाचं नाही, असे मत व्यक्त केले. वयानुसार, काळानुसार Normal – Abnormal बदलते, म्हणून त्यांची व्याख्या करणे अवघड आहे असे आपले मत त्यांनी मांडले. या नाटकाच्या संदर्भात विजय तेंडुलकर यांनी आपले मनोगत मोकळेपणी मांडले. ते म्हणाले, ' मोठ्या भावाची व्यसनाधीनता, त्यातून अधःपात, नोकरीच्या ठिकाणी माझ्याविरुद्ध केली गेलेली कारस्थानं, एका घरमालकाचा मला आलेला जगावेगळा अनुभव या सगळ्यांतून एका उद्रेकाने, आवेगाने ' गिधाडे ' हे नाटक निर्माण झाले. यापलीकडे काही खुलासा करणे शक्य नाही. हे नाटक लिहून झाल्यावर मुदतीच्या तापातून उठल्यासारखे मला वाटले असे श्री. तेंडुलकर म्हणाले.

दुसऱ्या दिवशी ' सविता दामोदर परांजपे ' या नाटकाविषयी बोलताना डॉ. पाटकर यांनी, या नाटकातील प्रत्येक पात्राचं Psycho-analysis मी करणार नाही हे प्रथम स्पष्ट केले. या नाटकातील अशास्त्रीयतेची त्यांनी विशेषत्वाने चर्चा केली. प्रा. पुष्पा भावे यांनी असे सुचविले की नाटकातील पात्रे हा काही कल्पनांचा चिन्हव्यवहार आहे. हे ध्यानात घ्यावे आणि Psycho–analysis of creativity चाही विचार व्हावा. शेखर

ताम्हाणे यांनी हे नाटक सत्य घटनेवर आधारलेले आहे असे सांगितले आणि या नाटकाबाबत काही व्यावसायिक तडजोडी केल्याचेही मान्य केले. कमलाकर सोनटक्के यांनी कलावंताने Defence देण्याची गरजच नाही. जे जाणवलं, ते लिहिणं हा त्याचा हक्क आहे असे मत ठासून मांडले. मानसशास्त्रीयदृष्टया ते बरोबर आहे की नाही, मानसशास्त्रज्ञ काय म्हणतात याच्याशी नाटककाराला काही कर्तव्य नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

'बॅरिस्टर' या नाटकावर डॉ. स्नेहा पांडे यांनी उत्कृष्ट अभ्यासनिबंध वाचला पण वेळेअभावी या नाटकावर व्हायला हवी होती तेवढी चर्चा झाली नाही 'महासागर' या नाटकावर डॉ. सुधाकर देशपांडे यांनी निबंध वाचला. नाटकातील पात्रांची मानसशास्त्रीय चिकित्सा करताना त्यांनी एरिक बर्नच्या Transactional analysis च्या सिद्धांताचा आधार घेतला. आपले साहित्यिक अजूनही फ्रॉइडच्या पुढे जात नाहीत त्याबद्दल खेद व्यक्त केला. 'वासनाकांड' या नाटकावर डॉ. राजन पांडे यांनी निबंध वाचला. एखाद्या स्त्रीने हे नाटक लिहिले असते का ? असा प्रश्न त्यांनी केला आणि नाटकातील प्रतीके उलगडण्याचा प्रयत्न केला. या नाटकाचे दिग्दर्शक अमोल पालेकर यांनी हे नाटक या चर्चासत्रासाठी निवडले हेच चूक आहे असे मत व्यक्त केले. हे नाटक मनोविकृतीत बसणारे नाही. मुळातच ते symbolic आहे. म्हणून त्यात वास्तवाचे संदर्भ शोधणे चूक आहे. एक कलावंत व त्याची कलाकृती यांचा परस्पर संबंध, नाती, ताणतणाव हे शोधण्याचा प्रयत्न वासनाकांडमध्ये आहे. कलावंत व त्याची कलाकृती यातील संबंधाची अपरिहार्यता हा या नाटकाचा गाभा आहे. चर्चेच्या वेळी प्रा. पुष्पा भावे म्हणाल्या की, महेश एलकुंचवार यांच्या नाटकात सतत येणारी 'वाडा' ही प्रतिमा, त्यामागील लेखकाचा विचार, प्रेरणा समजावून घेणे आवश्यक ठरते. 'वासनाकांड' हे तत्त्वज्ञानपर नाटक आहे असा विचार दिलीप जगताप यांनी मांडला. डॉ. राजेन्द्र बर्वे यांनी 'अवध्य'च्या फक्त नाट्यसंहितेच्या संदर्भात निबंध वाचला. चर्चासत्रासाठी 'मराठी नाटक व मनोविश्लेषणात्मक समीक्षा' असा विषय हवा होता असे ते म्हणाले. रुग्णाचं मनोविश्लेषण वेगळं नि साहित्यकृतीच्या संदर्भातील मनोविश्लेषण वेगळं असा मुद्दा त्यांनी मांडला. नाटकाच्या विविध घटकांची चर्चा करून 'सृजनशीलता अवध्य आहे,' हा निष्कर्ष त्यांनी काढला. 'महापूर' या नाटकावर डॉ. अशोक निरफराके यांनी निबंध वाचला. मानसशास्त्रीय समीक्षेचं नाट्यकृतीच्या संदर्भात स्थान काय ? ते मराठीच्या अभ्यासकांनी प्रथम स्पष्ट करायला हवं होतं असं मत त्यांनी सुरुवातीला मांडलं. हे नाटक एका युवकाच्या प्रेमभंगावरील नाटक आहे. हे नाटक एखाद्या रहस्यकथेसारखं उलगडत जातं, असं म्हणून त्यांनी मानसशास्त्रीयदृष्टया या नाटकातील प्रतीकांचा अर्थ उलगडून दाखविला.

अशा प्रकारचे चर्चासत्र मराठीत प्रथमच झाल्याने काही उणिवा जाणवल्या तरी या अभ्यासाचे – विवेचनाचे मोल नक्कीच खूप आहे. साधारणपणे कोणत्याही चर्चासत्राला वेळ अपुराच पडतो, तसेच इथेही झाले. दीड दिवसात सात नाटकाचा परामर्ष हे काम अवघडच होते. त्यामुळे एखाद्या नाटकावरील चर्चा भरकटली, तर काही नाटकांवर चर्चा झालीच नाही. पण जे ऐकायला मिळाले त्यातून अभ्यासाची एक नवी दिशा अधिक स्पष्टपणे समोर आली. शोधनिबंधाची शास्त्रीय पद्धती विशेषत: डॉ. स्नेहा पांडे आणि डॉ.राजेन्द्र बर्वे यांच्या शोधनिबंधातून प्रकर्षाने डोळ्यापुढे आली. चर्चासत्राचे हेही यश मान्य करायला हरकत नसावी.

★

## इतिहास विभाग-कोह्सीप योजनांतर्गत चर्चासत्र

छत्रपती संभाजी महाराजांच्या हौतात्म्यास यंदाचे वर्षी तीनशे वर्षे पूर्ण होतात त्या अनुषंगाने एफ. वाय. एस. वाय. आणि टी. वाय. बी. ए. च्या इतिहास विषयांच्या विद्यार्थ्यांचे एक चर्चासत्र आयोजिण्यात आले होते. ' छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य ' ह्या विषयावरील चर्चासत्रामध्ये एकूण तीन संकलनात्मक निबंध वाचण्यात आले. मंगळवार २८ मार्च, १९८९ रोजी सकाळी ९ वाजता श्री. अच्युतराव निंबाळकर, टी. वाय. बी. ए. यांनी परकीयांच्या दृष्टिकोणातून ' छत्रपती संभाजी राजे ' ह्या विषयावरील आपला टिपणवजा निबंध सादर केला. प्रामुख्याने फार्सी साधनांच्या तसेच पोर्तुगीज साधनांच्या द्वारा त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र/चारित्र्य व त्यांच्या हालचाली ह्यांचा मागोवा घेतला त्यांनी काफीखान, साकी-मुस्तैदखान, ईश्वरदास नागर व भीमसेन सक्सेना ह्या चार समकालीन लेखकांच्या फार्सी साहित्यांचा प्रामुख्याने वापर केलेला होता. थोरल्या महाराजांसमवेत आग्राभेट, दिलेरखानास जाऊन मिळणे, राज्यारोहण व त्याप्रसंगीचे कट आणि हृदयद्रावक शेवट-ह्या चार प्रमुख घटनांचा छत्रपती संभाजी राजांच्या जीवनातील प्रसंगांचा त्यांनी मोठा समर्पक आढावा मांडला पोर्तुगीज-मराठा संघर्षातील छत्रपती संभाजी महाराजांची शर्थीची झुंज पोर्तुगीज साधनांच्या द्वारे श्री. निंबाळकरांनी आपल्या निबंधात नमूद केलेली होती.

बुधवार दि. २९ मार्च, १९८९ रोजी दोन निबंध वाचण्यात आले त्यापैकी पहिला श्री. परशुराम रिकामे टी. वाय. बी. ए. यांनी वाचला. आपल्या निबंधात श्री. रिकामे ह्यांनी सुप्रसिद्ध नाटककार श्री. वसंतराव कानिटकर यांच्या ' रायगडला जेव्हा जाग येते ' ह्या नाटकातील छत्रपती संभाजी महाराजांची व्यक्तिरेखा मांडली. त्यासाठी त्यांनी नाटकातील तीन अंकांमधील विविध प्रवेश व त्यातील संवाद यां द्वारा श्री. कानिटकरांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग व त्या संदर्भातील अन्य व्यक्तींच्या प्रतिक्रिया यांचा सुंदर आढावा घेतला. दुसऱ्या निबंधामध्ये श्री. राहुल चव्हाण, टी. वाय. बी ए. यांनी मराठ्यांच्या इतिहासातील छत्रपती संभाजी महाराजांचे स्थान व कार्य यांचा आढावा घेतला. नऊ वर्षांच्या कारकीर्दीत संभाजी महाराजांसमोर जी विविध आव्हाने उभी राहिली त्यांच्याशी त्यांनी कसा संघर्ष केला हे मार्मिक शब्दांत मांडले.

◆

## Report on Seminar on ' Consumer protection–need, measures and present position in India.' Held on 19th March 1989 in Modern College of Arts, Science and Commerce

The Seminar was arranged with specific sessions for different areas where consumer protection is necessary. The first session dealt with consumerism and consumer movement in general. The session was conducted between 9 00 am and 11-30 am. It was begun with an introduction by Prof. A G. Gosavi who described the object and Nature of the Seminar.

The inaugural Address was delivered by Principal Dr. S. N. Navalgundkar who highlighted the need of such seminars to awaken the consumers.

Prof. A. G. Gosavi then presented a detailed paper on review of consumer movement outlining the history of consumer movement, institutions representing the consumers and the role of the Government in the area. Dr. Smt. Krishnabai Nimbkar stressed the need for starting citizens

• Movement to profect the Rights of citizens which would automatically protect consumers' Rights

Dr. Dilip Sarwate, Management consultant, explained the various legal measures available for the protection of consumers in India.

The session closed with interested students asking questions about the measures which were ably replied by the speakers.

The second session dealt with consumers movement in drugs and pharmaceuticals. The session was conducted between 11-30 am. and 1-15 pm. The introduction was made by Prof S. G. Datar. Mrs Agashe read a short paper to initiate the discussion.

Dr. Anant Phadke representing the consumers, detailed the various grievances of the consumers and the malpractices of the manufacturers and dealers. Shri Ramanbhai Mehta, a leading manufacturer described the care taken and the controls exercised on the manufacture of drugs

Shri. Ramesh Shah : President, Retailers Association, explained the role played by retailers in protecting consumers from malpractices and inappropriate drugs.

Shri R W. Gudal, the Joint Commissioner of Food and Drugs Administration felt that the Government was trying its best to stop malpractices and spurious medicines.

The Third session of the seminar discussed the Public Distribution System vis a vis consumer protection.

The introduction was made by Prof. S. G. Datar. Prof P. C. Mutha placed the problmes in the system in clear perspective and highlighted the lacunae.

Shri. Suryakant Pathak outlined the problems of consumers and Traders under the system He also urged consumers to take up their problems with the authorities and media. Shri. Gawadia, Secretary of the Pune Merchants chambers described the difficulties of their price shop-owners under the system.

Shri. Mohan Dharia, ex-planning minister, Govt. of India, explained very clearly the basic tenets of the public Distribution system. The system was being mistreated in his opinion. He asserted that with proper planning and implementation the system would certainly help to protect the consumers.

There was a lively discussion with a general consensus that the Administration of the system should be improved to help the consumers.

The Fourth and concluding session of the seminar dealt with customer services of Banks. The introduction was made by Dr. Mrs. Madhavi Mitra. Miss Nileema Deshpande, an M Com Student, read the introductory paper.

Shri G N. Gandekar, Pune Banks users Association presented with examples, the shortcommings in customer services by the Banks.

Shri Dighe and Shri Gokhale Senior officials of the Bank of Maharashtra, provided the Bankers view on the problems.

Shri. Bindumadhav Joshi, a veteran leader in consumer movement felt that the Banks services had improved but wore becoming very costly. He then discussed the need and necessity of the consumer movement to keep a valid check on manufacturers, workers and the Government so that consumers could lead a better life. This he felt, would lead to a more real Democracy.

# वार्षिक अहवाल १९८८-८९

## वरिष्ठ महाविद्यालय : क्रीडा संघटना

१९८८-८९ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील खेळाडूंनी जे उज्ज्वल यश संपादन केले आहे त्याचा गौरव शब्दांकित करून आपल्यासमोर ठेवतांना मनापासून आनंद होत आहे

- आंतर महाविद्यालयीन बास्केट बॉल स्पर्धेत पुरुष संघाने विजेतेपदाची साधलेली हॅटट्रीक !
- आंतरमहाविद्यालयीन व्हॉली बॉल स्पर्धेत पुरुष संघाने सतत चौथ्या वेळी संपादन केलेले विजेतेपद !
- वेट-लिफ्टिंगमध्ये सांघिक विजेतेपद
- आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत द्वितीय क्रमांक, १०,००० मी. स्पर्धेत द्वि. क्र. } कैलास, बागल, एस. वाय. बी. कॉम.
- महिलांच्या आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत
  द्वितीय क्र.............................................. कु. ज्योती शिवथरे, एफ्. वाय्. बी. ए.
  तृतीय क्र.............................................. कु. अनिता बाजी, एफ्. वाय्. बी. ए.
- आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत उपविजेतेपद-संदेश आदवडे, टी. वाय्. बी. कॉम्.
- आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा :
  १) २०० व ४०० मी पळणे : तृतीय क्र. कु अविदना वेलणकर, एफ्. वाय्. बी. एस्सी.
  २) तिहेरी उडीत द्वितीय क्र. उंच उडीत तृतीय क्र.-राजेन्द्र कुलकर्णी, एस्. वाय्. बी एस्सी
- वेटलिफ्टिंग स्पर्धा (८२½ कि. गट) प्रथम क्रमांक.....विश्वजीत मुंजे, एम्. कॉम्. पार्ट-१
- वेटलिफ्टिंग स्पर्धा (६७ कि. गट) द्वितीय क्र. ... अविनाश पाटील, एस्. वाय्. बी. कॉम्.

| | |
|---|---|
| (६७ कि. गट) तृतीय क्र. | गजानन जोशी, एफ्. वाय्. बी. कॉम्. |
| (५६ कि. गट) द्वितीय क्र. | शिवाजी चव्हाण, एस्. वाय्. बी. ए. |
| (५६ कि. गट) तृतीय क्र. | संजय काकडे, टी. वाय्. बी. एस्सी. |
| (५२ कि. गट) द्वितीय क्र. | तानाजी तोडकर, एस् वाय्. बी. कॉम्. |

### आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा

| | |
|---|---|
| द्वितीय क्र. (ग्रुपसाठी निवड) (९० कि. गट) | बाबुराव वायकर, एस्. वाय्. बी. ए. |
| द्वितीय क्र. (ग्रुपसाठी निवड) (५८ कि.) | भरत नखाते, एस्. वाय्. बी. एस्सी. |

## शरीर सौष्ठवस्पर्धा

तृतीय क्र. — राजेंद्र पोटे, एस्. वाय्. बी. ए.
द्वितीय क्र (ग्रुपसाठी निवड) — नीतिन पोखरकर, एस्. वाय्. बी. एस्सी

## आंतर विभागीय (व्हॉली बॉल) स्पर्धेत सहभागी असलेल्या संघातील विद्यार्थी खेळाडू-

सुरेश गायकवाड-टी. वाय्. बी. ए.
सुधीर पालांडे-एस्. वाय्. बी. ए.
संदीप भागवत-एफ्. वाय्. बी. कॉम्.
राजेश गायकवाड-एफ्. वाय्. बी. ए.
सतीश शिवरकर-एफ्. वाय् बी. कॉम्.
कु. स्वाती साठे-एफ्. वाय्. बी. कॉम्.

### बास्केटबॉल

धनेश दळवी-एस्. वाय्. बी कॉम्.
राजेश गायकवाड-एफ्. वाय्. बी ए.
जगताप-एम्. कॉम्. पार्ट-१
राजाराम खेडेकर-एम्. कॉम्. पार्ट-२

### हॉकी

कु वसुधा कोलते-एफ्. वाय् बी. कॉम्.

### बुद्धिबळ

नीलेश मेंडकर-एस्. वाय्. बी. एस्सी

### अॅथलेटिक्स

कैलास बागल-एस्. वाय्. बी. कॉम्.
कु. अनिता बाजी-एफ्. वाय्. बी. ए.
कु. ज्योति शिवथरे-एफ् वाय्. बी. ए.

### कबड्डी

राजेश शिर्के-टी. वाय्. बी. ए.
कु. गायत्री भोपटकर-एस्. वाय्. बी. कॉम्.
,, संगीता सोनवणे-एफ. वाय्. बी. ए.
,, शैलजा कुलकर्णी-एस्. वाय्. बी. एस्सी.
,, भारती कुंचूर-एफ्. वाय्. बी. एस्सी.
कु. दीप्ती ठकार-एफ्. वाय्. बी. कॉम्.
,, विनीता जोशी-एफ्. वाय्. बी. कॉम्.
,, विजया धुमाळ-एफ. वाय्. बी. कॉम्.
,, मनीषा शिंदे-एस्. वाय्. बी. ए.
,, सुनीता शाळिग्राम-एस्. वाय्. बी. एस्सी.

### मैदानी स्पर्धा

राजेंद्र कुलकर्णी-एस्. वाय्. बी. एस्सी.

### वेट लिफ्टिंग

अविनाश मुंजे-एम्. कॉम्. पार्ट १-८२½ कि. गट.
अविनाश पाटील-एस्. वाय्. बी. कॉम्. ६७ कि. गट
शिवाजी चव्हाण-एस्. वाय्. बी. ए. ५६ कि. गट.
तानाजी तोडकर-एस्. वाय्. बी. कॉम् ५२ कि. गट

### कुस्ती

बाबूराव वायकर-एस्. वाय्. बी. ए. ९० कि. गट
भरत नलावते-एस्. वाय्. बी. एस्सी. ५८ कि. गट.

### शरीरसौष्ठव

नीतिन पोखरकर-एम्. वाय्. बी एस्सी.

## आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू

### व्हॉलीबॉल

सुरेश गायकवाड–टी. वाय्. बी. ए.
सुधीर पालांडे–एस्. वाय्. बी. ए.
संदीप भागवत एफ्. वाय. बी. कॉम्.
राजेश गायकवाड–एफ्. वाय्. बी. ए.

### बास्केटबॉल

धनेश दळवी–एस्. वाय्. बी. कॉम्.
राजाराम खेडेकर–एम. कॉम. पार्ट–२

### ॲथलेटिक्स

कैलास बागल–एस्. वाय्. बी. कॉम.

### कबड्डी

कु. गायत्री भोपटकर–एस्. वाय्. बी. कॉम्.
,, संगीता सोनवणे–एफ्. वाय. बी. ए.
कु. शैलजा कुलकर्णी–एस्. वाय्. बी. एस्सी.
,, मनीषा शिंदे–एस्. वाय्. बी. ए.

### खो खो

कु. संगीता जोशी–एम्. कॉम. पार्ट–२
,, स्वाती गोखले–टी. वाय्. बी. कॉम्.
,, धनश्री पोळ–एस्. वाय्. बी. कॉम्.

## राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांत सहभागी झालेले खेळाडू

### व्हालीबॉल

सुरेश गायकवाड–टी. वाय्. बी. ए.
सुधीर पालांडे–एस्. वाय्. बी. ए.
संदीप भागवत–एफ्. वाय्. बी. कॉम्.
सतीश शिवरकर–एफ्. वाय. बी. कॉम्.
राजेश गायकवाड–एफ. वाय बी. ए.

### कबड्डी

संगीता सोनवणे–एफ् वाय्. बी. ए.

### ॲथलेटीक्स

वसुधा कोलते–एफ्. वाय. बी. कॉम.

सुरेश गायकवाड (टी. वाय्. बी. ए.) याने पश्चिम विभागीय विद्यापीठ व्हॉलीबॉल संघाचे प्रतिनिधित्व केले. भारतीय युवक विद्यापीठीय व्हॉलीबॉल संघात याची निवड झाली आहे.

दर वर्षीप्रमाणे याही वर्षी आंतरवर्गीय सामने आयोजित केले होते. या सामन्यांचा निकाल पुढील-प्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| व्हॉलीबॉल | प्र. व. कला | – विजेता |
| | द्वि. व. कला | – उपविजेता |
| कबड्डी | तृ. व. शास्त्र | – विजेता |
| | प्र. व. शास्त्र | – उपविजेता |
| बास्केटबॉल | द्वि. व. कला | – विजेता |
| | द्वि. व कॉ. शास्त्र | – उपविजेता |
| बद्धिबळ | आर्. एम्. कुलकर्णी द्वि. व शा. (ए) | विजेता |
| | माईनकर एन्. एस्. | उपविजेता |

**बॅडमिंटन (दुहेरी/मुले)**

हर्षद साने, नीतिन ढवळीकर } विजेता

(प्र. व. वाणिज्य, सी)

संजय गोर्ले, अशिष कुलकर्णी } उपविजेता

(तृ. व कॉम्प्यु. शा.)

**बॅडमिंटन (एकेरी/मुली)**

भारती सातपुते — विजेती

(द्वि. व कॉम्प्यु. शा.)

सुचेता बक्षी — उपविजेती

(तृ. व. वाणिज्य)

**बॅडमिंटन (एकेरी/मुले)**

उमेश वणीकर — विजेता

(प्र. व. कॉम्प्यु. शा.)

राहूल अभंग — उपविजेता

(प्र. व शास्त्र)

**टेबल-टेनिस (एकेरी/मुले)**

मिलिंद जीवतोडे — विजेता

(द्वि. व. कॉम्प्यु. शा.)

उमेश तहशीलदार — उपविजेता

(द्वि. व. कॉम्प्यु. शा.)

**१०० मी. धावणे (मुले)**

सचिन सांडभोर — प्रथम क्र.

(तृ. व. वाणिज्य सी)

विनय पाटील — द्वितीय क्र.

(तृ. व. शास्त्र)

योगेश फल — तृतीय क्र.

(प्र. व. शास्त्र 'ए')

**५००० मी. धावणे (मुले)**

कैलास बागल — प्रथम क्रमांक

(दि. व. वाणिज्य 'ए')

संजय मेंधे — द्वितीय क्रमांक

(प्र. व. कला)

प्रविण मुरकुटे — तृतीय क्रमांक

(द्वि. व. वाणिज्य)

**गोळा फेक (मुले)**

हेमंत घोरपडे — प्रथम क्रमांक

(प्र. व. शास्त्र 'बी')

सतीश काटे द्वितीय क्रमांक

(द्वि. व. कॉम्प्यु. शा.)

सचिन सांडभोर तृतीय क्रमांक

( तृ. व. वाणिज्य 'सी' )

**लांब उडी ( मुले )**

सचिन सांडभोर प्रथम क्रमांक

(तृ. व. वाणिज्य 'सी')

राजेंद्र कुलकर्णी द्वितीय क्रमांक

(द्वि. व. शा.)

हेमंत घोरपडे तृतीय क्रमांक

(प्र. व. शा. 'बी')

० सर्वसाधारण विजेतेपद (सांघिक) द्वि. व. कला

० सर्वसाधारण विजेतेपद ( वैयक्तिक मुले)

सचिन सांडभोर (तृ. व वाणिज्य 'सी')

० सर्वसाधारण विजेतेपद ( वैयक्तिक मुली )

**कु. संगीता केशव जोशी या एम्. कॉम्. पार्ट २ मधील विद्यार्थिनीला १९८६-८७ चे शिवछत्रपती पारितोषिक मिळाले आहे. (खो खोबद्दल)**

**राजेंद्र पोटे या एस्. वाय्. बी. ए. मधील विद्यार्थ्यास शरीरसौष्ठवाबद्दल 'मॉडर्न श्री' हा किताब मिळाला.**

महाविद्यालयाचे खेळाडू व अनेक स्पर्धांमध्ये जे अतुलनीय यश मिळवितात त्यामागे मा. प्राचार्य. डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचे सदोदित मिळणारे प्रोत्साहन, प्रेरणा व मार्गदर्शन आहे, त्याचप्रमाणे उपप्राचार्य, जिमखाना कार्यवाह, शारिरीक शिक्षण विभागातील संघटक, कर्मचारी इतर प्राध्यापक, रजिस्ट्रार व कार्यालयीन कर्मचारी, सेवकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलाच पाहिजे.

सर्वांचेच मनःपूर्वक आभार

कार्याध्यक्ष

क्रीडा संघटक

**प्रा. जी. एम्. बनसोडे**

क्रीडासचिव

**कि. शं. लागू**

विद्यार्थी-प्रतिनिधी

**श्री. सुधीर पलांडे**

**कु. गायत्री भोपटकर**

# कनिष्ठ महाविद्यालय : क्रीडा संघटना ८८-८९

क्रीडाक्षेत्रात दरवर्षी भरघोस यश संपादन करून मॉडर्न महाविद्यालयाचा क्रीडाक्षेत्रातील उचावत ठेवणे आणि प्रगतीच्या पायऱ्या चढत राहणे ही महाविद्यालयाची यशस्वी परंपरा आहे. १९८ शैक्षणिक वर्ष या परंपरेला साजेसेच ठरले आहे हे नमूद करताना मनःपूर्वक आनंद होत आहे.

आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी आंतरशालेय (महाविद्यालयीन स्तर) विभागीय आणि जिल्हा व राज्यपातळी या विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले आहे.

या कौतुकास्पद आणि अभिनंदनीय कामगिरीची नोंद खालीलप्रमाणे :—

कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्हॉली बॉल संघाने राज्य-पातळीवर प्रतिनिधित्व केले.

या संघातील खेळाडू खालीलप्रमाणे :—

१) समीर विधाते : बारावी 'जे'

२) दीपक विधाते : बारावी 'जे'

३) दीपक गायकवाड : बारावी 'बी'

४) संतोष मोरे : बारावी 'आय'

५) विलास वाजारे : अकरावी 'बी'

६) गजानन माडीवाले : बारावी 'ई'

७) विजय राहीकर : बारावी 'डी'

८) प्रसाद वीरकर : बारावी 'डी'

यापैकी १) गजानन माडीवाले, २) विजय राहीरकर ३) प्रसाद वीरकर यांची व्हॉलीबॉलच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरिता निवड झाली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

कनिष्ठ महाविद्यालयाच्या कबड्डी राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेसाठी अमरजीतसिंग चौहान या अकरावी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्याची निवड झाली याबद्दल त्यांचे अभिनंदन !!

'वजन उचलणे (वेट लिफ्टिंग)— ५२ किलो गट, या राज्यस्तरीय पातळीवरील स्पर्धेसाठी राजेंद्र काकडे, या विद्यार्थ्याची निवड झाली. तर ६० किलो गटात अभिजीत देशपांडे, बारावी वाणिज्य, या विद्यार्थ्याची निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयास आनंद होत आहे.

राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत २०० मी. पळणे या क्रीडाप्रकारासाठी कु. अश्विनी सातारकर हिची निवड ही कौतुकास्पद आहे. तसेच अविनाश कदम. अकरावी वाणिज्य ह्या विद्यार्थ्यांची निवड झाली. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयाच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. 'दीपक शेंडकर' या बारावी 'ई' मधील विद्यार्थ्याला पुरुष विभागात वैयक्तिक विजेतेपद मिळाले. तर स्त्री विभागात 'कु. सोनल पेंढारकर' या अकरावी 'जी' मधील विद्यार्थिनीने वैयक्तिक विजेतेपदाचा मान मिळवला.

महाविद्यालयाच्या क्रीडा संघटनेच्या या यशात मा. प्राचार्य, उपप्राचार्य, जिमखाना कार्यमंडळ यांचे सदोदित मिळणारे प्रोत्साहन अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे कर्तव्यच आहे. तसेच प्राध्यापकवर्ग, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, सेवकवर्ग यांचे नेहमी मिळणारे सहकार्यही मोलाचे आहे. त्यांच्या या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

महाविद्यालयाच्या या यशस्वी परंपरेमागे असणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात लोकांनाही धन्यवाद !

**प्रा. जी. एम्. बनसोडे**
कार्याध्यक्ष

**विनोद छाब्रा**
**विनय शेरीकर**
क्रीडा-संघटक

# कनिष्ठ महाविद्यालय अहवाल

**कनिष्ठ महाविद्यालय समिती (१९८८-८९)**

कार्याध्यक्ष : उपप्राचार्य प्रा. पद्माकर आपटे

सदस्य : श्रीमती सुरेखा परब

सौ. वीणा नरगुंद

सौ. गौरी चाफेकर

सौ. रंजना देव

सौ. वसुंधरा कांबळे

श्री. भोमे भालचंद्र

श्री. जोशी रामचंद्र

कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी आणि बारावी वर्गाच्या प्रत्येकी दहा तुकड्या आहेत. त्यात कलाशाखा ४, शास्त्रशाखा ८ आणि वाणिज्यशाखा ८ तुकड्या अशी विभागणी आहे.

१९८८-८९ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी अकरावीमध्ये नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना मा. प्राचार्य यांनी मार्गदर्शन केले. शालांत परीक्षेत (इ. १० वी) बोर्डाच्या गुणवत्ता यादीतील कु. मोहिनी थोरात, कु. मनीषा लोणारी व प्रचेतस रायकर या गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला

दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या एकांकिका, नाट्यवाचन, संगीत, वक्तृत्व इ. विविध स्पर्धांमध्ये इ. ११ व १२ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग मोठा होता. या स्पर्धांचा तपशील व निकाल कलामंडळाच्या अहवालात दिलेला आहे.

१२ वी शास्त्रमधील निवडक विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेत उत्तम यश मिळावे या हेतूने 'स्कॉलर बॅच' हा विशेष उपक्रम चालविला जातो. १५ एप्रिल ते १० जून या काळात रोज स. ११ ते २ या वेळात शास्त्र विषयाचे जादा तास घेण्यात आले. बोर्डाच्या धर्तीवर चाचण्या घेण्यात आल्या. ह्या 'स्कॉलर बॅच'मधील विद्यार्थ्यांनी मार्च १९८८ मधील उच्च माध्यमिक १२ वीच्या परीक्षेत खूपच चांगले यश मिळविले मार्च १९८८ च्या १२ वी परीक्षेत अविनाश देशपांडे या विद्यार्थ्याने भूगोल विषयात पुणे विभागात सर्वाधिक गुण मिळवून भूगोल विषयाचे पारितोषिक मिळविले. १२ वी परीक्षेत उत्तम यश मिळालेल्या गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

स्कॉलर बॅच उपक्रमासाठी खालील शिक्षकांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळाले.

रसायनशास्त्र : श्री लिमये रा. ग., श्री. गोखले, सौ. कुलकर्णी, सौ. चाफेकर.

पदार्थविज्ञान : श्री. भोमे, श्री. दशपुत्रे.

वनस्पतिशास्त्र : सौ. देव, सौ. शिंदे.

प्राणिशास्त्र : श्री. दांडेकर, सौ. सातभाई, सौ. बुटाला, कु. भोसले.

गणित : श्री. कुलकर्णी, सौ. चिकटे, सौ. नवाथे, श्री. जोशी.

वाणिज्यशाखेच्या हुषार विद्यार्थ्यांना खालील शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन केले.

सौ. नरगुंद, सौ. आगाशे, सौ. गोसावी, सौ. नवाथे, श्री लिमये द. ल. इ. ११, १२ वी मधील मराठी विषयाची विशेष गोडी असलेल्या विद्यार्थ्यांना सौ सिध्ये यांनी मार्गदर्शन केले. कविवर्य कुसुमाग्रज यांच्यासंबंधी लेख असलेले 'हस्तलिखित' विद्यार्थ्यांनी तयार केले. कुसुमाग्रज याच्या साहित्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांना सहकार्य देणाऱ्या सर्व शिक्षकांचे हार्दिक आभार. वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल माननीय प्राचार्य यांचे आभार. पर्यवेक्षक कु. परब, श्री. जोशी तसेच कार्यालयीन कर्मचारी-सेवकवर्ग यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानतो

**प्रा. पद्माकर आपटे**
उपप्राचार्य

# कनिष्ठ महाविद्यालय : क्रीडा संघटना ८८-८९

क्रीडाक्षेत्रात दरवर्षी भरघोस यश संपादन करून मॉडर्न महाविद्यालयाचा क्रीडाक्षेत्रातील यशोध्वज सतत उचावत ठेवणे आणि प्रगतीच्या पायऱ्या चढत राहणे ही महाविद्यालयाची यशस्वी परंपरा आहे. १९८८–८९ हे शैक्षणिक वर्ष या परंपरेला साजेसेच ठरले आहे हे नमूद करताना मनःपूर्वक आनंद होत आहे.

आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी आंतरशालेय (महाविद्यालयीन स्तर) विभागीय आणि जिल्हा व राज्यपातळी या विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले आहे.

या कौतुकास्पद आणि अभिनंदनीय कामगिरीची नोंद खालीलप्रमाणे : –

कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्हॉली बॉल संघाने राज्य-पातळीवर प्रतिनिधित्व केले.

या संघातील खेळाडू खालीलप्रमाणे :–

१) समीर विधाते : बारावी 'जे'

२) दीपक विधाते : बारावी 'जे'

३) दीपक गायकवाड : बारावी 'बी'

४) संतोष मोरे : बारावी 'आय'

५) विलास बाजारे : अकरावी 'बी'

६) गजानन माडीवाले : बारावी 'ई'

७) विजय राहीकर : बारावी 'डी'

८) प्रसाद वीरकर : बारावी 'डी'

यापैकी १) गजानन माडीवाले, २) विजय राहीरकर ३) प्रसाद वीरकर यांची व्हॉलीबॉलच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरिता निवड झाली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

कनिष्ठ महाविद्यालयाच्या कबड्डी राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेसाठी अमरजीतसिंग चौहान या अकरावी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्याची निवड झाली याबद्दल त्यांचे अभिनंदन !!

'वजन उचलणे (वेट लिफ्टिंग)– ५२ किलो गट, या राज्यस्तरीय पातळीवरील स्पर्धेसाठी राजेंद्र काकडे, या विद्यार्थ्याची निवड झाली. तर ६० किलो गटात अभिजीत देशपांडे, बारावी वाणिज्य, या विद्यार्थ्याची निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयास आनंद होत आहे.

राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत २०० मी. पळणे या क्रीडाप्रकारासाठी कु. अश्विनी सातारकर हिची निवड ही कौतुकास्पद आहे. तसेच अविनाश कदम. अकरावी वाणिज्य ह्या विद्यार्थ्यांची निवड झाली. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयाच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. 'दीपक शेंडकर' या बारावी 'ई' मधील विद्यार्थ्याला पुरुष विभागात वैयक्तिक विजेतेपद मिळाले. तर स्त्री विभागात 'कु. सोनल पेंढारकर' या अकरावी 'जी' मधील विद्यार्थिनीने वैयक्तिक विजेतेपदाचा मान मिळवला.

महाविद्यालयाच्या क्रीडा संघटनेच्या या यशात मा. प्राचार्य, उपप्राचार्य, जिमखाना कार्यमंडळ यांचे सदोदित मिळणारे प्रोत्साहन अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे कर्तव्यच आहे. तसेच प्राध्यापकवर्ग, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, सेवकवर्ग यांचे नेहमी मिळणारे सहकार्यही मोलाचे आहे. त्यांच्या या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

महाविद्यालयाच्या या यशस्वी परंपरेमागे असणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात लोकांनाही धन्यवाद !

**प्रा. जी. एम्. बनसोडे**
कार्याध्यक्ष

**विनोद छाब्रा**
**विनय शेरीकर**
क्रीडा-संघटक

कु. ज्योति बगाडे व कु. ज्योति अवधूत, प्र. व. वाणिज्य याना अनुक्रमे दुसरं व तिसरं पारितोषिक मिळाले. कनिष्ठ महाविद्यालयातील कु. स्वाती लगाडे व कु गौरी ठकार या बारावी वाणिज्य वर्गातील विद्यार्थिनींना पहिले तर कु. प्रिया शहा व दीपाली किरणे यांना द्वितीय पारितोषिक मिळाले.

**४) प्रकल्प अहवाल स्पर्धा** – वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत श्री. श्रीपादराज आमले, तृ. व. वाणिज्य या विद्यार्थ्यास पहिले पारितोषिक मिळाले तर कु. आरती ढवळीकर, कु. सुधा गडकर, व कु. शीतल पाटील यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. प्रा बाघमारे व प्रा. जोगळेकर यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

**५) व्याख्याने** – संघटनेतर्फे विविध विषयावर तज्ञ व अनुभवी व्य क्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. ती अशी :

(अ) इंपोर्ट-एक्सपोर्ट प्रोसिजर,– व्याख्याते श्री. सिधये

(आ) करिअर इन् कंपनी सेक्रेटरी–व्याख्याते श्री. मल्होत्रा, डायरेक्टर ऑफ स्टुडंट्स फॉम कंपनी सेक्रेटरी इन्स्टिटयूट, नवी दिल्ली.

(इ) करिअर इन कॉस्ट अकाऊन्टन्सी–व्याख्याते, श्री. पी. डी. पारखी, अध्यक्ष आय. सी डब्लू. ए. आय. कलकत्ता.

(ई) करिअर इन कॉम्प्युटर, व्याख्याते श्रीमती माला रिहान, स्टुडंट अॅडव्हायझर फॉम एन्. आय्. आय्. टी

संघटनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या विविध उपक्रमांमध्ये प्राध्यापक-सदस्य व विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. सर्वांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

**प्रा. श्रीमती भारती डोळे**
कार्याध्यक्षा, वाणिज्य संघटना

## शास्त्र संघटना वार्षिक अहवाल

१९८८–८९ या सालातील संघटनेचा आरंभाचा कार्यक्रम ५ सप्टे. १९८८ (गुरुपौर्णिमा) या दिवशी झाला. सदर दिवशी श्री. डॉ. एच्. जे. आर्णीकर यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला व त्यांचे "Breeder Reactor" या विषयावर व्याख्यान झाले. शास्त्र संघटनेच्या वतीने T Y. B Sc (रसायनशास्त्र) या वर्गातील विद्यार्थ्यांची Hindustan Organic Chemicals या कारखान्यास भेट आयोजित करण्यात आली. डॉ. सौ. कांचनगंगा गंधे यांनी आपले सण व त्यामधील औषधी वनस्पतींचा वापर या विषयावर भित्तीपत्रक प्रसिद्ध केले. या भित्तीपत्रकातील माहिती अत्यंत उपयुक्त होती. भूगोल विभागाने पर्यावरण व प्रदूषण या विषयावर डॉ. गजेंद्रगडकर यांचे व्याख्यान आयोजित केले. पर्यावरण व प्रदूषण यासारख्या ज्वलंत प्रश्नाबद्दलची चर्चा विद्यार्थ्यांना फारच उपयुक्त ठरली. भौतिकशास्त्र विभागाने प्रा. ए. डब्लू. जोशी. (पुणे विद्यापीठ) यांचे Energy Bands in solids या विषयावर व्याख्याने आयोजित केले होते. भौतिकशास्त्राच्या विद्यार्थ्यांना या उपयुक्त व अभ्यासक्रमातील विषयाच्या चर्चेचा फायदा झाला. याव्यतिरिक्त इतर विषयांची व्याख्यान सत्रं वर्षाअखेरपर्यंत होतील. शास्त्र संघटनेच्या वतीने १२०० रुपयांची शास्त्राची विविध विषयांवरील पुस्तके खरेदी करून ग्रंथालयास दिली.

**प्रा. रा. ग. लिमये**
कार्याध्यक्ष. शास्त्र संघटना

# कलामंडळ

महाविद्यालयीन जगतातील कलाक्षेत्रात मॉडर्न महाविद्यालयाचे नाव नेहमीच अग्रमागी असते. प्रतिवर्षी निरनिराळ्या स्पर्धा गाजविणाऱ्या आमच्या गुणी आणि यशवंत विद्यार्थ्यांनी या वर्षीही यशश्री खेचून आणली आहे. त्यांच्या यशाचा आलेख पुढीलप्रमाणे–

या वर्षी पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत महाविद्यालयाकडून 'आभ्राण' आणि 'अॅश इज बर्निंग' अशा दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. प्रा. सौ. अमृता सातभाई यांनी मार्गदर्शन केले. **विशेष अभिमानाची बाब म्हणजे 'आभ्राण' या एकांकिकेनं मानाचा 'पुरुषोत्तम करंडक' मिळविला.** अजित शिरोळे यांच्या कल्पक दिग्दर्शनाखाली सादर झालेल्या या एकांकिकेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला -

अजित शिरोळे अंजली जोशी पराग चौधरी स्वाती जोशी पराग पंडित प्रभाकर रंधवे अनिता गोळे राजेंद्र काटे मृदुला फाटक विजय शिंदे अनुपमा कोन्हाळकर सागर बडापूरकर शैलेश माळवदकर अश्विनी गोसावी विनायक पंडीत रविंद्र महाजन पुरुषोत्तम नेने महेश बोरोले नीतिन आपटे विकास पवार पुरुषोत्तम नगरकर विकास हेम्बाडे मनीष परदेशी राजेंद्र घाडगे महेंद्र कांबळे गिरीश कांबळे संदीप साकोरे शुभांगी डांगरे विनायक केळजी स्मिता जोशी नासिर शेख सुभाष गायकवाड स्वप्नील चव्हाण

अजित शिरोळे या विद्यार्थ्यास सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाबद्दल नटवर्य कै. गणपतराव बोडस पारितोषिक, कै. चिंतामणराव कोल्हटकर पारितोषिक आणि सर्वोत्कृष्ट अभिनयाबद्दल नटश्रेष्ठ कै. केशवराव दाते पारितोषिक मिळाले. कु. अंजली जोशी या विद्यार्थिनीस गिरीजा माधव पारितोषिक मिळाले. या कलाकारांचे मनःपूर्वक अभिनंदन !!

'अॅश इज बर्निंग' ही अवघड एकांकिका विनय पेशवे या विद्यार्थ्याने दिग्दर्शित केली होती. प्राथमिक फेरीत बहारदार प्रयोग सादर करून एकांकिकेने अंतिम फेरीत सहज प्रवेश मिळविला. या एकांकिकेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला–

श्रीपादराज आमले परेश मोकाशी मंजूषा दातार अधिश्री अत्रे श्रीनिवास लाटकर चंद्रशेखर कुथे मनीष गोहाड वर्षा दीक्षित स्वप्नील चव्हाण अनिरुद्ध खुटवड श्रीधर पिसाळ संतोष विद्वन नीतिन धडके प्रसाद पंढरपूरकर

या सर्व कलाकारांचे हार्दिक अभिनंदन !

◦ गदगकर संगीत स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रा. सौ. लीना पाटणकर यांनी मार्गदर्शन केले.

जितेंद्र कुलकर्णी अविनाश वर्वे वीणा कुलकर्णी संदीप नाईक विनोद कालेकर राजेश परतानी पराग चौधरी अनुपम बॅनर्जी माधुरी देशमुख

◦ फिरोदिया करंडक आंतरमहाविद्यालयीन विविध गुणदर्शन स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रा. जयंत जोर्वेकर यांनी मार्गदर्शन केले.

अजित शिरोळे विनायक पंडीत जितेंद्र कुलकर्णी अविनाश वर्वे दीपक देव नासिरखान पुरुषोत्तम नेने समीर देशमुख नीतिन आपटे अनुपमा कोन्हाळकर मृदुला फाटक अनपम बॅनर्जी वीणा कुलकर्णी स्मिता पटेल विकास पवार महेश बोरोले श्रीनिवास लाटकर मनीष गोस्वामी महेश शिवतरे विनोद कालेकर श्रीधर पिसाळ स्वप्नील चव्हाण

◦ फर्ग्युसन महाविद्यालयद्वारा आयोजित 'इनसिंक' स्पर्धेत अनिरुद्ध खुटवड या विद्यार्थ्याला उत्कृष्ट छायाचित्रणाबद्दल प्रथम क्रमांक मिळाला. या स्पर्धेतील सर्व कलाप्रकारांमध्ये (पथनाट्य, गझल, कथाकथन, वाद्यवृंद, एकांकिका इ.) पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला–

पुरुषोत्तम नगरकर पराग चौधरी गिरीश कांबळे संदीप साकोरे, राजेंद्र काटे प्रभाकर रंधवे

विजय शिंदे विनायक पंडीत मनिषा महाजन सीमा साठे अमरजा कुलकर्णी पल्लवी गोखले मृदुला फाटक अनुपमा कोल्हाळकर रोहिणी हरदास विनायक पंडित मकरंद टिल्लू जितेंद्र कुलकर्णी वीणा कुलकर्णी अविनाश बर्वे विनोद कालेकर संदीप नाईक अनुपम बॅनर्जी अनिल कुकडे श्रीपादराज आमले परेश मोकाशी रविंद्र महाजन वर्षा दीक्षित मंजूषा दातार तुषार देव संजीव सोभा अमोद जमदाडे

प्रा. जगदीश चिंचोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयद्वारा आयोजित कै. हेमंत बर्वे आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

श्रीपादराज आमले, परेश मोकाशी, मंजूषा दातार, विनय पेशवे, मनीष गोहाड व मकरंद टिल्लू

सिम्बॉयसिस महाविद्यालयद्वारा आयोजित '**चेस**' एकांकिकेस सांघिक प्रथम क्र. मिळाला. नाट्यवाचन स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी भाग घेतला– परेश मोकाशी, अनिरुद्ध खुटवड, अंजली जोशी. सिम्बॉयसिस कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयद्वारा आयोजित राजू मुथा सुगम संगीत स्पर्धेत समीर ओक याने भाग घेतला.

कै. वसुमती विजापुरे नाट्याभिनय स्पर्धेत श्रीपादराज आमले या विद्यार्थ्यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

महाविद्यालयाच्या वर्षा दीक्षित या विद्यार्थिनीचा दूरदर्शनवरील काव्यसंध्या या कार्यक्रमात सहभाग होता. पुणे शहर युवक कॉंग्रेस (आय) आयोजित राजकपूर व्यक्तिरेखाटन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. पुणे विद्यापीठ आयोजित नियतकालिक स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळाले.

मुंबई मराठी साहित्य सहकारद्वारा आयोजित आंतरविद्यापीठीय कथाकथन स्पर्धेत मकरंद टिल्लू या विद्यार्थ्याला प्रथम क्रमांक मिळाला.

गतवर्षी प्रथमच सुरू केलेल्या रांगोळी व मेंदी स्पर्धेला यंदाही विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत पोस्टर स्पर्धाही समाविष्ट केली होती. श्री. नंदू भावसार व सौ. रेखा आवटी यांनी परीक्षणाचे काम पाहिले. प्रा. सौ. सुनीता गोसावी यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:–

**मेंदी स्पर्धा** : प्रथम क्र. प्रज्ञा देशपांडे– १) प्रा. श्रीमती सुरेखा परब पुरस्कृत पारितोषिक
२) प्रा. अनिल व्हनकळस पुरस्कृत पारितोषिक

द्वितीय क्र कीर्ति देव
तृतीय क्र. ज्योत्स्ना बाहेती
उत्तेजनार्थ १) शीतल पाटील
२) चारुमती केळकर

**रांगोळी स्पर्धा (ठिपक्यांची)**

प्रथम क्र. : सुजाता शिदोरे १) प्रा. श्रीमती सुरेखा परब पुरस्कृत पारितोषिक
२) प्रा. अनिल व्हनकळस पुरस्कृत पारितोषिक

द्वितीय क्र. स्वाती साळी
उत्तेजनार्थ १) शुभांगी खोले
२) जयश्री बऱ्हाटे

(फ्री हँड)

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्र. | राजेंद्र कुलकर्णी | श्री . विनय शेरीकर पुरस्कृत कै. मुरलीधर शेरीकर पारितोषिक |
| द्वितीय क्र. | अंजली पत्की | |
| | १) मधुरा केळकर | |
| | २) राजीव पवार | |
| परीक्षकांनी खास शिफारस् केलेले पारितोषिक | : रामदास जाधव | |

**पोस्टर स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्र | अपर्णा जल्लावार | प्रा. श्रीमती सुरेखा परब पुरस्कृत पारितोषिक |
| उत्तेजनार्थ | प्रमोद जमदाडे | |

महाविद्यालयांतर्गत संगीत स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद होता. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. शरयू बर्वे व सौ. हेमा गुर्जर यांना आमंत्रित केले होते. प्रा. अनिल व्हनकळस यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:-

## महाविद्यालयांतर्गत संगीत स्पर्धा

### वरिष्ठ महाविद्यालय

**चित्रपट संगीत**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | वीणा कुलकर्णी | : कै. सरस्वती पेडणेकर पारितोषिक, |
| द्वितीय क्रमांक | एम्. पी. राज | : कै. मुरलीधर शेरीकर पारितोषिक, प्रा. एस्. के. मेहता पुरस्कृत पारितोषिक |
| तृतीय क्रमांक | : राजेश परतानी | |
| उत्तेजनार्थ | : अर्चना मराठे, लीना श्रोत्री | |

**मराठी भावगीत**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | : विक्रांत कुलकर्णी | : कै. सरस्वतीबाई पेडणेकर पारितोषिक |
| द्वितीय क्रमांक | : लीना श्रोत्री | : प्रा. एस्. के. मेहता पुरस्कृत पारितोषिक |
| तृतीय क्रमांक | : अर्चना मराठे | |

**नाटचसंगीत**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | : समीर ओक | : कै. सरस्वतीबाई पेडणेकर पारितोषिक |

**वाद्यसंगीत**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | : राजेश परतानी | : कै. सरस्वतीबाई पेडणेकर पारितोषिक |
| द्वितीय क्रमांक | : संजीव तांबे | प्रा. एस्. के. मेहता पुरस्कृत पारितोषिक |
| तृतीय क्रमांक | : संदीप नाईक, | |
| उत्तेजनार्थ | : मनोज रिसबूड | : |

### कनिष्ठ महाविद्यालय

**चित्रपटसंगीत**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | भाग्यश्री मोघे | : | कै. सरस्वतीबाई पेडणेकर पारितोषिक |
| द्वितीय क्रमांक | आरती मनोहर | . | प्रा. एम्. के. मेहता पुरस्कृत पारितोषिक, कै. मुरलीधर शेरीकर पारितोषिक |
